Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in
मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर - 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
4 रुपयात

* वर्ष ५४ * अंक २३७ * * नागपूर *
बुधवार, दिनांक ४ डिसेंबर २०२४
पुरवणीसह पाने ८
किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

## एकाच कुटुंबातील ४ जणांची आत्महत्या

■ **वृत्तसंस्था, झालावाड, दि. ३ :**
राजस्थानातील झालावाडमध्ये एकाच कुटुंबातील ४ जणांनी आत्महत्या केली. चौघांनीही गळफास लावून आत्महत्या केली. जिल्ह्यातील गंगाधर येथील जैत खेडी येथे मंगळवारी सकाळी आठ वाजता ही घटना घडली.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मृतांमध्ये शिवसिंह पटेल यांचा मुलगा नागू सिंह (30), संतोष बाई (23, रा. जेतखेडी), युवराज सिंह (5, रा. नागू यांचा मुलगा) आणि नागू सिंह यांचा एक वर्षाच्या मुलाचा समावेश आहे. एसपी ऋचा तोमर म्हणाल्या- सकाळी पोलिसांना माहिती मिळाली होती की एका घरात चार जणांनी गळफास लावून घेतला आहे. सुरुवातीला चौघांनी आत्महत्या केल्याचे समोर आले.

## शिंदे ठाण्याहून मुंबईत परतले, फडणवीस वर्षा बंगल्यावर

# सीएम पदाचा तिढा सुटण्याचे संकेत!

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ३ :**
देवेंद्र फडणवीस काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेण्यासाठी वर्षा बंगल्यावर पोहोचले. महाराष्ट्र निवडणुकीनंतर दोघांची ही दुसरी भेट आहे. यापूर्वी दोघेही दिल्लीत भेटले होते.

फडणवीस यांच्या आधी भाजप नेते गिरीश महाजन यांनी शिंदे यांची भेट घेतली होती. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, महाजन, शिंदे आणि उदय सामंत यांच्यात मंत्रिपदाच्या विभाजनाबाबत बंगल्यातील चेंबर रूममध्ये चर्चा झाली आहे.



शिंदे हे आज ठाणे येथून मुंबईतील वर्षा बंगल्यावर त्यांच्या शासकीय निवासस्थानी पोहोचले. ते शुक्रवारी ठाण्यात गेले होते, आता चार दिवसांनी परतले. ठाण्यात त्यांची रूटीन तपासणी रुग्णालयात झाली, त्यानंतर त्यांची तब्येत कशी आहे असे विचारले असता ते म्हणाले, तब्येत चांगली आहे.

भाजप विधिमंडळ पक्षाची बैठक आज ४ नोव्हेंबर रोजी होणार आहे. त्यात गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी आणि अर्थमंत्री निर्मला सीतारामन निरीक्षक म्हणून सहभागी होणार आहेत. हे दोन्ही नेते आजच मुंबईत पोहोचले आहेत.

### भाजपचा मुख्यमंत्री असेल - रूपाणी

भाजप विधिमंडळ पक्षाची बैठक बुधवारी होऊ शकते. मला वाटते की महाराष्ट्राला भाजपचा मुख्यमंत्री मिळेल, असे भाजपचे निरीक्षक म्हणून नियुक्त करण्यात आलेले विजय रुपाणी नवी दिल्ली येथे प्रसार माध्यमांशी बोलताना म्हणाले.

महाराष्ट्रातील निवडणुकीचा निकाल 23 नोव्हेंबरला लागला. त्यात महायुतीला तब्बल 230 जागा मिळाल्या. पण निकाल लागू 10 दिवस उलटूनही त्यांना मुख्यमंत्र्यांच्या नावावर शिक्कामोर्तब करता आले नाही.

एकनाथ शिंदे यांनी मुंबईत पोहोचताच बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त 6 डिसेंबर रोजी होणाऱ्या विविध कार्यक्रमाच्या तयारीचा आढावा घेतला.

महाराष्ट्रातील मुख्यमंत्र्यांच्या शपथविधी सोहळ्यासाठी एनडीए शासित राज्यांच्या मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना निमंत्रण पाठवण्यात आले आहे. केंद्रीय मंत्री, राज्यपाल, साधू-महंत, कलाकार, लेखकही या सोहळ्याला येणार आहेत.

दरम्यान, रात्री उशीरापर्यंत वर्षा बंगल्यावर शिंदे आणि फडणवीस यांच्यात झालेल्या चर्चेत सरकार स्थापनेसोबतच मुख्यमंत्री पदाचा तिढा सुटल्याची माहिती असून, ५ ला शपथविधी होणार आहे.

## भारत-चीन संबंधांमध्ये सुधारणा



■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ३ :**
परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी मंगळवारी भारत-चीन सीमा वादावर संसदेत माहिती दिली. परराष्ट्रमंत्र्यांनी सभागृहात सांगितले की, भारत आणि चीन सीमा विवाद संवाद आणि मुत्सद्देगिरीने सोडवण्याचा प्रयत्न करत आहेत.

पूर्व लडाखमध्ये पूर्ण विल्हेवाट लावण्यात आली आहे. तथापि, अनेक भागात अजूनही वाद आहे. दोन्ही देशांना मान्य असलेला तोडगा काढणे हा भारताचा उद्देश आहे. ते म्हणाले, '2020 पासून भारत आणि चीनमधील संबंध सामान्य नाहीत. सीमेवर शांतता भंग झाला. तेव्हापासून दोन्ही देशांमधील संबंध चांगले नाहीत. मात्र, नुकत्याच झालेल्या चर्चेमुळे परिस्थिती काहीशी सुधारली आहे. परराष्ट्र मंत्री म्हणाले, 2 वर्षात 38 बैठका झाल्या, प्रत्येक स्तरावर चर्चा झाली.

# भाजप २२, शिवसेना १२, राष्ट्रवादी काँग्रेसला १० मंत्रिपदे?

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :**
महायुतीचा शपथविधी सोहळा ५ डिसेंबर रोजी होणार असून मुख्यमंत्री पद तसेच खातेवाटपाबाबत कोणताही निर्णय झाला नाही. मुख्यमंत्री पदाच्या शर्यतीतून माघार घेतल्यानंतर एकनाथ शिंदे गृहमंत्री पदासाठी अडून बसल्याची माहिती आहे.

अशातच आता महायुतीच्या खातेवाटपाचा संभाव्य फॉम्युर्ला समोर आला आहे. यामध्ये भाजप स्वतःकडे २२ खाती ठेवणार असल्याचे सूत्रांकडून समजते आहे.

गृह मंत्रालय तसेच सभापतीपद भाजपला मिळण्याची शक्यता आहे. भाजपकडून पंकजा मुंडे, अतुल सावे, गिरीश महाजन, राधाकृष्ण विखे पाटील, आशिष शेलार, अतुल भातखळकर, शिवेंद्रसिंहराजे भोसले, चंद्रशेखर बावनकुळे यांना मंत्रिपद मिळण्याची शक्यता आहे. भाजपचे १६ मंत्री शपथ घेणार असल्याची माहिती आहे.

एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेलो १२ खाती मिळू शकतात. यामध्ये एकनाथ शिंदे, दादा भुसे, शंभूराज देसाई, गुलाबराव पाटील, अर्जुन खोतकर, संजय राठोड आणि उदय सामंत यांची वर्णी लागण्याची शक्यता आहे.

अजित पवारांच्या राष्ट्रवादीला १० खाती मिळणार असून अद्यापही कोणाला संधी मिळणार ही माहिती समोर आली नाही. मात्र, अर्थ खाते हे राष्ट्रवादीकडेच जाणार असल्याची माहिती आहे.

राष्ट्रवादीला अर्थ, तर शिंदेंच्या शिवसेनेला शहरी विकास खाते मिळू शकते. याशिवाय इतर खात्यांवर नंतर चर्चा केली जाणार आहे. तत्पूर्वी, देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवार हे महायुतीचे तिनही नेते मुंबईत बैठक घेऊन नवीन मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळाच्या फॉर्म्युल्यावर चर्चा करणार आहेत.

मुख्यमंत्रिपद भाजपकडे गेल्यानंतर एकनाथ शिंदे नाराज असल्याच्या चर्चा सुरू होत्या. एकनाथ शिंदे गृह खात्यासाठी अडून बसल्याची माहिती होती. दरम्यानच्या काळात एकनाथ शिंदे यांची तब्येत बिघडल्याने महायुतीची बैठक झाली नाही. पण आता शिंदेंच्या शिवसेनेकडून हालचाली सुरू झाल्याची माहिती आहे.

## दाव्याचा निकाल लागेपर्यंत सावरकरांवर टीका नको
### राहुल गांधींना कोर्टाचे निर्देश



■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. ३ :**
स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याविषयी बदनामीकारक वक्तव्य केल्याप्रकरणी न्यायालयात दाखल दाव्याचा निकाल लागत नाही तोपर्यंत राहुल गांधी यांनी सावरकरांवर टीका करू नये, असे स्पष्ट निर्देश प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी अमोल शिंदे यांच्या विशेष न्यायालयाने दिले.

या प्रकरणाची सुनावणी सुरू असतानाच गांधी यांनी एका भाषणात पुन्हा सावरकर यांची बदनामी करणारे वक्तव्य केल्याचे ॲड. संग्राम कोल्हटकर यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. त्यावर न्यायालयाने गांधी यांचे वकील पवार यांना सूचित करत स्पष्ट निर्देश दिले.

सावरकर यांच्याविषयी बदनामीकारक वक्तव्य केल्याप्रकरणी गांधी यांना न्यायालयात हजर होण्याबाबत विशेष न्यायालयाकडून समन्स बजावण्यात आले होते. त्यानुसार गांधी यांचे वकील ॲड. मिलिंद पवार १८ नोव्हेंबर रोजी न्यायालयात हजर झाले. या वेळी त्यांनी गांधी हे विद्यमान खासदार व लोकसभेचे विरोधी पक्षनेते नेते आहेत. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ते देशभर दौऱ्यावर होते.

येथील न्यायालयाचे समन्स त्यांना मिळाले आहे. मात्र गांधी दौऱ्यावर असल्याने न्यायालयात हजर राहू शकत नाहीत, असे नमूद करत न्यायालयाकडे अर्ज केला. त्यावर सुनावणी घेऊन २ डिसेंबरला गांधी यांना न्यायालयात हजर ठेवावे, असा आदेश ॲड. पवार यांना देत न्यायालयाने खटला सोमवारपर्यंत (दि. २) तहकूब केला होता. न्यायालयात गैरहजर राहण्याची परवानगी देण्यासह न्यायालयात उपस्थित राहण्यास मुदतवाढ मिळावी, असा अर्ज न्यायालयात केला होता. तो मान्य करत न्यायालयाने मुदतवाढ दिली. या प्रकरणाची पुढील सुनावणी १० जानेवारी २०२५ ला होणार आहे.




महासागर आवृत्त्या | नागपूर | अकोला | अमरावती | खामगांव | यवतमाळ | वर्धा | गडचिरोली | वाशीम | भंडारा | गोंदिया | मुंबई | पालघर (ठाणे) | नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# आरटीआय कायद्याची महाराष्ट्रात दुर्दशा सर्वाधिक अपिले, तक्रारी प्रलंबित

पुणे, दि. ३ : प्रतिनिधी

माहिती अधिकार कायद्याच्या (आरटीआय) माध्यमातून लोकशाहीच्या दृष्टीने पारदर्शकता वाढवणे गरजेचे असताना आपण विकलांगतेकडे चाललो आहोत. राजकीय अनास्थेचा फायदा घेऊन प्रशासकीय व्यवस्थेने कायद्याचा बट्ट्याबोळ केला आहे, अशी टीका माजी सनदी अधिकारी महेश झगडे यांनी केली. नोकरशाहीचे कुभांड रचणाऱ्यांविरोधात हा कायदा व्यापक करण्यासाठी मोठे जनआंदोलन उभे करण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली.

प्रशासनात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व आणण्यासाठी देशात माहिती अधिकार कायदा लागू होऊन १९ वर्षे पूर्ण होत आहेत. त्या पार्श्वभूमीवर सजग नागरिक मंचातर्फे 'माहिती अधिकाराची दशा आणि दिशा' या विषयावर झालेल्या चर्चासत्रात झगडे बोलत होते. विधीज्ञ डॉ. प्रल्हाद कचरे, मंचाचे अध्यक्ष विवेक वेलणकर, जुगल राठी या वेळी उपस्थित होते.

'कामगारांच्या आंदोलनातून जन्माला आलेला 'आरटीआय' कायदा सक्षम होण्याऐवजी कमकुवत करण्यावर प्रशासकीय व्यवस्थेचा भर आहे. हा कायदा संसदेने केला आहे. त्यामुळे त्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी लोकप्रतिनिधींनी प्रयत्न करावेत. त्यासाठी जनतेने त्यांना उत्तरदायी केले पाहिजे. असे केले तरच प्रशासकीय व्यवस्थेवर अंकुश राहील. तंत्रज्ञानाचा हस्तक्षेप वाढवणेही महत्वाचे आहे. राज्यघटनेत भारतीयांना घटनात्मक सार्वभौमत्व अधोरेखित केले आहे. माहिती अधिकार कायदा सक्षम झाल्यास जनतेचा लोकशाहीतील सहभाग वाढेल,' असे कचरे यांनी नमूद केले.

**सेवानिवृत्तांसाठी रोजगार हमी योजना**

सद्य:स्थितीला राज्यात माहिती आयोगाच्या आयुक्तांची अनेक पदे रिक्त आहेत. त्यावर सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाते. त्यामुळे ही सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची रोजगार हमी योजना असून, रिक्त पदांवर माहिती अधिकार क्षेत्रात कार्यरत व्यक्तींची नियुक्ती करण्यासाठी चळवळ सुरू केली पाहिजे, अशी अपेक्षाही झगडे यांनी व्यक्त केली.

**महाराष्ट्रात सर्वाधिक अपिले, तक्रारी प्रलंबित**

'आरटीआय'च्या वाढत्या वापरामुळे प्रशासनात धाक निर्माण झाला आहे. मात्र, अद्याप त्याचा वापर पूर्ण क्षमतेने होत नसून त्याला पंगू करण्याचे प्रयत्न प्रशासन करत आहे. परिणामी देशभरात साडेचार लाख द्वितीय अपिले प्रलंबित आहेत. त्यातही महाराष्ट्रात सर्वाधिक अपिले, तक्रारी प्रलंबित आहेत, अशी माहिती कचरे यांनी दिली.

# कोकणातील ढासळलेले गड सावरण्याचे उद्धव ठाकरेंपुढे मोठे आव्हान

रत्नागिरी, दि. ३ : प्रतिनिधी



कोकण हा ठाकरे यांच्या शिवसेनेचा बाल्लेकिल्ला म्हणून ओळखला जातो. मात्र मागील लोकसभा निवडणुकी पासून ते आता नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत ठाकरेंच्या शिवसेनेची मोठी पीछेहाट झालेली पहायला मिळत आहे. त्यामुळे आता कोकणातील ढासळलेले गड सावरण्याचे ठाकरेंच्या शिवसेनेपुढे मोठे आव्हान उभे राहिले आहे.

शिवसेना पक्षप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेनेची स्थापना करुन ती कोकणात मोठ्या प्रमाणावर रुजविली. कोकण म्हटले की, ठाकरे यांची शिवसेना तळागाळात पहावयास मिळत होती. मात्र आता थोडी परिस्थिती बदलली आहे. कोकणातून ठाकरेंच्या शिवसेनेचे अस्तीत्व कमी होत असल्याचे दिसत आहे. मागील लोकसभा निवडणूकीमध्ये शिवसेना ठाकरेंच्या दोन्ही उमेदवारांचा पराभव झाला. रायगड लोकसभा मतदार संघातून शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार अनंत गिते यांचा पराभव राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे उमेदवार सुनील तटकरे यांनी केला होता. तर तळ कोकणात रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदार संघातून माजी खासदार विनायक राऊत यांचा भाजपाचे उमेदवार विद्यमान खासदार नारायण राणे यांनी पराभव केला. शिवसेना फुटीनंतर कोकणात ठाकरेंच्या शिवसेनेचे अस्तित्व कमी होत गेल्याचे दिसून येऊ लागले आहे.

शिवसेना शिंदे गट आणि शिवसेना ठाकरे गट असे दोन भाग शिवसेनेचे झाल्याने शिवसेना कार्यकर्ते विखुरले गेले. याचा फटका ठाकरे गटाला नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत बसल्याचे दिसून आले. विधानसभा निवडणुकीत रत्नागिरी जिल्ह्यातील पाच पेकी चार मतदार संघातून शिवसेना विरुध्द शिवसेना अशी लढत बघायला मिळाली. त्यामध्ये दापोली विधानसभा मतदार संघातून शिंदे गटाकडून योगेश कदम आणि ठाकरे गटाकडून संजय कदम यांच्यात लढत झाली. त्यामध्ये योगेश कदम हे पुन्हा आमदार झाले. तसेच गुहागर मतदार संघातून शिंदे गटाकडून राजेश बेंडल तर ठाकरे गटाचे भास्कर जाधव यांच्या लढत होऊन भास्कर जाधव कमी फरकांच्या मतांनी निवडून आले. रत्नागिरी विधानसभेत ठाकरे गटाचे बाळ माने यांना हारवून शिंदे गटाचे उदय सामंत पाचव्यांदा आमदार झाले. राजापुर लांजा मतदार संघातून ठाकरे यांच्या शिवसेनेला पराभवाचा सामना करावा लागला. येथे ठाकरे गटाचे राजन साळवी यांना शिंदे गटाच्या किरण सामंत यांच्याकडून हार पत्करावी लागली. रत्नागिरी जिल्ह्यातील फक्त गुहागर मतदार संघावरच ठाकरेंच्या शिवसेनेचे वर्चस्व दिसून आले. बाकीचे मतदार संघातून ठाकरेंच्या शिवसेनेचे वर्चस्व संपुष्ठात आले. याबरोबर सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तीन विधानसभा मतदार संघांपेकी एकाही मतदार संघावर ठाकरेंची शिवसेना भगवा फडकवू शकली नाही. हे तिन्ही मतदार संघातून शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार पराभूत झाले.

सावंतवाडी मतदार संघातून दिपक केसरकर यांनी ठाकरे गटाचे राजन तेली यांचा पराभव केला. कुडाळ मतदार संघातून शिंदे गटाचे नीलेश राणे यांनी ठाकरे गटाचे वैभव नाईक यांचा पराभव केला. रत्नागिरी सिंधुदुर्ग या दोन जिल्ह्यात ठाकरे यांच्या शिवसेनेला मोठी हार पत्करावी लागल्याने कोकणातील हे बालेकिल्ले पुर्णपणे ढासळलले. कोकणातील या दोन शिवसेनेमुळे मतदार ही संभ्रामावस्थेत असल्याने कोकणात कोणत्या शिवसेनेचे राज्य चालणार याकडे आता सर्वांचेच लक्ष लागले आहे. मात्र कोकणातूनच मोठ्या झालेल्या ठाकरेंच्या शिवसेनेला भाजपा आणि शिवसेना शिंदे गटामुळे ढासळलेले गड सावरण्याच्या मोठ्या आव्हानाला सामोरे जावे लागणार आहे.

# वाहन चालकांनो सावधान भिवंडीत लवकरच तिसरा डोळा टिपणार बेशिस्त चालकांसह वाहन धारकांना, होणार थेट दंड आकारणी

भिवंडी, दि. ३ : प्रतिनिधी



भिवंडीत होणारी वाहतूक कोंडी आणि अनेक वाहन चालकांमध्ये असलेला वाहतूक शिस्तीचा अभाव,त्याच प्रमाणे वाहतूक पोलिसांची कमतरता यामुळे ठाणे प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी भिवंडीत कॅमेरा लावण्याचा निर्णय घेतला आहे.ठाणे जिल्ह्यात अशा प्रकारे विवीध शहरात कॅमेरा लावण्यात येणार आहे.भिवंडीत कॅमेरा लावण्यासाठी शहरातील विविध मार्गांचा आणि चौकांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. काही महत्वाच्या ठिकाणी मनपाची परवानगी देखील घेण्यात येणार आहे.

**- भिवंडी वाहतूक विभाग, सहा.पोलिस आयुक्त शरद ओहोळ**

गेल्या काही वर्षांपासून भिवंडी शहरांतर्गत सरकारी व मनपा परिवहन प्रवासी सेवा नसल्याने शहरात मोठ्या संख्येने दुचाकी, तीनचाकी आणि चारचाकी वाहनांची गर्दी वाढली आहे.त्यामुळे शहरातील वाहतूक व्यवस्था कोलमडली असून अनेकवेळा वाहनचालकांना आणि नागरिकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. यावर अंकुश आणण्यासाठी आता ठाणे प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत भिवंडी शहरात वाहन चालकांना शिस्त लावण्यासाठी वहतुकीच्या मुख्य मार्गावर व्हिडीओ कॅमेरे लावणार आहेत.या माहितीनंतर शहरातील बेशिस्त वाहन चालकांमध्ये खळबळ माजली आहे.शहरातील मुख्य रहदारीच्या मार्गावर नेहमी रिक्षा रेंगाळत असल्याने त्यांच्या समुहाने ठिकठिकाणी रस्ता अडविलेला दिसून येतो. तर अनेकदा रिक्षाचालक आणि दुचाकी चालक वहातूकीचे नियम तोडून वाहने हाकताना दिसतात. त्यामुळे अनेकदा ठिकठिकाणी वहातूक कोंडी होते.तर बऱ्याचदा चोरीची दुचाकी आणि तीन चाकी वहाने रस्त्यावर फिरत असतात. त्यांची तपासणी होत नसल्याने नल्ला रिक्षा राजरोसपणे व्यवसाय करतात.तर चोरीच्या दुचाकी पोलिसांच्या नजरेत येऊ नये म्हणून जलद गतीने पळवितात. त्याचप्रमाणे शहरातील अनेक चारचाकी वाहनांनी अवैधरित्या काळयाकुट्ट काचा लावल्या आहेत. तर काहींनी अशा काचा लावून पुढे पदाधिकारी असल्याच्या पाट्या लावल्याने पोलिस त्यांच्यावर कारवाई करीत नाही.अशी वहाने आता कॅमेरात कैद होणार आहेत. तर अनाधिकृत पार्किंग आणि नो एन्ट्री मध्ये घुसणारे वाहन चालक देखील कॅमेरा मध्ये दिसणार आहेत.तसेच शहराबाहेरून येणारे जड-अवजड वहानांवर देखील या माध्यमातून कारवाई होणार आहे. अशा सर्व कारवाई मुळे शहरातील आणि शहराबाहेरील वाहनचालकांना शिस्त लागणार असून वहातूक पोलिसांवरील ताण कमी होणार आहे.तसेच मुख्य रहदारीच्या रस्त्यावरील वाहतूक कोंडी पासून वाहनचालकांची आणि नागरिकांची सुटका होणार आहे.

# आईला रुग्णालयात भेटून घरी जाताना 16 वर्षाच्या मुलाचा मृत्यू

मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी

रुग्णालयात उपचार घेणाऱ्या आईला भेटून घरी जाणाऱ्या १६ वर्षांच्या मुलाचा नागपाडा परिसरात झालेल्या अपघातात मृत्यू झाला. मृत मुलगा दुचाकीच्या मागे बसला होता. याप्रकरणी दुचाकीस्वाराविरोधात नागपाडा पोलिसांनी निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल केला आहे. मृत मुलाच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्यामुळे त्याचा मृत्यू झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. नागपाडा येथून आग्रीपाडा परिसरात जाणाऱ्या वाय पुलावर हा अपघात घडला, अशी माहिती पोलिसांनी दिली. हुध अन्सारीच्या आईच्या छातीत दुखू लागल्याने त्यांना शनिवारी आग्रीपाडा परिसरातील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचार सुरू असताना हुध रुग्णालयात उपस्थित होता. यावेळी त्याचे कुटुंबियल आणि इतर नातेवाईकही तेथे आले होते. रात्री दीड वाजता त्यांनी अब्दुलला हुधला घरी जाऊन जेवण करून येण्यास सांगितले. आतेभाऊ अब्दुल बरोबर हुध त्याच्या मोटरसायकलवरून घरी जाण्यासाठी निघाला. मोटरसायकल वाय ब्रिजवरून जात असताना अब्दुलने हलर्जीपणाने भरधाव वेगात मोटरसायकल चालवून पुढे जाणाऱ्या एका दुचाकीला धडक दिली.

या अपघातात त्याच्या मागे बसलेला हुध अन्सारी गंभीररित्या जखमी झाला. त्याला तात्काळ रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. पण रविवारी पहाटे ४ वाजता उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. त्यानंतर त्याचा मृतदेह शवविच्छेदनासाठी नायर रुग्णालयामध्ये पाठविण्यात आला. ही माहिती मिळताच नागपाडा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. कुटुंबियांनी घडलेला प्रकार पोलिसांना सांगितला. त्यानंतर याप्रकरणी अब्दुल वदुद अन्सारी याच्याविरुद्ध नागपाडा पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

नागपाडा पोलीस ठाण्यात कार्यरत पोलीस हवालदार अमित सपाटे यांच्या तक्रारीवरून याप्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम १०६ (१), २८१ सह मोटरवाहन कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हुधच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती. त्यामुळे उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाल्याचे पोलिसांनी सांगितले.

# तुकाराम दुधे यांची 55 लाख 29 हजारांची फसवणूक

पनवेल, दि. ३ : प्रतिनिधी

तुकाराम दुधे यांची 55 लाख 29 हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात फजल रेहमान गुलाब नाबी अन्सारी (राहणार बाळापुर, अकोला) आणि महाजनको कंपनीचे इंजिनियर यांच्याविरोधात 30 नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

फजल अन्सारी याने त्याच्या मेसर्स साई अँश पाँड् ट्रान्सपोर्टिंग कंपनीला महाजनको पारस या औष्णिक ऊर्जा प्रकल्पामध्ये टेंडर मिळाले असून टेंडरच्या अनुषंगाने कंपनीने एकूण एक कोटी 85 लाख 39 हजार 207 इतकी रक्कम भरलेली आहे असे सांगितले. आणि तेवढ्या रकमेच्या महाजनकोच्या पावत्या दाखवून तुकाराम दुधे यांच्याकडून कंपनीमध्ये 30 टक्के भागीदार म्हणून 55 लाख 29 हजार रुपये मे. साई अँश पाँड् ट्रान्सपोर्टिंग कंपनीच्या बँक खात्यावर स्वीकारली. त्यानंतर आरोपीने डिसेंबर 2023 ते जानेवारी 2024 या कालावधीमध्ये महाजनको मधून 419 रुपये दराने राखाडी विकत घेऊन ती पुढे 540 रुपये या दराने विक्री करून एकूण 9 हजार 246 मॅट्रिक टन राखाडी विकली आणि दुधे यांनी गुंतवलेल्या रकमेवरती कमाई करून आणि तसे करण्यासाठी महाजनको कंपनीचे इंजिनियर यांनी खोट्या पावत्या, इतर कागदपत्रे बनवून देऊन त्याद्वारे दुधे यांचा विश्वास संपादन केला आणि गुंतवलेली रक्कम 55 लाख 29 हजार रुपये आणि त्या बदल्यात कोणत्याही मोबदला न देता तुकाराम दुधे (रा. भारत गॅसजवळ, पनवेल) यांची फसवणूक केली.

# आरएमएच्या क्रिकेट सामन्यात कळंबोली वारियर्स विजयी

पनवेल, दि. ३ : प्रतिनिधी

रायगड मेडिकल असोसिएशन च्या वतीने दिनांक 30 नोव्हेंबर 2024 आणि 01 डिसेंबर 2024 असे दोन दिवस रायगड मधील डॉक्टरांसाठी नागोठणे येथे क्रिकेट सामन्यांची आयोजन करण्यात आले होते. या डॉक्टरांच्या अंतिम क्रिकेट सामन्यात डॉक्टर अरुणेश शिंदे यांच्या कळंबोली वॉरियर्स संघाने पनवेल प्राइड संघाचा पराभव करत अंतिम विजेतेपद प्राप्त केले. या अंतिम सामन्यात उत्कृष्ट खेळाडू म्हणून डॉक्टर शेखर पवार यांची निवड करण्यात आली.

दोन दिवस खेळल्या गेलेल्या या डॉक्टरांच्या क्रिकेट सामन्यात सर्वोत्कृष्ट मालिकावीर म्हणून डॉक्टर सचिन मोकल, उत्कृष्ट फलंदाज डॉक्टर सचिन मोकल, उत्कृष्ट गोलंदाज म्हणून डॉक्टर यासीन शेख, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक डॉक्टर मयूर देशमाने आणि उत्कृष्ट झेल डॉक्टर अरविंद खुटारकर आदींची निवड करण्यात आली. या क्रिकेट स्पर्धेत रायगड मधील डॉक्टरांच्या 20 संघानी भाग घेतला होता . यामध्ये प्रामुख्याने कलंबोली, तलोजा, पनवेल, रसायनी, कर्जत,पेण,अलिबाग, मुरुड, माणगाव, महाड आदी भागातील डॉक्टरांच्या संघानी भाग घेतला होता.खेळीमेळीच्या वातावरणांमध्ये या स्पर्धा पार पडल्या.

यावेळी रायगड मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉक्टर निशिगंध आठवले यांनी सांगितले डॉक्टरांच्या आपल्या व्यवसायातील ताण-तणाव कमी करण्यासाठी आणि रायगड मधील जास्तीत जास्त डॉक्टरांना एकत्रित येण्यासाठी या सामन्यांचे आयोजन आम्ही दरवर्षी करत असतो. यावेळी रायगड मेडिकल असोसिएशनचे सेक्रेटरी राजेंद्र चांदोरकर, खजिनदार नवल किशोर साबू, डॉक्टर राजेश शिंदे डॉक्टर संजय पाटील, डॉक्टर हेमंत गंगोलीया, डॉक्टर रमेश पटेल आदरणीय आदींनी उपस्थित राहून डॉक्टरांच्या सर्व संघांना शुभेच्छा दिल्या आणि त्यांचे मनोबल वाढवले.

# डोंबिवलीत सरबतमध्ये गुंगीचे द्रव्य देऊन महिलेवर लैंगिक अत्याचार

ठाणे, दि. ३ : प्रतिनिधी

कल्याणमध्ये राहत असलेल्या एका २३ वर्षाच्या महिलेला सरबत, नाष्ट्यामध्ये गुंगीचे द्रव्य टाकून तिच्यावर तिच्या मनाविरूध्द शारीरिक संबंध करणाऱ्या डोंबिवलीतील देवीचापाडा भागातील एका ४२ वर्षाच्या व्यक्ति विरुध्द पीडित महिलेने विष्णुनगर पोलीस ठाण्यात शनिवारी तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल करून घेतला आहे. फेब्रुवारी ते नोव्हेंबर या कालावधीत संबंधित व्यक्तिने आपल्यावरलैंगिक अत्याचार केले आहेत, असे पीडित महिलेने तक्रारीत म्हटले आहे.

पीडित महिलेने विष्णुनगर पोलीस ठाण्यातील तक्रारीत म्हटले आहे, संबंधित व्यक्तिने आपल्याला नाष्टा, सरबतामध्ये गुंगीचे द्रव्य टाकून खाण्यास, पिण्यास दिले. त्यानंतर संबंधिताने आपल्या मनाविरुध्द आपल्यावर लैंगिक अत्याचार केले. तसेच या प्रकाराचे मोबाईलमध्ये छायाचित्र काढून ती समाज माध्यमावर सामायिक करण्याची धमकी दिली. संबंधित व्यक्तिने केलेल्या सततच्या लैंगिक अत्याचारामुळे मी गर्भवती राहिली. ही माहिती आपण संबंधित व्यक्तिला दिल्यावर ही माहिती तू कोणालाही सांगू नकोस नाहीतर तुझ्या आई वडिलांना मी मारून टाकीन अशी धमकी दिली.

आपण गर्भपात करू, पण त्यासाठी अगोदर माझ्याशी लग्न करावे लागेल. हा प्रकार कोणालाही सांगितला तर मी जीवाचे बरेवाईट करून घेईन, अशी धमकी पीडितेला दिली. यापूर्वी संबंधित व्यक्तिची दोन लग्न झालेली असताना सुध्दा ती माहिती व्यक्तिने पीडितेपासून लपवून ठेवली. हा प्रकार पीडितेच्या लक्षात आल्यावर संबंधिताने आपली फसवणूक केली. तसेच गर्भपाताच्या नावाने आपल्याकडून तीन लाख रूपये टप्प्याने घेतले म्हणून पीडितेने संबंधिता विरुध्द तक्रार केली आहे.

# ठाणे शहरात काँग्रेसला खिंडार! कळवा येथील काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश

ठाणे, दि. ३ : प्रतिनिधी

शहरातील काँग्रेसचे मनोज शिंदे यांनी काही दिवसांपूर्वी शिवसेना (शिंदे गट) पक्षात प्रवेश केला असतानाच, त्यापाठोपाठ आता, कळव्यातील काँग्रेसच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी भाजप पक्षात प्रवेश केला आहे. त्यामुळे ठाणे शहरात काँग्रेस पक्षाला खिंडार पडल्याची चर्चा सर्वत्र सुरु आहे. कळवा पूर्व घोलई नगर येथील काँग्रेसचे सामाजिक न्याय ठाणे शहर अध्यक्ष जगदीश गौरी हे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसह रविवारी वर्तक नगर येथील भाजप कार्यालयात दाखल झाले. भाजपचे कामगार मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश सचिव प्रशांत तळवडेकर यांच्या पुढाकाराने आणि भाजप ठाणे जिल्हा अध्यक्ष संजय वाघुले यांच्या उपस्थितीत जगदीश गौरी यांचा आणि काँग्रेसचे इतर पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा भाजप पक्षात प्रवेश झाला. काँग्रेस मध्ये असताना आमची कुठलीही कामे होत नव्हती, काँग्रेसच्या अंतर्गत राजकारणाचा आम्हाला कंटाळा आला होता, त्यामुळे आम्ही सगळयांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याचे जगदीश गौरी यांनी यावेळी सांगितले. त्यांच्यासोबत काँग्रेसचे असंघटित कामगार ठाणे शहर सचिव दिनेश शिळकर, सामाजिक न्याय विभाग ठाणे शहर सचिव संदीप सूर्यवंशी, सुशांत धुळप, वार्ड अध्यक्ष संतोष झिमल तसेच काँग्रेसच्या इतर काही कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. यावेळी भाजप ठाणे शहर अध्यक्ष संजय वाघुले, ठाणे सरचिटणीस मनोहर सुगदरे, मंडळ अध्यक्ष सुदर्शन साळवी, कार्यकारणी सदस्य अरविंद कलवार, प्रभाग सदस्य गजानन परब, भाजप कामगार मोर्चा सचिव प्रशांत तळवडेकर, उत्तर भारती मोर्चा ठाणे जिल्हा उपाध्यक्ष लक्ष्मीकांत यादव, दिव्यांग सेल सचिव आमिन मिश्रा, महाराष्ट्र प्रदेश कार्यकारणी सदस्य हर्षला बुबेरा, कळवा मंडळ अध्यक्ष भूषण म्हात्रे, कळवा मंडळ अध्यक्ष अनुसूचित जाती मोर्चा नरेश गायकवाड उपस्थित होते.

# महापारेषणच्या आंतरमंडलीय नाट्य स्पर्धा मोठ्या जल्लोषात संपन्न

छत्रपती संभाजीनगर, दि. ३ : प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या आंतरमंडलीय नाट्य स्पर्धा 28 आणि 29 नोव्हेंबर 2024 रोजी संत एकनाथ रंगमंदिर, उस्मानपुरा येथे मोठ्या जल्लोषात संपन्न झाल्या. वीज क्षेत्रातील अधिकारी व कर्मचारी हे तातडीच्या सेवा कक्षेत येत असल्याने कायम एका तणावात असतात अत्यावश्यक सेवेत मोडल्या जाणाऱ्या क्षेत्रात काम करताना कर्मचाऱ्याच्या मनावर येणारा ताण कमी व्हावा व दैनंदिन कामात थोडासा विरंगुळा मिळावा तसेच कर्मचाऱ्यांच्या अंगी असणाऱ्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा यासाठी महापारेषण कंपनी एक वर्ष नाट्य स्पर्धा व दुसऱ्या वर्षी क्रीडा स्पर्धा अशा पद्धतीने दर दोन वर्षाला नाट्य स्पर्धेचे व क्रीडा स्पर्धेचे आलटून पालटून आयोजन करत असते कंपनीच्या या धोरणानुसार या वर्षी नाट्य स्पर्धाचे आयोजन करण्यात आले. छत्रपती संभाजी नगर परिमंडळातील विद्युत कर्मचाऱ्यांनी या स्पर्धेत उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवून आपल्या कसदार अभिनयाने आंतर मंडलीय नाट्य स्पर्धेद्वारे रसिकांची मन जिंकली.

नाट्य स्पर्धेचे उद्घाटन 28 नोव्हेंबर रोजी सुप्रसिद्ध चित्रपट कथा आणि पटकथा लेखक, नाटककार, आणि "चला हवा येऊ द्या" या लोकप्रिय कार्यक्रमातील पत्रलेखक श्री. अरविंद जगताप यांच्या हस्ते झाले.राजकारणातून व समाजकारणातून ज्या राजकीय व सामाजिक जनजागृतीच्या गोष्टी आपण जनसामान्यापर्यंत पोहोचू शकत नाहीत ते काम नाटकामार्फत सहज शक्य होते अशा शब्दात त्यांनी नाट्यकलेच्या महत्त्वावर प्रकाश टाकला. तसेच त्यांनी स्त्रियांच्या प्रती आदरभाव निर्माण करणाऱ्या पत्राचे वाचन करत श्रोत्यांचे मन जिंकले. पहिल्या दिवशी सकाळी 11:30 वाजता "अनपेक्षित" आणि सायंकाळी 5:00 वाजता "एका खटल्याची साक्ष" ही नाटके सादर झाली. दोन्ही नाटकांनी प्रेक्षकांना खिळवून ठेवले. 29 नोव्हेंबर रोजी सकाळी 10:00 वाजता "टेक अ चान्स" आणि दुपारी 3:30 वाजता "आज महाराष्ट्र दीन आहे" ही नाटके सादर झाली. सायंकाळी 6:30 वाजता झालेल्या पारितोषिक वितरण सोहळ्यासाठी संचालक प्रकल्प (प्रभारी) मा. श्री अविनाश निंबाळकर हे सांघिक कार्यालय येथून आवर्जून उपस्थित होते. कर्मचाऱ्यांचा रंगमंचावरील नाट्यकलेचा अविष्कार पाहून त्यांनी नाट्य कलाकारांचे भरभरून कौतुक केले




व पारितोषिक पटकवलेल्या सर्व कलाकारांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या, या उद्घाटन सोहळ्यासाठी मुख्य महाव्यवस्थापक मानव संसाधन (प्रभारी) श्री. मंगेश शिंदे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे या सोहळ्यासाठी सुप्रसिद्ध अभिनेता श्री. अंकित मोहन यांना आमंत्रित केले होते त्यांच्या "फर्जंद", "पावनखिंड" आणि "कुमकुम भाग्य" यांसारख्या कलाकृतींमधील अभिनयासाठी ते ओळखले जातात. जीवन जगायला अन्न वस्त्र व निवारा याची जेवढी आवश्यकता आहे त्यापेक्षा जास्त आवश्यकता आज विजेची आहे... अशा शब्दात त्यांनी विजेचे महत्व अधोरेखित केले व विद्युत क्षेत्रात काम करणाऱ्या प्रत्येक कर्मचाऱ्यांसाठी व त्यांच्या कार्याला माझा सॅल्यूट आहे असे म्हणून विद्युत कर्मचाऱ्यांच्या कामाचा गुणगौरव केला.

महापारेषण कंपनीच्या छत्रपती संभाजी नगर आंतर मंडलिय नाट्य स्पर्धेत चार नाटकांनी आपला सहभाग नोंदवला आणि छत्रपती संभाजीनगर परिमंडलातून"टेक अ चान्स" नाटकाने निर्मितीचे प्रथम पारितोषिक पटकावत प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले.

नाट्य संघाच्या वतीने प्रजीत नाईकवाडे, घनश्याम गायकवाड, श्रद्धा धनगे, व आकाश कळसे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

आंतर मंडलीय नाट्य स्पर्धा कार्यक्रमाचे प्रास्ताविक अधीक्षक अभियंता श्री. संजीव कांबळे यांनी केले. त्यांनी कर्मचाऱ्यांमध्ये सुसंवाद आणि कला जपण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्य अभियंता श्री. नसीर कादरी होते त्यांनी आपल्या भाषणात सर्व सहभागी कलाकारांचे अभिनंदन केले व विद्युत क्षेत्रातील प्रत्येक कर्मचारी कुठलेही काम खंडित न करता यशस्वीपणे नाट्य स्पर्धा ही पार पाडतात याबद्दल कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. तसेच या नाट्य स्पर्धे दरम्यान सर्व अधिकारी व कर्मचारी आपलं पद व हुद्दा विसरून अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात व एक संघपणे एक टीम म्हणून काम करतात. त्यामुळे त्या सर्व कर्मचाऱ्यांमध्ये संघभावना वृद्धिंगत होण्यास मदत होते ज्याचा सकारात्मक परिणाम दैनंदिन कार्यालयीन काम करताना दिसून येतो तसेच या नाट्य स्पर्धा चालू असतानाही जे कर्मचारी आपल्या नेमून दिलेल्या कार्यावर कार्यरत आहेत त्यांच्यासाठी जोरदार टाळ्या झाल्या पाहिजेत म्हणून कर्मचाऱ्यांच्या कार्याचा गुणगौरव केला व नाट्य स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी आयोजकांचे कौतुक केले. सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कल्याणी कुरकुटे, स्वप्ना मादनीकर, रोहिणी घनबहादुर यांनी केले तर आभार प्रदर्शन सुयोग बानाईत यांनी केले.

या स्पर्धेच्या यशस्वीतेकरिता नाट्यस्पर्धा आयोजन समितीचे सचिव अधीक्षक अभियंता श्री संजीव कांबळे, श्री रंगनाथ चव्हाण, श्री संजीव कुमार सुरडकर, श्री दत्ता जाधवर, श्रीमती अंजना ठक्कर सौ.मंजुषा दुसाने , सौ स्वाती यंबल, व आयोजन समितीतील सर्व कार्यकारी अभियंता, उपकार्यकारी अभियंते, सर्व तांत्रिक अधिकारी कर्मचारी, मानव व संसाधन अधिकारी कर्मचारी, वित्त व लेखा अधिकारी व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

महापारेषण मधील विद्युत कर्मचाऱ्यांच्या कलागुणांना वाव देणाऱ्या या स्पर्धेने कर्मचाऱ्यांना केवळ आपली कला सादर करण्याचा मंचच दिला नाही तर रसिकांना दर्जेदार नाट्यकलेचा आनंदही दिला. कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या नाट्यकलेच्या या अनोख्या प्रवासाने महापारेषण कंपनीची सांस्कृतिक बांधिलकी अधोरेखित केली.

# उद्धव ठाकरेंनी शब्द फिरवला

## संजय गायकवाडांच्या आरोपावर रविकांत तुपकरांचा खुलासा



■ महासागर प्रतिनिधी,

**बुलढाणा, दि.३ :** बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड यांनी शिवसेनेचे केंद्रीय मंत्री आणि भाजप आमदारावर गंभीर आरोप केले आहेत. माझ्या पराभवासाठी विरोधकांचे तिकीट देखील फायनल केले होते, असा आरोप संजय गायकवाड यांनी प्रतापराव जाधव आणि सचिन कुटे यांच्यावर केला आहे. या आरोपांबाबत रविकांत तुपकर यांनी खुलासा केला आहे. संजय गायकवाड यांनी केलेल्या आरोपात सत्यता असून हा सर्व घटनाक्रम मी अनुभवला असल्याचे तुपकर म्हणाले. रविकांत तुपकर म्हणाले की, संजय गायकवाड यांनी केलेले आरोप खरे आहेत. त्यांनी सांगितलेला सर्व घटनाक्रम मी अनुभवला आहे. महाविकास आघाडीत सहभागी होण्यासाठी आमची मातोश्रीवर बैठक झाली होती.

या बैठकीनंतर उद्धव ठाकरे यांनी मला एबी फॉर्म देखील दिला. मात्र, ऐनवेळी उद्धव ठाकरे यांनी शब्द फिरवला आणि मला नकार देण्यात आला. या सर्व प्रकरणाबाबत शिवसेनेचे नेते अनिल परब यांनाही माहिती असल्याचे रविकांत तुपकर म्हणाले.

### संजय गायकवाड खरे बोलणारे व्यक्तिमत्त्व

मला उमेदवारी मिळू नये यासाठी काही ज्येष्ठ नेत्यांनी महाविकास आघाडीतील दुसऱ्या पक्षातील लोक कामाले लावले. प्रतापराव जाधव यांना माझ्याबद्दल द्वेष आहे. २०१९ ला मी त्यांच्याविरोधात प्रचार केला होता. मला उमेदवारी मिळाली असती, तर प्रतापराव जाधव यांना भविष्यात जड गेले असते. संजय गायकवाड यांनी प्रतापराव जाधव यांच्यावर केलेले आरोप गंभीर आहेत. ते खरे बोलणारे व्यक्तिमत्त्व आहे. आपल्याच पक्षातील नेत्याने पुढे जाऊ नये यासाठी कशाप्रकारे कारस्थान रचले जाते, हे संजय गायकवाड यांनी समोर आणले, असेही रविकांत तुपकर म्हणाले.

### मविला अति आत्मविश्वास नडला

रविकांत तुपकर यांनी महाविकास आघाडीवर निशाणा साधला. लोकसभा निवडणुकीत मिळालेल्या यशामुळे महाविकास आघाडीला अति आत्मविश्वास आला होता. विधानसभा निवडणुकीत आमच्या सारख्या छोट्या घटक पक्षांना सोबत घेतले नाही. अतिआत्मविश्वासामुळे महाविकास आघाडीला विधानसभा निवडणुकीत यश आले नाही, अशी टीका तुपकर यांनी केली. आम्हाला सोबत घेतले असते, तर चित्र वेगळे असते, असेही ते म्हणाले.

### संजय गायकवाडांनी काय केला होता आरोप ?

माझ्याच पक्षातील प्रतापराव जाधव यांनी मिलिंद नार्वेकरांना फोन करून माझ्या विरुद्ध तुपकर यांच्या ऐवजी जयश्री शेळके यांना उमेदवारी देण्याचे सांगितले.

भाजपाच्या संजय कुटे यांनी कट रचून अनिल परब यांना संपर्क करून माझ्या विरोधात जयश्री शेळके यांना उमेदवारी दिली असा दावा संजय गायकवाडांनी केला. रविकांत तुपकरांचा एबी फॉर्म तयार होता, परंतु बुलढाण्यातील काहींनी मातोश्रीवर १० खोके पोहचवले आणि त्यांचा पत्ता कट झाला, असा आरोप शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी केला होता.

# राष्ट्र घडविण्याची नागरिकांचीच जबाबदारी-डॉ.देविदास घोडेस्वार

### संविधान दिनानिमित्त विद्यापीठात व्याख्यानमाला संपन्न





■ महासागर प्रतिनिधी,


**अमरावती, दि. ३:** संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या उद्देशिकेमधूनच सर्वप्रथम आम्ही भारताचे लोक असा उल्लेख करुन भारतातील नागरिकांना प्रथम प्राधान्य देत राष्ट्रनिर्मितीची घोषणा केली. सामाजिक, आर्थिक, राजकीय न्याय, दर्जा, बंधुता, समानसंधी, अभिव्यक्ती स्वातंत्र्य या तत्वावर उद्देशिकेची निर्मिती करण्यात आली आहे. राज्यांनाही संविधानाने मार्गदर्शक तत्वे घालून दिलेली आहेत व मूलभूत हक्काशिवाय लोकशाही यशस्वी होणार नाही, त्यामुळे आता राष्ट्र घडविण्याची जबाबदारी नागरिकांचीच आहे, असे प्रतिपादन नागपूर येथील सुप्रसिध्द व्याख्याते डॉ. देविदास घोडेस्वार यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राच्यावतीने विद्यापीठ परिसरातील डॉ. श्रीकांत जिचकार स्मृति संशोधन केंद्राच्या सभागृहामध्ये संविधानाची उद्देशिका, मूलभूत हक्क, मार्गदर्शक तत्वे आणि प्रासंगिकता या विषयावर व्याख्यान देतांना ते बोलत होते. विचारपीठावर अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरूडॉ. महेंद्र ढोरे, प्रमुख अतिथी म्हणून व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. व्ही.एम. मेटकर, अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष बनसोड, डॉ. घोडेस्वार पुढे म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धार्मिक, भाषिक बाबी कायम ठेवून राष्ट्रनिर्मिती केली. सर्वोच्च न्यायालयाने देखील संविधानाच्या उद्देशिकेला अतिशय महत्व दिले आहे. उद्देशिकेमधील प्रत्येक शब्द, क्रम, महत्व, अर्थपूर्ण आहे. त्यामुळे भारतीय नागरिकांसाठी उद्देशिकेचे अनन्यसाधारण महत्व आहे. सर्वसमावेशक अशी उद्देशिका असून संविधान निर्मितीवेळी जी परिस्थिती होती, ती पूर्णपणे बदलली असे म्हणता येणार नाही, अशी प्रासंगिकताही डॉ. घोडेस्वार यांनी सांगितली. प्रमुख अतिथी डॉ. भैय्यासाहेब मेटकर म्हणाले, डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार जनसामान्यांपर्यंत पोहचविण्याचे कार्य होत आहे, ही अतिशय अभिमानास्पद बाब आहे. अभ्यास केंद्र निर्मितीचा उद्देश सफल होत आहे, असेही ते म्हणाले.

**संविधानामुळे आपण एकत्र आहोत -प्रकुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे**

अध्यक्षीय भाषण करतांना प्र-कुलगुरू म्हणाले, संविधानामुळेच आपण एकत्र आहोत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित लोकशाही आपल्याला निर्माण करावी लागेल. व्याख्यात्यांनी अतिशय सुंदररित्या संविधानाची उद्देशिका, मूलभूत हक्क, मार्गदर्शक तत्वे आणि प्रासंगिकता या विषयाला अनुसरुन मार्गदर्शन केले आहे. विद्यापीठात संविधान शिल्प उभारण्यासाठी अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष बनसोड यांनी केलेले प्रयत्न अभिनंदनीय आहेत, असेही ते म्हणाले. संत गाडगे बाबा व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन, मेणबत्ती प्रज्वलन करुन विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रास्ताविकातून अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष बनसोड यांनी कार्यक्रमाच्या आयोजनामागील भूमिका विषद केली. याप्रसंगी दिवंगत डॉ. बी.जी. खोब्रागडे यांना दोन मिनिटे मौन पाळून सामुहिक श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. संचालन डॉ. अभिजित इंगळे यांनी तर आभार डॉ. रत्नशील खोब्रागडे यांनी मानले. व्याख्यान कार्यक्रमाला परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, शिक्षक, कर्मचारी, अमरावती शहरातील गणमान्य नागरिक, महिलावर्ग, विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप झाला.

# डॉ. प्रकाश आंबेडकर यांच्या स्वाक्षरीने ईएमवी हटाव मोहीमेची सुरुवात

## जनआंदोलन उभारण्याचा प्रयत्न



■ महासागर प्रतिनिधी,

**अकोला, दि. ४ :** वंचित बहुजन आघाडीच्या ईएमवी विरोधात स्वाक्षरी मोहीमेला वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. प्रकाश आंबेडकर यांनी स्वाक्षरी करत सुरुवात केली. त्यांनतर अकोला येथे वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांकडून स्वाक्षरी करण्यात आली.

वंचित बहुजन आघाडीच्या वतीने राज्यभरात ईएमवी विरोधी जनआंदोलनाची हाक देण्यात आली आहे. स्वाक्षरी मोहिमेपासून सुरुवात करून टप्प्याटप्प्याने हे आंदोलन तीव्र करण्यात येणार आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रविवारी पुणे येथे झालेल्या राज्य कार्यकारिणी बैठकीत हा निर्णय घेण्यात आला असून ३ ते १६ डिसेंबर पर्यंत राज्यात ईएमवी विरोधी स्वाक्षरी मोहीम राबविण्यात येणार आहे.

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. बाळासाहेब आंबेडकर यांनी व्हिडिओच्या माध्यमातून राज्यातील मतदारांना ईएमवी विरोधात स्वाक्षरी मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. २००४ पासून ड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वात विरोधात आंदोलन करण्यात येत आहे.

ईएमवी च्या विरोधात न्यायालयीन लढाई सुद्धा ते लढत आहेत. पत्रकार परिषदेच्या ईएमवी ईएमवी माध्यमातून मधील अनेक घोळ त्यांनी माध्यमासमोर मांडले आहेत. ईएमवी च्या विरोधात आरपारची लढाई लढण्याचा निर्णय वंचित बहुजन आघाडीने घेतला आहे.

### एकही आमदार नाही मात्र, युतीला फायदा

विधानसभा निवडणुकीत प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीला एकाही जागेवर यश मिळाले नाही. मात्र, वंचितमुळे महायुतीचा एक-दोन नव्हे, तर तब्बल २० जागांवर फायदा झाल्याचे समोर आले आहे.

तर शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे ८, उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे ६ आणि काँग्रेसचे ६ उमेदवार पडलेत. विधानसभेत आलेल्या भाजपच्या आणि लाडक्या बहिणीच्या लाटेत मुस्लीम मतदार वंचितच्या पाठीमागे मोठ्या संख्येने उभा राहिल्याचे दिसून आले. याचा फटका मात्र महाविकास आघाडीला बसल्याचे दिसले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा विभागात संविधान दिन साजरा



■ महासागर प्रतिनिधी,

**अमरावती, दि. ३ :** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा विभागात संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागाचे समन्वयक डॉ. रत्नशील खोब्रागडे, प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठाचे माजी परीक्षा नियंत्रक डॉ. बी.आर. वाघमारे, डॉ. वामन गवई, डॉ. पवनकुमार तायडे, प्रा. सुरेश पवार, प्रा. रामचंद्र वरघट, प्रा. संदीप राऊत उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. बी.आर. वाघमारे, डॉ. वामन गवई, प्रा.संदीप राऊत, डॉ. पवनकुमार तायडे, प्रफुल्ल कडू यांनी संविधानाविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषण करतांना डॉ. रत्नशील खोब्रागडे म्हणाले, संविधान दिनाचा अमृत महोत्सव देशभरात साजरा होत आहे. संविधानातील मूलभूत अधिकाराविषयी त्यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली. त्याचबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अर्थशास्त्रीय दृष्टीकोन कसा होता, याविषयी देखील त्यांनी मार्गदर्शन केले. संविधान दिनाचे औचित्य साधून श्री खुशाल ढवळे यांनी भारतीय घटनेचा तू शिल्पकार आहे हे गीत सादर केले. तर प्रा. रामचंद्र वरघट यांनी संविधान दिनाची पार्श्वभूमी विषद केली. प्रास्ताविक आदिनाथ अंभोरे, सूत्रसंचालन अभ्यास मंडळाचे उपाध्यक्ष बापुराव वानखडे यांनी, तर आभार प्रशिक स्थुल यांनी मानले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# यहोवा यिरे फाऊंडेशन व कलाजीवन बहुउद्देशीय संस्थेद्वारा एक दिवसीय रोजगार संधी व उद्योजक मेळावा संपन्न





■ महासागर प्रतिनिधी,

**गडचिरोली, दि. ३ :** यहोवा यिरे फाऊंडेशन व कलाजीवन बहुउद्देशीय संस्था यांच्या व विशेष सहकार्य महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र गढ़चिरोली प्रस्तुत एक दिवसीय रोजगार संधी व उद्योजक मेळावा आणि महाराष्ट्र आयकॉन पुरस्कार , निवासी उद्योजकता विकास येणाऱ्या १८ डिसेंबर ला नागपूर मध्ये प्रशिक्षण कार्यक्रम या प्रशिक्षण कार्यक्रम चे प्रमोशन व तसेच बैकीग क्षेत्रात रोजगार कसा मिळेल व उधोग कसा उभारण्यात येइल या वर चर्चासत्र दि.३० नोव्हेंबर २०२४ रोजी शनिवार ला आर.के.सेलिब्रेशन हॉल गडचिरोली मध्ये सपन झाला.त्या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून श्री.महेंद्र चव्हाण वरीष्ठ पोलीस अधीक्षक नंदुरबार, भैय्याजी येरमे सहाय्यक आयुक्त कौशल्य विकास केंद्र चंद्रपुर, डॉ. रमेशकुमार बोरकुटे सि ई ओ यहोवा यिरे फाऊंडेशन, के. पी.टाकले जिल्हा प्रकल्प समन्वयक एमसीईडी गढ़चिरोली, नारायण गंन्धेवार सेवा निवृत्ती पोलिस अधीक्षक गडचिरोली, गजानन मान्देश्वर सिनियर मॅनेजर ग्रामीण कोकण बैक गडचिरोली, डॉ.युवराज ठाकरे कला जीवन बहुउद्देश्यीय संस्था वरूड चे अध्यक्ष,कु एलिजा बोरकुटे यहोवा यिरे फाऊंडेशन च्या अध्यक्ष चंद्रपूर, डि.के.अरीकर जेष्ठ पत्रकार चंद्रपूर, सौ. शिल्पा शाहीर मराठी अभिनेत्री व लावणी क्वीन नागपूर, कु.जयश्री सोलके प्रसिध्द गायीका अमरावती, कु.एंजल इ. सि.एच.ओ.अध्यक्ष बडोदा.व प्रमुख पाहुण्यांसह मानेवराच्या उपस्थितित रोजगार मेळा व महाराष्ट्र आयकॉन पुरस्कार संपन्न झाला यात ५०० हुन अधिक बेरोज़गार युवक युती व पुरस्कारी पार्टीसिपेट ने सहभाग होऊन या एक दिवसीय प्रशिक्षण व कार्यक्रमा चा लाभ घेतला व उपस्थिति दर्शविली.

# कृषि महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारावर प्रक्रियायुक्त पदार्थ विक्री केंद्र सुरू




**अकोला :** वैदर्भीय शेती शाश्वत आणि शेतकरी संपन्न होण्यासाठी सेवारत आणि अकोला शहरासाठी भूषण असलेल्या डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाने अकोलेकरांना आर्थिक, सामाजिक, स्वास्थविषयक उपलब्धी भरभरून दिल्या असून, त्यात आता विद्यापीठ निर्मित विविध उत्पादने तथा प्रक्रियायुक्त पदार्थांच्या अजून एका विक्री केंद्राची भर पडली असून, अकोलेकरांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी केले.

कृषी महाविद्यालय अकोलाच्या राष्ट्रीय महामार्गावरील क्रीडांगणाच्या समोरील बाजूच्या प्रवेशद्वाराचे बाजूला विद्यापीठ उत्पादित निविष्ठा विक्री केंद्राचे उद्घाटन नुकतेच कुलगुरू डॉ. शरद गडाख यांच्या हस्ते झाले त्याप्रसंगी उपस्थितांसोबत संवाद साधतांना ते बोलत होते. याप्रसंगी विद्यापीठाचे अधिष्ठाता कृषी डॉ. शामसुंदर माने, संशोधन संचालक डॉ. विलास खर्चे, विस्तार शिक्षण संचालक डॉ. धनराज उंदीरवाडे, कुलसचिव डॉ. सुधीर राठोड, कृषी महाविद्यालय अकोला चे सहयोगी अधिष्ठाता डॉ. राजेंद्र गाडे, डॉ. राजेंद्र काटकर, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. संदीप हाडोळे उपस्थित होते. या विक्री केंद्रावर कृषी महाविद्यालयातील उद्यानविद्या आणि कृषी अभियांत्रिकी शाखा द्वारा उत्पादित फळे, भाजीपाला, फुले व कडधान्य जसे ज्वारी बाजरी नाचणी आदींपासून तयार केलेले व उपलब्ध असलेले प्रक्रियायुक्त पदार्थ , वेगवेगळे सिरप, जाम,जेली, टॉफी, लोणचे, चटणी, केचप, कुकीज, पाव, ब्रेड, टोस्ट, खारी, करडई तेल, शेंगदाणा तेल, जवस तेल आदी विद्यापीठ उत्पादने विक्रीस उपलब्ध राहणार असल्याचे डॉ. राजेंद्र गाडे यांनी याप्रसंगी सांगितले.

# विजयनगरात बंद घरात गॅस सिलिंडरचा स्फोट

### कष्टकरी कुटुंबांच्या संसाराची राखरांगोळी



■ महासागर प्रतिनिधी,

**अकोला, दि. ४ :** येथील देशमुख फैल भागालगतच्या विजय कॉलनीतील बजरंग चौकात बंद घरातील गॅस सिलिंडरचा अचानक स्फोट झाल्याने तीन घरांना आग लागली. सोमवारी दुपारी साडेबाराच्या सुमारास ही भीषण आग लागली. सुदैवाने यामध्ये जीवितहानी टळली. मात्र, तीन घरामधील संसारोपयोगी वस्तू जळून खाक झाल्याने मोठे नुकसान झाले. अग्निशामक दलाच्या बंबांच्या साह्याने तासाभरात आगीवर नियंत्रण मिळवण्यात जवानांना यश आले. गॅस सिलिंडर फुटून संसाराची राखरांगोळी होण्याची गेल्या सहा महिन्यातील ही दुसरी घटना आहे. सहा महिन्यापूर्वी शिवसेना वसाहतीत अशाच प्रकारे गॅस सिलिंडरचा स्फोट होऊन तीन घरे जळून त्यांचा संसार उघड्यावर आला होता. शहरातील विजयनगरातील बजरंग चौकात असलेल्या निर्मलाबाई नंदूसिंग निंबे यांच्या घरातील गॅस सिलिंडरचा अचानक स्फोट झाला. त्यामुळे या घराला आग लागली. घरातून धूर आणि जळण्याचा वास येऊ लागला. काही वेळात आगीने रौद्र रूप धारण केले. परिसरातील नागरिकांनी मिळेल तेथून पाणी आणून, आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, आग जास्त प्रमाणात असल्याने शेजारील संजय शामराव ढवळे आणि अक्षय गजानन अरुळकर असलेल्या दोन घरांना या आगीने कवेत घेतले. टिनपत्रे आणि लाकडी पार्टिशनची घरे असल्याने आग झपाट्याने पसरली. तोपर्यंत अग्निशामक दलाचा बंब दाखल झाला. शेजारील राजेश भाऊराव धामोडे व रवी श्रीधर गायकवाड व संजय शामराव ढवळे या अन्य दोन घरांनाही आगीची झळ बसली. गॅस सिलिंडरच्या स्फोटाच्या दणक्याने घरांचे पत्रे शेजारच्यांच्या घरावर उडाली. तीन घरांचे प्रचंड तर दोन घरांचे अंशत: नुकसान झाले. एक तासांच्या शर्थीच्या प्रयत्नाने महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या जवानांनी आगीवर नियंत्रण मिळवले. मंडळ अधिकारी नंदकिशोर माहोरे यांनी आगीच्या घटनेचा पंचनामा केला. आगीच्या भक्ष्यस्थानी पडलेल्या तिन्ही कुटुंबातील सर्वजण मोलमजुरीसाठी बाहेर असल्याने घरांना कुलूप होते. स्फोट झाला त्यावेळी या घरातील सर्व सदस्य बाहेर असल्याने मोठी जीवितहानी टळली. या सर्व कुटुंबीयांचे नशीब बलवत्तर असल्याने सर्वजण वाचले. मात्र, या कुटुंबांचे घरातील पंखे, कुलर, मिक्सर, फ्रीज, टीव्ही, पलंग, गाद्या, कपडे, भांडी कुंडी आदी संसारोपयोगी साहित्य आगीत भस्मसात झाल्याने या कुटुंबीयांवर बेघर होण्याची दुर्दैवी वेळ आल्याने विजयनगर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. फर्स्ट पर्सन (छाया ढवळे, विजयनगर) अशी लागली आग दुपारी साडेबाराची वेळ असेल. मी घरात चुलीवर चहा ठेवत होते. तेवढ्यात आग लागली, आग लागली, असे आमच्या गल्लीतला एक मुलगा मोठमोठ्याने ओरडू लागला. त्यानंतर घराबाहेर पाहिले असता शेजारील बंद असलेली तीन घरे आगीच्या लपेटात आली होती. आम्ही आरडोओरड करताच परिसरातील तरुण मुले धावत आली. मुले व नागरिकांनी मिळेल तेथून पाणी आणून आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला, तोपर्यंत आगीची धग शेजारच्या आणखी दोन घरांपर्यंत पोहोचली. तीन घरांची अक्षरश: राखरांगोळी झाली. परिसरातील तरुणांनी सर्वप्रथम आम्हा आजुबाजुच्या रहिवाशांना, महिला, मुलाबाळांना घराबाहेर ओढले. प्रथम आग लागली आणि त्यानंतर सिलिंडर फुटून ते शेजारच्या घरावर उडाले. आग लागलेल्या घरांना लागून असलेल्या पाच-सहा घरांतील गॅस सिलिंडर मुलांनी दूरवर नेऊन ठेवले. त्यामुळे पुढील अनर्थ टळला.

गॅस सिलिंडरची अशी घ्यावी काळजी नागरिकांनी गॅस सिलिंडरचे रेग्युलेटर बंद करावे. वर्षातून एकदा गॅस सिलेंडरची नळी बदलावी. बाहेर जाताना घरातील विजेचे सर्व दिवे बंद करावेत. देवघरातील उदबत्ती, तसेच दिवा लावत असल्यास तो बंद करावा. सुरक्षिततेसाठी गॅस सिलिंडर मोकळ्या जागेत ठेवावे. वापर झाल्यास गॅस बंद झाला का नाही, याची खात्री करावी. गॅसजवळ ज्वलनशील वस्तू ठेवू नये. गॅस सिलिंडर घरी सिंलिंडरच्या नळी कनेक्शनच्या जागेवर पाणी टाकून लिकेज चेक करावे. यामुळे गॅस गळतीने आग लागण्याच्या घटना रोखू शकतात.

**-गौतम झा, वरिष्ठ अधिकारी, भारत गॅस.**

### संसारोपयोगी साहित्य पडले आगीच्या भक्ष्यस्थानी

सिलिंडर गळतीमुळे आगीची शक्यता बजरंग चौकात असलेल्या निर्मलाबाई नंदूसिंग निंबे यांच्या घरातील गॅस सिलिंडर लिक असल्याने त्यातून गॅस गळती होत असल्याने वास येत होता.


**Change Of Name**

MY OLD NAME WAS **AMARJEET SINGH RESHAM SINGH.** NOW MY NEW NAME IS **AMARJEET SINGH RESHAM SINGH TAMBER.**
ADD : PLOT NO.48 NARI ROAD GURUTEG BAHADUR NAGAR NAGPUR- 440026

MY OLD NAME WAS **BHUPIDER.** NOW MY NEW NAME IS **BHUPIDER KAUR.**
ADD : PLOT NO.48 NARI ROAD GURUTEG BAHADUR NAGAR NAGPUR 440026

MY OLD NAME WAS **SARWAT NASREEN.** NOW MY NEW NAME IS **SARWAT NASREEN IFTEKHAR WASEEM.**
ADD : ISMAILPURA KAMPTEE NAGPUR

MY OLD NAME WAS **SANJAY JITMAL CHHAJED.** NOW MY NEW NAME IS **SANJAY JEETMAL CHHAJER.**
ADD : PLOT NO 39 NEAR VAISHNUDEVI SQUARE EAST WARDHAMAN NAGAR NAGPUR 440008

MY OLD NAME WAS **SUNITA CHHAJED.** NOW MY NEW NAME IS **SUNITA CHHAJER.**
ADD : PLOT NO 39 NEAR VAISHNUDEVI SQUARE EAST WARDHAMAN NAGAR NAGPUR 440008

MY OLD NAME WAS **PANDURANGJI PANDE.** NOW MY NEW NAME IS **PANDURANG PANDE.**
ADD : WARD NO 3 WAWRULI PO: MANGRULI DIST AMRAVATI 444908

# शिंदेंवर दबावाचे राजकारण ?

भाजप प्रणित महायुती सरकारच्या शपथविधीला अवघ्या एका दिवसाचा अवधी उरला आहे. पण महायुतीमधील खातेवाटपावरून सुरू झालेली राजकीय आदळआपट अद्याप संपली नाही. सर्वाधिक 132 जागा जिंकणारा भाजप एकीकडे राजकीय पटलावर आपले एकेक प्यादे हुशारीने पुढे सरकवत आहे, तर दुसरीकडे एकनाथ शिंदेही मुख्यमंत्री पदाच्या मोबदल्यात शिवसेनेला सरकारमध्ये एका मजबूत स्थितीत नेण्याचा प्रयत्न करत आहेत. यामुळेच महायुतीमध्ये महाविजयाच्या आनंदोत्सवाऐवजी एकमेकांविरोधात जोरबैठका सुरू आहेत.

----------------

मागील 10 दिवसांपासून सुरू असलेला घटनाक्रम पाहता महाराष्ट्राला भाजपचा मुख्यमंत्री मिळेल हे स्पष्ट झाले आहे. पण चेहरा कोण असेल? हे भाजपच्या बुधवारी होणाऱ्या विधिमंडळ पक्षाच्या बैठकीनंतरच स्पष्ट होईल.

पण या सर्वात एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होत आहे, तो म्हणजे एकनाथ शिंदे यांच्यावर दबावाचे राजकारण करण्याची वेळ का आली? शिवसेना नेते दीपक केसरकर यांचे 'एकनाथ शिंदे यांचे नेतृत्व मान्य केले जावे' हे विधान यासंबंधी फार बोलके असल्याचे मानले जात आहे.

**२०२४ मध्ये बदलली स्थिती**

महाराष्ट्राच्या राजकीय घटनाक्रमावर नजर ठेवणाऱ्या विश्लेषकांच्या मते, राजकारणात गरजेनुसार निर्णय घेतले जातात. जून 2022 मध्ये एकनाथ शिंदे यांना मोठे महत्त्व होते. भाजपने उद्धव ठाकरे यांना संपवण्यासाठी एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रीपदाची खुर्ची सोपवली होती. पण आता 2024 च्या विधानसभा निवडणुकीनंतर स्थिती पूर्णतः बदलली आहे.

भाजपला सर्वाधिक जागा मिळाल्या आहेत. विशेषतः महायुतीत शिंदेंच्या तोडीस तोड असणारा राष्ट्रवादी काँग्रेस हा मित्रपक्षही आहे. या मित्रपक्षाने भाजपला बिनशर्त मजबूत पाठिंबाही दिला आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, अजित पवारांनी देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या पाठिंब्यामुळे एकनाथ शिंदे यांची महायुतीमधील स्थिती दुबळी झाली आहे. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर त्यांची बार्गेनिंग पॉवर कमी झाली आहे. यामुळेच एकनाथ शिंदे यांच्यावर आपल्या मागण्या मान्य करण्यासाठी दबावाचे राजकारण करण्याची वेळ आली आहे. कधिकाळी अविभाजित शिवसेनेसाठी उद्धव ठाकरे हेच करत होते. त्यामुळे एकनाथ शिंदे एकप्रकारे उद्धव ठाकरे यांच्याच मागार्नें पुढे जात असल्याचेही मानले जात आहे.

**भाजपकडे समाधानकारक संख्याबळ**

राजकीय वर्तुळात शिवसेना महायुती सरकारला बाहेरून पाठिंबा देण्याचीही शक्यता व्यक्त केली जात आहे. पण भाजपकडे स्वतःच्या 132 जागा आहेत. एका अपक्षानेही त्यांना पाठिंबा दिला आहे. याशिवाय अजित पवारांचे 41 आमदारांचा भक्कम पाठिंबा त्यांच्यासोबत आहेत. त्यामुळे भाजपला बहुमताचा जादुई आकडा गाठण्यात कोणतीही अडचण येणार नाही. या स्थितीत




शिवसेनेने महायुती सरकारला बाहेरून पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला, तर भाजपपेक्षा एकनाथ शिंदे यांनाच सर्वाधिक फटका बसेल. सत्तेच्या वाटणीत मिळणारा वाटाही गमावण्याची वेळ त्यांच्यावर येईल. एकनाथ शिंदे यांना हे अपेक्षित नव्हते, अशी चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

अजित पवार या बाबतीत दोन पावले पुढे जातील. अजित पवारांच्या भाजपवरील वाढत्या प्रेमाने शिंदे यांना अडचणीत आणले आहे. यामुळे शिवसेनेला भाजपवर आणखी जास्त दबाव टाकता येणार नाही. त्यातूनच भाजपने शिवसेनेला गृह खाते देण्याच्या आघाडीवर अद्याप कोणताही निर्णय घेतला नाही. भाजपला हे महत्त्वाचे खाते स्वतःकडे हवे आहे. महाराष्ट्रात 1995 पर्यंत गृहखाते मुख्यमंत्र्यांकडेच राहिले, पण त्यानंतर ते मित्रपक्षांकडे गेले.

**शिवसेनेला हवे आहे सत्ता संतुलन**

शिवसेनेच्या मते, आपल्या पक्षाला गृह खाते मिळाले तर सरकारमध्ये एक सत्ता संतुलन निर्माण होईल. मुख्यमंत्री भाजपचा व गृहमंत्री शिवसेनेचा. कारण, अर्थ मंत्रालय पुन्हा एकदा भाजपच्या ताब्यात जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे अजित पवारांच्या डावपेचांमुळे सत्तेच्या चक्रव्युहात अडकलेले एकनाथ शिंदे त्यातून कसे बाहेर पडतात? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

तूर्त, महाराष्ट्रात भाजपचा मुख्यमंत्री होईल. अजित पवार सहाव्यांदा उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतील. शिवसेनाही सरकारमध्ये सहभागी होईल. पण अजित पवारांच्या तुलनेत शिंदे व देवेंद्र फडणवीस यांना सत्तेचा फारसा अनुभव नाही. त्यामुळे पवार महायुती सरकारमध्ये आपल्या हिशेबाने पॉवरगेम खेळत आहेत. ते भाजपच्या मुख्यमंत्र्याला केवळ पाठिंबाच देत नाहीत, तर शिवसेनेला मागे टाकून स्वतःच्या पक्षासाठी सत्तेचा अधिकाधिक वाटा मिळवण्याचाही प्रयत्न करत आहेत.

विधानसभेत भाजपला सर्वाधिक 132 तर शिवसेनेला 57 व राष्ट्रवादी काँग्रेसला 41 जागा मिळाल्यात. विरोधी बाकावरील उबाठाला 20 जागा तर काँग्रेसला 16, तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला अवघ्या 10 जागांवर समाधान मानावे लागले आहे.

**महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदाचा फैसला आज होणार**

राज्याचा मुख्यमंत्री नक्की कोण होणार याचा निर्णय झालेला नाही. या दरम्यान केंद्रीय निरीक्षक म्हणून महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आलेल्या विजय रुपानी यांनी एक महत्वाची घोषणा केलेली आहे. उद्या बुधवारी भाजपाच्या विधिमंडळ पक्षाच्या नेत्याची निवड केली जाणार आहे. आणि भाजपाच्या पक्ष श्रेष्ठींना या संदर्भात कळवले जाईल. विधीमंडळ नेत्याच्या निवडीनंतर महाराष्ट्राचा नवा मुख्यमंत्री कोण याचे चित्र स्पष्ट होणार आहे.

महाराष्ट्रात भाजपा प्रणित महायुतीला मोठा विक्रमी विजय मिळाला असला तरी मुख्यमंत्री पदाचे नाव निश्चित झालेले नाही.महाराष्ट्रात ५ डिसेंबर रोजी नवीन मुख्यमंत्री शपथ होणार आहे. त्यामुळे सर्वांची नजर आज होणाऱ्या भाजपाच्या विधीमंडळ पक्षाच्या बैठकीकडे लागली आहे.

भाजपाच्या विधीमंडळ पक्षाची बैठक ४ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे. त्या बैठकीत मुख्यमंत्री पदाच्या नावावर शिक्कामोर्तब होणार आहे. भाजपाने या बैठकीला केंद्रातून केंद्रीय निरीक्षक म्हणून केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आणि गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपानी यांना पाठविले आहे.

**प्रथम हायकमांडला निर्णय सांगू**

महाराष्ट्र भाजपा विधिमंडळ पक्षाची बैठक होईल. त्याआम्ही चर्चा विनिमय करु. त्यानंतर सर्व संमतीने विधीमंडळ पक्ष नेत्याची निवड होईल. नावाची घोषणा करण्यापूर्वी पक्ष श्रेष्टींना कळविले जाईल. त्यानंतर नावाची घोषणा होईल. आमच्या पक्षश्रेष्ठींनी तिन्ही घटक पक्षांशी चर्चा केलेली आहे त्यामुळे यात काही अडचण नाही. सर्वकाही सुरळीत आणि सर्व संमतीने होईल, असे विजय रुपानी यांनी म्हटले आहे.

**संजय राऊत यांचा हल्ला**

महाराष्ट्रातील सत्तास्थापने होणाऱ्या दीरंगाई बाबत शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी भाजपावर हल्लाबोल केला आहे.

ते म्हणाले की एकनाथ शिंदे हे महाराष्ट्राचे काळजीवाहू मुख्यमंत्री आहेत. एक मुख्यमंत्री कसा काय ? गायब होऊ शकतो. महाराष्ट्रात खेळ चालून आहे. दहा दिवस झाले आहे. महायुतीकडे प्रचंड बहुमत आहे.तरीही अजून मुख्यमंत्र्याचे नाव जाहीर करत नाहीत. आता पर्यंत राज्यपालाकडे सरकार स्थापन करण्याचा दावा केलेला नाही. हा सर्व दिल्लीचा खेळ आहे. महाराष्ट्रात ज्या मर्कटलीला चालू आहेत त्या दिल्लीतून चालत आहेत असेही ते म्हणाले.

**अजित पवार दिल्लीत दाखल**

या दरम्यान राष्ट्रवादीचे नेते अजितदादा पवार दिल्लीत दाखल झाले आहेत. ते भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांची भेट घेणार असल्याचे सांगण्यात येते. तर भाजपा नेते देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्ती गिरीश महाजन यांनी काल ठाण्यात एकनाथ शिंदे यांनी भेट घेतली आहे. त्यानंतर मिडीयाशी बोलताना गिरीश महाजन यांनी महायुती कोणतेही मतभेद नसल्याचे स्पष्ट केले.

●●●●●●●●●●

# महाराष्ट्राच्या राजकारणातील परिवारवादाची वाटचाल संपुष्टाकडे ?

राजेशाहीत राजा राणीच्या पोटातून जन्म घेतो तर लोकशाहीत राजा हा मतपेटीतून जन्म घेतो हे लोकशाहीचं खरं मुल्य आहे. संविधानाला हे परिवर्तन अपेक्षित होतं.

परंतु परिवारवादी राजकारणामुळे सत्ताधारी वर्ग हा मतपेटीतून नव्हे तर काही राजकीय मक्तेदारांच्या पोटातून जन्म घेतांना दिसतो ही बाब लोकशाही व संवैधानिक मूल्यासाठी मारक ठरणारी आहे. त्यामुळे लोकशाही वाचवण्यासाठी राजकारणातील परिवारवाद संपुष्टात आणण्याचा चमत्कार विधानसभेच्या निवडणुकीत जनतेनी केला यातून परिवारवादी राजकारण्यांनी धडा शिकण्याची गरज आहे.

गेल्या अनेक दशकांपासून महाराष्ट्रातील राजकारण हे पवार आणि ठाकरे परिवाराच्या परिवराभोवती फिरत असल्याचे आपल्याला पाहायला मिळत आहे. ही दोन्ही घराणी एकमेकांना सांभाळून घेत आणि दुसऱ्याच्या कार्यक्षेत्रात हस्तक्षेप टाळून आपापले हितसंबंध जपत आले आहेत, हे सर्वश्रुत असून महाराष्ट्राच्या राजकीय वतुर्ळात गेली अनेक वर्षे याची चर्चा राहिली आहे.

महाराष्ट्राचे राजकारण ठाकरे आणि पवार याच दोन घराण्यांबाबत फिरत राहिले होते. या दोन्ही घराण्यांनी आपले एक जाळे तयार केले होते. याच माध्यमातून ते स्वतःचे राजकारण पुढे रेटायचे.

अखेर याचा परिणाम असा झाला की या दोन्ही परिवाराचे विभाजन होऊन महाराष्ट्रात एका नव्या यशस्वी राजकारणाला सुरुवात झाली. नुकत्याच पार पडलेल्या विधान सभेच्या निवडणुकीवरून हे स्पष्ट झाले आहे.

बाळासाहेब ठाकरेंच्या निधनानंतर शिवसेनेचा कारभार उद्धव ठाकरे यांच्याकडे आला. त्यांना राजकारणाचे बाळकडू जन्मजात मिळाले असले तरी ते त्यात पूर्णपणे यशस्वी होऊ शकले नाही. परिणामी शिवसेनेचे दोन तुकडे झाले.

दुसरीकडे राजकारणात चाणक्य म्हणून ओळखले जाणारे शरद पवार यांनी आपल्या राजकारणाला विराम न घालता किंवा आपली सूत्रे पुतण्या अजित पवारांकडे न सोपविता आपला राजकारणातील प्रवास अविरत सुरूच ठेवला. शरद पवार यांनी राजकारणातून स्वेच्छा निवृत्ती घ्यावी, अशी राज्यातील जनमानसात चर्चा होती तसे बोलूनही दाखविले जात होते. शेवटी व्हायचे तेच झाले.आज दोन्ही पक्ष हिंदूविरोधी असल्याची भावना जनतेमध्ये आहे.

पवार यांचा विचार कालबाह्य झाला आहे. या बरोबरीने त्यांचे वय आता त्यांना साथ देत नाही. वास्तविक पवार यांनी यापूर्वीच सक्रिय राजकारणातून निवृत्ती घेणे अपेक्षित होते म्हणजे आयुष्यातील सर्वात मोठा अपमान आणि अपयश यापासून ते वाचले असते.

उद्धव यांना हिंदूद्रोहाची मोठी किंमत द्यावी लागली तर हिंदू जागृतीने पवार यांच्या पक्षाचा पालापाचोळा करून टाकला आहे. पवार यांच्या ६० वर्षांच्या कारकिर्दीतील सर्वात अपमानकारक पराभव आता २०२४ मधे झाला आहे.

उद्धव यांचीही तीच अवस्था आहे.

**संतोष लांजेवार**
**वरिष्ठ पत्रकार**
**मानकापूर, नागपूर.**
**मो. ७३८७३८००२२**

दोघांनाही पक्ष सांभाळण्याचे आणि तो वाढविण्याचे आव्हान आहे. परंतु, परिवारवादामधे अडकलेल्या या पक्षांची स्थिती सुधारण्याची कोणतीही चिन्हे आज तरी दिसत नाही.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत "हिंदुत्व हा एक मुद्दा गेल्या अनेक वर्षांपासून धुमसत होता, ते राजकीय तज्ञांना जरा उशीराच कळले. हिंदुत्वाच्या या भारलेल्या वातावरणात एका महत्वाच्या पैलुकडे दुर्लक्ष झाले आहे. त्याचा परिणाम जातीय जाणिवा बाजूला सारून हिंदू ऐक्याचे दर्शन समोर आले. याचा अनुभव महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीने प्रत्ययास आला आहे.

विशेष म्हणजे या राजकीय समजूती गैरसमजुतीमुळे महाराष्ट्राची विकासाची गती मंदावली. महाराष्ट्रात नवीन राजकीय नेतृत्वाचा उदय झाला नाही. जे नेते या ताकतीचे होते, त्यांना अपमान सहन करून कशीबशी वाटचाल करावी लागली. अनेक नेत्यांना राजकारणातून संन्यास घ्यावा लागला. राज ठाकरे, नारायण राणे, मनोहर जोशी, सुधीर जोशी, दिवाकर रावते, मधुकर सरपोतदार, मोहन रावले अशी अनेक नावे शिवसेनेच्या संदर्भात घेत येईल.

पवार यांच्या कौटुंबिक राजकारणाचे अनेक बळी त्यांच्याच पक्षात आहेत. अजित पवार, आर आर पाटील, जयंत पाटील, सुनील तटकरे, छगन भुजबळ ही नावे पवार यांच्या परिवारवादी राजकारणाचे बळी ठरले.

अर्थात, त्यांना संधी मिळालीच असती तर महाराष्ट्राच्या राजकारणात फार काही आमूलाग्र बदल झाला नसता. परंतु, त्यामधे थोडातरी बदल झाला असता.

परिवार वादाच्या राजकारणामधे जनतेपेक्षा कुटुंबाला प्राधान्य मिळते. लाव्हासा हे त्याचे अत्यंत चपखल उदाहरण आहे. मुंबई महानगरपालिकेच्या अनेक कंत्राटाबाबत दबक्या आवाजात ठाकरे कुटुंबाबात बोलले जाते. यातूनच भष्टाचाराला उत्तेजन मिळते. ठाकरे यांची तिसरी पिढी आता राजकारणात सक्रिय आहे तर पवार यांची चौथी. राजकीय हव्यासापोटी या दोन्ही कुटुंबामध्ये कलह निर्माण झाले.

पवार यांनी प्रदीर्घ काळ आपल्या परिवाराला एकत्र ठेवले. परंतु, त्यांच्याच हयातीत त्यांना कुटुंबातील फुट बघायला मिळाली. बाळासाहेब ठाकरे हेसुद्धा याला अपवाद ठरले नाहीत. पवार आणि ठाकरे यांचे हे अनुभव परिवारवादी राजकारणाच्या मर्यादा स्पष्ट करतात. दुर्दैवाने, पवार आणि ठाकरे या दोघांचेही राजकारण हिंदू समाजात फुट पाडणारे होते. पवार कायम डाव्यांच्या वैचारिकतेने चालले. संभाजी ब्रिगेड नावाची विषवल्ली त्यांनी महाराष्ट्राच्या मातीत रोवली. जातिजातीत भांडणे लावली.

ठाकरे यांनी वारंवार मराठी-अमराठी वाद उकरून काढून स्वत;चे राजकारण केले. हिंदुत्ववादी भूमिका घेतल्यानंतर त्यांचे मूळ उद्दिष्ट काहीसे बाजूला ठेवले. मात्र महाराष्ट्राचा बुद्धिभेद करण्याचे उद्योग त्यांनी कायम चालू ठेवले.

निवडणुकीनंतर राज आणि उद्धव एकत्र येतील अशी हवा पसरविण्यात आली होती. दोघांमधे विस्तव आडवे जाते. उद्धव ठाकरे तर 'एकला चलो रे' असा त्यांचा स्वभाव आहे.

राज यांच्याशी सामंजस्याने जुळवून घेताना करावी लागणारी कसरत ते कधीही मान्य करणार नाहीत. त्यांचा स्वभाव अख्ख्या महाराष्ट्राला परिचित आहे. राज यांच्याविषयी जनतेमध्ये सहानुभूती तर आहेच हे त्यांच्या जाहीरसभेमध्ये दिसून येते, परंतु ऐन निवडणुकीच्या वेळी ती सहानुभूती कुठे जाते हे कळायला मार्ग नाही.

बदललेला समाज आणि राजकारण याचे दोघांनाही भान नाही. त्यामुळे हे दोन्ही नेते काळाच्या ओघात संपुष्टात येण्याची शक्यता अधिक आहे.महाविकास आघाडीच्या अपयशानंतर आज शरद पवार यांना नाही ते बोलले जात आहे. अशी वेळ पवार यांनी परिवारवादामुळे ओढवून घेतल्याचे दिसून येत आहे.

या निवडणुकीत अनेकांचे राजकीय गणित बिघडले. पवार यांना केवळ दहा जागा मिळाल्या तर उद्धव यांना फक्त वीस जागांवर समाधान मानावे लागले.

दोघांचीही पत कशीबशी वाचली आहे. आता पाच वर्षे तरी पुढे कोणतीही निवडणूक नाही. पुढील भविष्य मात्र अंधकारमय दिसून येत आहे. राजकारणात नव्याने उभारी घेण्यासाठी त्यांना आता 'अल्लादिनचा चिराग ' शोधावा लागेल.

●●●●●●●●●●

# हा बदल नक्की केंव्हा झाला ?

वीस पंचवीस वर्षांपूर्वी नोकरी करणारा मुलगा पगार निमूटपणे वडिलांच्या हातात देत होता.... ! मग वडील त्यातून घरातला काही खर्च करायचे, थोडी बचत केली जायची आणि मुलाला येण्याजाण्याच्या तिकीटापुरते आणि दिवसाला फार तर एक चहा पिता येईल इतके पैसे दिले जात होते. आता मुलाला पगार किती मिळतो हे विचारायला आई-वडील कचरतात.

मुलगा त्या पैशाचे काय करतो हे विचारायची हिम्मत/इच्छा आई-वडिलांकडे नसते...!

**हा बदल केव्हा झाला.... ?**

कॉलेजमध्ये जाताना साडी ऐवजी पंजाबी ड्रेस घालायला मिळतो याचा आनंद मानणारी मुलगी आता तिच्या मुलीला हाफ पॅन्टमध्ये फिरताना बघते. मनातल्या मनात चरफडते पण स्पष्टपणे मुलीला अंगभर कपडे घाल असे म्हणायची हिंमत करत नाही....!

**हा बदल केव्हा झाला.... ?**

वयात आलेली मुलगी संध्याकाळच्या आत घरात असायची, घरकामात मदत करायची. आता एकदा स्वयंपाक घरात येऊन खायला काय आहे ते बघते आणि स्वतःच्या खोलीत जाऊन परस्पर ऑर्डर करून खाणं मागवते.

**हा बदल केव्हा झाला.... ?**

लग्नाअगोदर मुला-मुलीने एक-दोन वेळा भेटणे म्हणजे पुढारलेपण मानणारे आता नातवंडांचे लिव इन रिलेशनशिप स्वीकारतात.



**हा बदल केव्हा झाला.... ?**

वर्षातून एकदा होळीच्या वेळी मोठ्या लोकांपासून लपून भांग पिण्याचा कार्यक्रम ठरवणारी आता प्रौढ झालेली माणसं घरातल्या तरुण मुलांपुढे सहज ग्लास भरु लागली.

**हा बदल केव्हा झाला.... ?**

नातवंडांना जवळ घेणारी, नातीच्या केसांना तेल लावून देणारी, गोष्टी सांगणारी आजी, आता सकाळी योगा क्लास नाहीतर लाफ्टर क्लासला जाते आणि नातवंडांशी टीव्हीच्या रिमोटसाठी भांडते.

**हा बदल केव्हा झाला.... ?**

घरातल्या कोणाशी बोलत नाहीत अशांना कौन्सिलर जवळचा वाटतो. त्याला पैसे देऊन त्याचा सल्ला मानतात. पण स्वतःच्या भावंडांवर विश्वास ठेवायला तयार नसतात.

तोच प्रकार पैशाच्या व्यवहाराबद्दल. नवरा-बायको दोघेही कमावतात. पण कुठे खर्च झाले, किती गुंतवले, कुठे गुंतवले, ते फक्त सीएला माहित असते.

मुलीच्या संसारातले सगळे लहानसहान तपशील जाणून घेणारे आई-वडील, मुलगा आणि सुनेच्या बाबतीत मात्र अलिप्त राहतात. असं का होतंय.....?

वडीलधाऱ्यांचा मान ठेवणाऱ्यांच्या मुली नवऱ्याचा येता-जाता अपमान करतात, सगळ्यांसमोर उणं-दुणं काढतात. अशा वेळी मुलीचे आई-वडील कसनुसं हसतात आणि मुलाचे आई-वडील हतबुद्ध होतात.

**हा बदल केव्हा झाला.... ?**

तरुण मुले एक नोकरी सोडतात, दुसरी धरतात. राहत्या गावातून दुसऱ्या गावी जातात. सगळे ठरल्यावर आई-वडिलांना फक्त सांगितलं जातं. त्याच्यापेक्षा कमी महत्त्वाच्या गोष्टींमध्ये तर आई-वडिलांना सांगण्याचीही गरज नसते.

मित्रांबरोबर ट्रीपला जाणे, ब्रेकअप होणे, सिनेमाला जाणे, पार्टी करणे, स्वतःसाठी नवीन वस्तू, फोन, कपडे वगैरे खरेदी करणे, अशा गोष्टीत आई-वडिलांनी दखल दिलेली मुलांना आवडतं नाही. असं का होतं..?

**हा बदल केव्हा झाला.... ?**

नातेवाईकां कडे जाणं, शेजाऱ्यांकडे वेळप्रसंगी जाणं, लग्न समारंभात सहभागी होणं, कुळाचार पाळणे, देवळात जाणे, पूजा करणे, इत्यादी गोष्टींवर आता काही घरात नाराजी नाही.तर भांडणे होतात. असं का होतं...?

**हा बदल केव्हा झाला.... ?**

मान्य आहे, दोन पिढ्यांमध्ये अंतर असतेच.

पाचवारी नेसणाऱ्या सुनेबद्दल नऊवारी नेसणाऱ्या सासूने तेव्हाही नाराजी व्यक्त केली होती. पण आता पन्नाशी पार केलेल्या पिढीत आणि त्यांच्या मुलांच्या पिढीत अंतर नाही दरी निर्माण झाली असं वाटतं.

**हा बदल केव्हा झाला.... ?**

**खरंच विचार करायला हवा.**

●●●●●●●●●●

# हिवाळ्यात करा पौष्टिक ज्यूसचे सेवन

हिवाळ्यात अनेक प्रकारच्या आजारांचा धोका वाढत असतो. अशावेळी रोगप्रतिकारशक्ती मजबूत असणं अत्यंत गरजेचं आहे. रोगप्रतिकारशक्ती कमकुवत असल्याने वारंवार संसर्गजन्य आजार होण्याचा धोका निर्माण होत असतो. त्याचबरोबर ज्यांची रोगप्रतिकारशक्ती मजबूत असते त्यांचे शरीर अनेक आजार आणि संसगार्शी लढण्यास सक्षम असते. जर तुमची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत असल्यास शरीरासाठी संरक्षक कवचासारखे काम देखील करते.

तुमच्या शरीराची रोगप्रतिकारशक्ती मजबूत ठेवण्यासाठी संतुलित आहार घेणं खूप गरजेचं आहे. याकरिता विशेषतः तुमच्या आहारात अँटीऑक्सिडंट्स आणि व्हिटॅमिन सी युक्त गोष्टींचा समावेश करणे आवश्यक आहे.

त्याचबरोबर तुम्ही यातुम्ही या भाज्यांचा ज्यूसही करून पिऊ शकता. विशेषतः हिवाळ्याच्या हंगामात तुम्ही या भाज्या आणि फळांचा रस बनवून सेवन केल्याने रोगप्रतिकारशक्ती वाढवण्याबरोबरच त्वचेवर चमक आणण्यासाठी उपयुक्त ठरू शकतात.

**असा बनवा ज्यूस**

सर्वप्रथम बीट, गाजर, आले स्वच्छ धुवून मग सोलून घ्या. त्यानंतर सोलून घेतलेले गाजर, बीट, आले त्याचबरोबर सफरचंद या सर्व गोष्टींचे बारीक तुकडे करून घ्या.

बारीक तुकडे केल्यानंतर एका मिक्सर



भांड्यात किंवा ज्यूसरमध्ये टाकून बारीक स्मूद ग्राइंड करून घ्या. जर मिक्सरच्या भांड्यातील रस खूप जाड दिसत असेल तर तुम्ही तुमच्या आवश्यकतेनुसार पाणी घालू शकता.

गोड करायचं असेल तर त्यात मध घालू शकता. त्यानंतर एकदा पुन्हा ग्राइंड करून झाल्यानंतर एका ग्लासमध्ये रस काढून फ्रेश सर्व्ह करा. चवीसाठी तुम्ही आवळा आणि पुदिन्याची पाने यामध्ये वापरू शकता.

**ज्यूसचे फायदे**

हेल्थलाइनच्या मते, बीट, गाजर, आले आणि सफरचंदापासून बनवलेल्या ज्यूसचे सेवन केल्यास रोगप्रतिकारशक्ती वाढविण्यास मदत होते. कारण यामध्ये अँटीऑक्सिडंट्स, पोटॅशियम, व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन बी 6, व्हिटॅमिन बी 9 आणि व्हिटॅमिन सी सारखे पोषक घटकांचा समावेश असतो.

अशावेळी तुम्ही या ज्यूसचे हिवाळ्यात सेवन केल्याने त्वचा, केस आणि पचनक्रिया यासाठी फायदेशीर ठरू शकतो तसेच रोगप्रतिकारशक्ती वाढवू शकतो. याला एबीसी ज्यूस म्हणून देखील ओळखले जाते.

या ज्यूसचे सेवन केल्याने शरीर डिटॉक्स होण्यास मदत होते. अशा तऱ्हेने हिवाळ्यात जी लोकं कमी पाणी पितात. ते या ज्यूसचे सेवन करू शकतात. त्याचबरोबर तुमच्या शरीरात जर रक्ताचे प्रमाण कमी असेल तर तज्ज्ञांकडून बीट खाण्याचा सल्ला दिला जातो. अशावेळी याचे नियमित सेवन केल्यास लाल रक्तपेशी वाढण्यास मदत होते. तसेच या ज्यूसमध्ये असणारे पोषक घटक त्वचा चमकदार होण्यास मदत करतात.

●●●●●●●●●●

## अशोकायन

### तुलसी विवाह!

तुलसी विवाह संपन्न होताच
वरपित्यास लागतो ध्यास
घटते मुलींचे प्रमाण पाहून
सुन मिळेल का नाही हमखास..

हुंड्याच्या अती लोभापायीच
स्त्रीभृण हत्येचे वाढले प्रस्थ
त्याचेच हे दुष्परिणाम भोगा
वधूपिते झाले होते त्रस्त ... !

महिला पुरुष समानता
रुजत नाही समाजात
तोपर्यंत जन्मदरातील
दरी राहील अस्तित्वात..



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

# ४ वर्षे होवूनही मिळेना शेतकऱ्यांना वीज जोडणी

## २७२ शेतकऱ्यांनी केले सौर कृषी पंपासाठी अर्ज

■ महासागर प्रतिनिधी,

यवतमाळ , दि. ३ : शेतकरी कनेक्शनसाठी अर्ज करून चार वर्ष झाली. तरी महावितरणकडून जिल्ह्यातील पाच हजार ४८३ कृषी पंपांना नव्याने वीज कनेक्शन मिळाले नाही. विजेअभावी सिंचन विहीर झाल्यानंतरही हे क्षेत्र ओलिताखाली आले नाही. यामुळे शेतकऱ्यांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. कृषी पंपाची वीज जोडणी तत्काळ करण्यात यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.



वीज वाहिनीच्या कृषी पंपापेक्षा सौर कृषी पंप तत्काळ देण्याचे धोरण वीज वितरण कंपनीने हाती घेतले आहे. मात्र, सौर कृषी पंपामुळे स्प्रिंकलर अथवा दूरवरचे सिंचन होत नाही, असा गैरसमज शेतकऱ्यांमध्ये पसरला आहे. यातून सौर कृषी पंप घेण्यासाठी शेतकरी तयार नाही. २०२० पासून जिल्ह्यातील पाच हजार ४८३ कृषी पंपाचे वीज कनेक्शन रखडले आहेत. हे कनेक्शन मिळावे म्हणून शेतकऱ्यांनी कोटेशन भरण्याची प्रक्रियादेखील केली आहे. यानंतरही वीज कनेक्शन मिळाले नाही. आता वीज वितरण कंपनीचा भर सौर कृषी पंप वाटण्यावर आहे. हे कृषी पंप शेतकऱ्यांना परवडणारे आहे. स्वतःच वीज जनरेट करणारे हे कृषी पंप स्प्रिंकलर अथवा इतर ओलीत करताना उपयोगी पडत नाही, असा गैरसमज शेतकऱ्यात आहे. २७२ शेतकऱ्यांनी सौर कृषी पंपासाठी अर्ज केले. मात्र, इतर शेतकरी आपल्याच भूमिकेवर ठाम असल्याने अडचणी वाढल्या आहेत.

**वीज वाहिनीच्या कृषी पंपापेक्षा सौर कृषी पंप तत्काळ देण्याचे धोरण वीज वितरण कंपनीने हाती घेतले आहे.**

# तुरीचे ६ हजार ४२० हेक्टर पीक फुलगळती, अळीमुळे उद्धवस्त

### धुके आणि बदलत्या वातावरणाचा फटका

■ महासागर प्रतिनिधी,

शेगाव, दि. ३: यावर्षी समाधानकारक पाऊस झाल्यामुळे खरीप हंगामातील अति पावसामुळे बचावलेल्या तुरीच्या पिकाला वातावरणातील बदलाचा, तसेच पहाटे पडत असलेल्या धुक्याचा कळी व फुलोऱ्यात असलेल्या पिकांवर परिणाम होत आहे. त्यामुळे फूल गळती व अळीचा प्रादूर्भाव रोखण्याचे संकट शेतकऱ्यांसमोर उभे आहे. त्यामुळे सहा हजार ४२० हेक्टरवरील तुरीचे पीक अडचणीत आले आहे.



शेगाव तालुक्यात खरीप हंगामात सततच्या पावसाने सोयाबीनचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. त्यातच सोयाबीनला बाजारभाव नसल्यामुळे शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात गेली. सोयाबीनला केलेला खर्चही वसूल झाला नाही, त्यातच आता तुरीचे पीक बहरात आले असताना वातावरण बदलामुळे व हिवाळा सुरू झाल्याने धुक्यामुळे दिवसेंदिवस तुरीची फूल गळती होत असलेली दिसत आहे. त्यातच शेंग पोखरणाऱ्या अळ्यांचा प्रादुर्भाव दिसत असल्याने उत्पादनात मोठी घट येण्याची शक्यताच दिसत आहे. तूर पिकाची परिस्थिती चांगल्या प्रकारे होती. परंतु, थंडीमुळे पहाटेच्या धुके व वातावरण बदलामुळे जोमात आलेल्या तूर पिकावर रोगराईने अटॅक केल्याने उत्पादन घटणार आहे असे चित्र शेतकऱ्यांच्या शेतात दिसत आहे.

कपाशीची लाल्या पडल्याने उत्पादनात घट तालुक्यात यंदा सततच्या पावसामुळे सोयाबीन पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. तर लाल्याने कपाशीच्या उत्पादनाची मोठी घट केली. सध्या तूर पिकावर अज्ञात अळीने हल्ला केल्याने तूर फस्त होत असल्याचे दिसून येत आहे. यंदा आधिच सततच्या पावसामुळे शेतातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले उत्पादन मोठ्या प्रमाणावर घटले, तूर, रब्बी हंगामातील हरभरा पिकांवर होत असलेल्या वातावरण बदलल्यामुळे नुकसान होत असल्याने शेतकरी हतबल झाले आहेत.

पीक वाचवण्याची धडपड यंदा शेगाव तालुक्यात सहा हजार ४२० हेक्टरवर तूर पेरणी झाली आहे. मात्र सध्या तुरीवर अज्ञात रोगाने हल्ला केल्याने शेतकरी हतबल झाले आहेत. सुरुवातीला चांगले दिसत असलेले तुरीचे पीक अळीने हल्ला केल्यामुळे शेतकरी फवारणी करत पीक वाचवण्याची धडपड करीत असल्याचे तालुक्यात दिसून येत आहे.



# पोर्टलच्या तांत्रिक अडचणींमुळे बेरोजगारांना मिळेना विद्यावेतन

■ महासागर प्रतिनिधी,

मलकापूर, दि. ३ : महयुती सरकारतर्फे बेरोजगार युवकांच्या विकास होण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने अंतर्गत प्रशिक्षितांना प्रशिक्षणाच्या नावावर रोजगाराच्या संधी उपलब्ध करून विद्या वेतन देण्याची योजना सुरू करण्यात आली होती. या योजनेअंतर्गत जिल्ह्यातील कित्येक प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षणासोबत काम तर मिळाले. मात्र पोर्टलच्या तांत्रिक अडचणींमुळे विद्यावेतन किंवा अन्य प्रक्रिया पूर्ण होत नसल्याने शासनाची ही योजना म्हणजे केवळ गाजावाजा करण्यापुरतीच होती का? असा सवाल या निमित्ताने उपस्थित होत आहे. राज्यात बेरोजगारांच्या रोजगाराचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा असताना महायुती सरकारने मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना नावाच्या प्रशिक्षणातून रोजगार उपलब्ध करून देण्यासंदर्भात प्रणाली सुरू केली होती. त्या अनुषंगाने शासन स्तरावरून विविध शासकीय, निमशासकीय तथा खासगी नोंदणीकृत आस्थापनांवर प्रशिक्षण व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या. व त्या संदर्भात सर्व प्रक्रिया एका वेबसाइट पोर्टलच्या माध्यमातून करण्यात आल्या. परंतु काही दिवसानंतर पोर्टलमध्ये तांत्रिक अडचणी येत असल्याचा विषय समोर करत पोर्टल बदलण्यात आले. विविध संस्था व आस्थापनांना पुन्हा दुसऱ्या वेबसाईट पोर्टलवर लॉगीन करून माहिती अद्यावत करण्यासंदर्भात सूचना देण्यात आल्या. मात्र दुसऱ्या पोर्टलवर सुद्धा अनेक शासकीय, निमशासकीय व विविध आस्थापना संस्थांना लॉगीन करण्यासंदर्भात तांत्रिक अडचणी उद्भवतच होत्या. या तांत्रिक अडचणी सोडवण्यासाठी ऑनलाइन स्वरूपातच अडचणी मागवल्या नंतर सुद्धा त्या अडचणी सोडवण्यातच बराच कालावधी गेला. या कालावधी दरम्यान अनेक प्रशिक्षणार्थ्यांना विविध संस्था व आस्थापनांनी नियुक्ती दिल्याचं होत्या. या नियुक्त्या योजनेअंतर्गत फक्त ६ महिन्यांकरिता होत्या. असे असताना नियुक्तीचा काळ ३ते ४ महिने उलटले असल्यानंतर सुद्धा या प्रशिक्षणार्थ्यांना विद्यावेतन अथवा त्यांची पुढील प्रक्रिया पूर्ण होत नाही. त्यामुळे योजनांची अंमलबजावणी तर झालीच मात्र अंमलबजावणी नंतरच्या अडचणींकडे लक्ष देणार तरी कोण? असा प्रश्न उपस्थित होत आहे. पोर्टल वरील अडचणी तात्काळ दुरुस्त करावी. ग. प्र. बिटोडे, कौ.वि.रो.उ.मार्गदर्श न केंद्र.

. कौशल्य रोजगार उद्योजकता विभाग या संदर्भात काय करत आहे –. पोर्टलमध्ये उदभवणाऱ्या तांत्रिक अडचणी सोडविण्याचा प्रयत्न करत आहे. . प्रशिक्षणार्थींना खरंच लाभ मिळते का –.हो मिळते, तांत्रिक अडचणींमुळे व्यत्यय आला असले तर तो सोडवत आहोत. . ही योजना फक्त दाखवण्यापुरती आहे का –. नाही, योजना प्रत्यक्षात उतरवण्याचा शासनाचा मनोदय होता तो पुर्ण होत आहे. . जिल्ह्यात किती प्रशिक्षणार्थी आहे –२४१५ प्रशिक्षणार्थी जिल्ह्यात कार्यरत आहेत. निराकरण करण्याचे प्रयत्न संस्थांनी पोर्टल संदर्भात किंवा इतर तांत्रिक अडचणी असल्यास कार्यालया सोबत संपर्क साधावा. आम्ही आमच्या पातळीवर समस्यांचे निराकरण करण्याचे प्रयत्न करतोच काही तक्रारी वरिष्ठांच्या मार्गदर्शनात सुद्धा सोडवण्यात येत आहेत.

# पहिल्या विश्व मराठी साहित्य संमेलनाच्या उद्धाटक डॉ. चिमोटे यांचा सत्कार



■ महासागर प्रतिनिधी,

अमरावती, दि. ४ : पहिल्या विश्व मुक्त सृजन मराठी साहित्य संमेलनाच्या उद्धाटकपदी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील मराठी विभागप्रमुख तथा मानवविज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. मोना चिमोटे यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल विद्यापीठाच्यावतीने कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्र–कुलगुरुडॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे आदी मान्यवर उपस्थित होते. छत्रपती संभाजीनगर येथील मुक्त सृजन संस्था, मुक्त सृजन साहित्य पत्रिका व ठाणे येथील संस्कृती प्रकाशने यांच्या संयुक्त विद्यमाने हे सम्मेलन भरवले जात आहे. ५ ते १० डिसेंबर या काळात दुबई येथे हे सम्मेलन होईल. साहित्य समीक्षक, संशोधक आणि लेखिका म्हणून डॉ. मोना चिमोटे यांची ओळख आहे. रहस्यकथा या कथाप्रकाराचा चिकित्सक अभ्यास या विषयावरील शोधप्रबंधासाठी डॉ. चिमोटे यांना अमरावती विद्यापीठाने आचार्य पदवी प्रदान केली आहे. मराठी विज्ञान कथात्म साहित्याचा समाजावर होणारा परिणाम या विषयावर त्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाचा प्रकल्प पूर्ण केला असून त्यांना पोस्ट डॉक्टरल रिसर्च अवॉर्ड प्राप्त झाला आहे. याशिवाय अनुवादीत विज्ञान कथात्म साहित्याचा मराठी विज्ञान कथात्म साहित्यावर झालेला प्रभाव या विषयावर त्यांनी विद्यीपीठ अनुदान आयोगाचा मेजर रिसर्च प्रोजेक्टही पूर्ण केला आहे. कवी अज्ञात यांची स्वच्छंद, अनुकंपा, डोहवळ, स्नेहदग्ध, ओघळांचे नकाशे, अनन्यशर आणि अज्ञातवास : एक काव्यखंड इत्यादी काव्यसंग्रहांचे संपादन त्यांच्या नावावर आहे. त्यांच्या पळसबंध या ललित लेखनसंग्रहास राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त असून हा संग्रह बडोदा येथील महाराजा सयाजीराव विद्यापीठाच्या बी. ए. भाग दोनच्या अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आला आहे. तसेच त्यांच्या कालखंडानुसार साहित्याभ्यास या पुस्तकाचा समावेश यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात झाला आहे. डॉ. मोना चिमोटे यांच्या निवडीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# रखडलेल्या पीएच.डी प्रवेश प्रक्रियेला प्रारंभ

### संशोधक विद्यार्थ्यांना अमरावती विद्यापीठाचा दिलासा

■ महासागर प्रतिनिधी,

बुलढाणा, दि. ३ : मागील वर्षभरापासून रखडलेले पीएच. डीचे प्रवेश प्रक्रियेला अखेर हिरवी झेंडी मिळाली आहे. सोमवार,२ डिसेंबरपासून या विषयाची प्रवेश प्रक्रिया सुरू होत आहे. त्यामुळे जिल्हयातील शेकडो विषयाच्या संशोधक विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे. अमरावती विद्यापीठ अंतर्गत विभागातील पाच ही जिल्हे जोडलेले आहे. या पाच जिल्हयातील शेकडो विद्यार्थी हे संशोधनासाठी उत्सुक आहेत. परंतू मागील वर्षी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण संदर्भात आदेश आल्याने विद्यापीठातील अनेक नियमात बदल करावे लागले होते. परंतू हे काम तत्काळ न होणारे असल्याने अनेक प्रकारच्या अडचणी आल्या होत्या.

त्यामुळे जिल्हयातील अनेक विद्यार्थी हे पीएच.डी. प्रवेश प्रक्रिया थांबवण्यात आली होती. आता सदर प्रवेश प्रक्रिये संदर्भात प्रत्येक संशोधन केंद्रांवर ही प्रवेश प्रक्रिया राबवली जाणार आहे. १६ डिसेंबरपर्यंत सर्व विद्यार्थ्यांच्या प्रवेश अर्ज स्वीकारले जाणार आहेत. तर १७ डिसेंबर पासून परिपूर्ण असलेल्या अर्जदाराच्या मुलाखतीचा कार्यक्रम जाहिर केल्या जाणार आहे. पात्र विद्यार्थ्यांची यादी आणि त्यांच्या मुलाखतीचा हा कार्यक्रम त्या–त्या विषयाच्या संशोधन केंद्रांवर जाहीर केला जाईल. विद्यापीठाच्या वेळापत्रकानुसार २४ डिसेंबरपर्यंत ही प्रक्रिया चालेल. २६ डिसेंबर ते २ जानेवारी या काळात संशोधक विद्यार्थ्यांच्या मुलाखती होतील. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर २ व ३ जानेवारी रोजी निवड झालेल्या विद्यार्थ्यांची अंतिम यादी जाहीर केली जाईल. चाळणी प्रक्रिये अंती पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना ६ ते १५ जानेवारी दरम्यान प्रवेश अर्ज सादर करावा लागेल. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कार्यक्षेत्र असलेल्या पाचही जिल्ह्यात पीएच.डीचे शंभरहून अधिक अभ्यास केंद्र आहेत. विज्ञान–तंत्रज्ञान अभियांत्रिकी, वाणिज्य, कला व इतर विषयात संशोधन करणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांना या केंद्रांवरून प्रवेश दिला जातो.

ही सर्व संशोधन केंद्रे त्या–त्या जिल्ह्यातील नामांकित महाविद्यालयांना जोडली आहेत. दरवर्षी जानेवारी–फेब्रुवारीआसपास या विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित होत असतात परंतु एनईपी आणि डायरेक्शन या दोन बाबींमुळे या वर्षीचे प्रवेश रखडले होते.

दरम्यानच्या काळात लोकसभा आणि विधानसभा अशा दोन निवडणुकांच्या आचारसंहिताही लागू झाल्यात. त्यामुळे प्रक्रियेचे कामही रखडले होते. त्यामुळे वर्षाच्या शेवटी का होईना, या विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे. २५ जानेवारीपासून कोर्स वर्क प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रवेशित विद्यार्थ्यांचे कोर्स वर्क २५ जानेवारीपासून सुरू होणार आहे. हे कोर्स वर्क १६ आठवड्यांचे असते. संबंधित रिसर्च सेंटरवरचा त्यांना हे कोर्स वर्क पूर्ण करावे लागणार आहे.



# भुसावळ ते अमरावती लोकल ट्रेन सुरु करा

### राष्ट्रीय रेल्वे महिला प्रवासी संघटनेची मागणी

■ महासागर प्रतिनिधी,

शेगाव , दि. ३ : भुसावळ ते अमरावती अशी लोकल ट्रेन सुरु करण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रीय रेल्वे महिला प्रवासी संघटनेच्या वतीने करण्यात आली. या संदर्भात नुकतेच खामगाव येथील स्टेशन मास्तर यांच्या माध्यमातून भुसावळ रेल्वे डिव्हिजनच्या डीआरएम इती पांडे निवेदन देण्यात आले.

भुसावळ अमरावती अशी लोकल ट्रेन सुरू करण्यात यावी, खामगाव ते अमरावती, खामगाव ते भुसावळ मेमो ट्रेन सुरू करण्यात यावी, शेगाव रेल्वे स्टेशन येथून भुसावळ - मलकापूर कडे जाण्यासाठी सकाळी ६ वाजता चेन्नई– अहमदाबाद नवजीवन एक्सप्रेस गेल्यानंतर गीतांजली एक्सप्रेस पर्यंत शेगाव, खामगाव, नांदुरा आणि मलकापूर भागातून

भुसावळकडे जाण्यासाठी कोणती ही ट्रेन उपलब्ध नाही. यामुळे या परिसरातील विद्यार्थी, महिला, व्यापारी, नोकरी करणारे प्रवासी आणि धार्मिक स्थळांना भेट देणारे भाविक यांना मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत आहे. पर्याय नसल्यामुळे प्रवासी जास्त पैसे खर्च करून खाजगी वाहनांचा वापर करतात किंवा एसटी बसने गर्दीचा सामना करत प्रवास करतात.

या समस्येमुळे प्रवाशांना मानसिक, शारीरिक आणि आर्थिक ताण जाणवत आहे. शेगाव आणि खामगाव सारख्या महत्वाच्या ठिकाणी प्रवाशांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे भुसावळ– अमरावती–भुसावळ अशी लोकल ट्रेन सुरू केल्यास प्रवाशांना मोठा दिलासा मिळेल.

ही ट्रेन दररोज सकाळी व दुपारी उपलब्ध करून दिल्यास प्रवाशांचे हाल कमी होतील व त्यांना आरामदायक प्रवासाचा पर्याय मिळेल अशी मागणी करण्यात आली. निवेदन देताना राष्ट्रीय रेल्वे महिला प्रवासी संघटनेच्या राष्ट्रीय अध्यक्षा माधुरी शर्मा, विदर्भ अध्यक्ष मनीषा टाकसाळ, मलकापूर तालुका अध्यक्ष वैशाली जोशी, परतवाडा तालुका अध्यक्ष रुपाली डांगे, शेगाव तालुका अध्यक्ष प्रीती तिवारी, तसेच राजश्री राजकुमार व्यास यांच्यासहित अनेक सदस्या उपस्थित होत्या.

# दलितवस्तींचा निधी खर्च न करता केला परत

### सरपंच, ग्रामस्थांचा ठिय्या



■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. ४ : अनुसूचित जाती व नवबौद्ध वस्तीचा विकास करणे, या योजनेंतर्गत काम पूर्ण करण्यात आले नसून, निधी खर्च न करता परत करण्यात आला, असा आरोप करत पातूर चरणगाव येथील सरपंच, ग्रामस्थांनी सोमवारी ठिय्या दिला. हे आंदोलन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) कार्यालयाबाहेरच करण्यात आले. **दोषींवर गुन्हा दाखल करा** दलित वस्तीच्या कामासाठी लाख रुपये निधी मंजूर करण्यात आला होता; परंतु याबाबत सचिव व गटविकास अधिकाऱ्यांनी मला माहिती दिली नाही. काम न करता तो निधी परत शासनाला पाठवला. त्यामुळे दलित वस्तीतील कामे होऊ शकले नाहीत. हा नागरिकावर एकप्रकारे अन्याय आहे. दोषींवर ट्रॉसिटी क्टनुसार गुन्हा दाखल करण्यात याव.

**मेघा देशमुख, सरपंच, चरणगाव.**

# गण गण गणात बोतेच्या जयघोषात शेगाव दुमदुमले



■ महासागर प्रतिनिधी,

शेगाव, दि. ३ : शेगाव हे श्री संत गजानन महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झाले आहे. महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून श्री संत गजानन महाराजांच्या दर्शनासाठी येणाऱ्या पायी भजनी दिंड्यांनी सध्या शहराच्या धार्मिक वातावरणात एका नव्या उत्साहाची भर घातली आहे.

श्री संत गजानन महाराजांच्या चरणी भक्ती अर्पण करण्यासाठी अनेक भाविक पायी प्रवास करून शेगाव नगरीत दाखल होत आहेत. श्री गजानन जय गजानन, गण गण गणात बोते नामजप करत व टाळ मृदंगाच्या गजराने संपूर्ण शहर दुमदुमून गेले आहे. गावोगावी, शहराशहरातून एकत्र येणाऱ्या या भजनी दिंड्या, टाळमृदंगाचा संगतीने भक्तिरसात न्हालेल्या दिसत आहेत. पोलिस विभागानेही वाहतूक आणि सुरक्षेची विशेष व्यवस्था केली आहे.

शहराच्या प्रत्येक रस्त्यावर भजन, कीर्तन, टाळ–चिपळ्यांच्या आवाजाने एक अनोखी भक्तीमय उर्जा अनुभवायला मिळत आहे. श्रींच्या मंदिर परिसरात भक्तांचा उत्साह शिगेला पोहोचला असून, मंदिरात श्रींच्या दर्शनासाठी रांगा लागलेल्या दिसत आहेत. विविध मार्गांनी येणाऱ्या पायी दिंड्या शेगावच्या रस्त्यांवर एकत्र आल्याने शहराचा प्रत्येक कोपरा भक्तिरसात न्हाल्याचे दृश्य आहे. भक्तांसाठी ठिकठिकाणी अन्नदान, पाणी आणि विश्रांतीची सोय केली जात आहे. स्थानिक व्यावसायिक प्रसाद, धार्मिक साहित्य, खाण्याचे पदार्थ विकणाऱ्या दुकानांमध्ये चैतन्य निर्माण झाले आहे. भजनी दिंड्यांच्या माध्यमातून श्रद्धा, भक्ती आणि निष्ठेचा संदेश पसरवला आहे. एकात्मता, प्रेम आणि समाजातील लोकांना जोडणाऱ्या या दिंड्या केवळ धार्मिक कार्यक्रम न राहता, सामाजिक जागृतीचेही प्रतीक ठरत आहेत.

दिंडीतील भाविकांची जागोजागी फराळाची सोय शेगाव शहरातील स्थानिक नागरिक, सेवा समित्या आणि विविध स्वयंसेवी संस्थांकडून दाखल झालेल्या भजनी दिंड्यांचे मोठ्या उत्साहाने स्वागत केले जात आहे. भक्तांसाठी ठिकठिकाणी अन्नदान, पाणी आणि विश्रांतीची सोय केली जात आहे. भाविकांना कुठलाही त्रास होणार नाही याकडे लक्ष दिल्या जात आहे.

# २०६ आक्षेपांवर पार पडली सुनावणी

### शहराच्या विकास आराखड्यावर घेतले होते आक्षेप




यवतमाळ : शहराचा नविन विकास आराखडा तयार करुन तो प्रसिद्ध करण्यात अला होता. या विकास आराखड्यासंदर्भात शहरातील नागरिकांचे आक्षेप, सुचना मागवण्यात आल्या होत्या. त्यावरुन प्राप्त झालेले आक्षेप आणि सुचना यासंदर्भात सोमवारी दि. २ डिसेंबर रोजी पालिकेच्या कार्यालयात सुनावणी घेण्यात आली. यावेळी प्रशासनाने नागरिकांची मते जाणून घेतली.

शहराचा विस्तार होतो त्यानुसार शहरातील नागरिकांसाठी आवश्यक असलेल्या सोई–सुविधउपलब्ध करुन देणे आवश्यक असते. त्यासंदर्भात शासनाच्या निर्देशानुसार वेळोवेळी शहर विकास आराखडा तयार करण्यात येतो. यामध्ये शहरात विविध कामांसाठी जागा निश्चीत करणे, रस्ते प्रस्तावीत करणे आणि इतर अन्य अनेक बाबींचा समावेश असतो. असाच विकास आराखडा गेल्या दोन महिन्यांपुर्वी प्रसिद्ध करण्यात आला होता. या विकास आराखड्यासंदर्भात नागरिकांकडून आक्षेप, सूचना मागवण्यात आल्या होत्या. त्यावरुन आक्षेप, सूचना पालिका प्रशासनाकडे प्राप्त झाल्या होत्या. त्या आक्षेपावर सोमवारी दि. २ डिसेंबर रोजी पालिकेच्या कार्यालयात असलेल्या सभागृहात सुनावणी घेण्यात आली. यावेळी सेवानिवृत्त उपसंचालक संजय सावजी, श्री. पालीनकर, एनआयटी प्रा. देशमुख, पालिका मुख्याधिकारी शुभम काट्यमवार, नगर रचनाकार राजय साबळे प्रामुख्याने उपस्थित होते. या सुनावनीच्या निमित्ताने पालिकेच्या कार्यालयात सोमवारी दिवसभर मोठ्या संखेने नागरिकांची गर्दी झाल्याचे दिसून आले.

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

## फंडू एसएमएस

आज एक बहुत ही दर्दनाक खयाल दिमाग मे आया की, मेरी फोन की भी सेटिंग है पर मेरी नहीं।

वो मेरी किस्मत, मेरी तकदीर हो गई। हमने उनकी याद में इतने खत लिखे की, वो रद्दी बेचकर अमीर हो गई।

होठोंपे उल्फत के फसाने नहीं आते, जो बीत गए फिर वो जमानें नहीं आते, दोस्त ही होते हैं दोस्तों के हमदर्द, कोई फरिश्ते यहाँ साथ निभाने नहीं आते।

# जोश

# जीवाभावाचा मित्र होईल जोडीदार?



**मॅच मेकिंग**

मी विवाहयोग्य वयाची तरूणी असून अत्यंत जिवाभावाच्या मित्रानं मला नुकतीच मागणी घातली आहे. आम्ही गेल्या आठ वर्षांपासून एकमेकांना ओळख आहोत. आतापर्यंत प्रत्येक गोष्ट आम्ही एकमेकांशी शेअर करत आलो. पण माझ्या मनात त्याच्याविषयी केवळ मित्रत्वापलिकडे दुसरी कोणतीही भावना नाही. त्यामुळे भविष्यात त्याच्याकडे ओढली जाण्याची शक्यता खूप कमी आहे. मी प्रियकर किंवा नवरा म्हणून त्याचा विचार करू शकत नाही. तो खूप चांगला मुलगा आहे. असं असताना माझे आई-वडिल लग्नासाठी मागं लागले आहेत. अशा स्थितीत तो आयुष्याचा जोडीदार म्हणून माझ्यासाठी योग्य आहे किंवा नाही हे कसं ओळखू?

उत्तर : मैत्रिणी, सध्या तू विवंचनेत आहेस. यातून बाहेर पडण्यासाठी स्वत:ला थोडा वेळ दे. भावी पतीकडून असलेल्या अपेक्षांचा विचार कर. तुला नेमकं काय हवं आहे हे जाणून घे. मुळात लग्न करण्याची तुझी इच्छा आहे का सामाजिक दबावाखाली तू हा निर्णय घेत आहेस? तुला मनापासून लग्न करायचं असेल तरच जोडीदार म्हणून या मित्राचा विचार कर. लग्न ही आयुष्यभराची कमिटमेंट आहे. त्यामुळे वरवर विचार करून निर्णय घेता येणार नाही. तू समुपदेशकांची मदत घे. तुझ्या अपेक्षा कागदावर उतरवून काढ. मग या मित्राशी बोल. आयुष्याचा महत्त्वाचा निर्णय घाईने आणि भावनेच्या भरात घेऊ नको.

**प्रत्येक धर्मात अंत्यसंस्काराची पद्धत सांगण्यात आली आहे. त्यानुसार अंत्यसंस्कार झाले तर जीवाला मुक्ती मिळते, असं मानलं जातं. पण कुटुंब नसलेल्या, बेवारशी मृतदेहांची विल्हेवाट लावणं हा खूप मोठा प्रश्न असतो. अशीच एक घटना चेन्नईच्या खलिद अहमदच्या जिव्हारी लागली. यातूनच त्याने 'युरावूगल' ही संस्था सुरू केली. या माध्यमातून तो आणि त्याचे काही मित्र बेवारशी मृतदेहांवर अंत्यसंस्कार करतात.**

# जीवाला मुक्ती देण्यासाठी...

**अचिव्हर**

बेवारशी मृतदेहांचं नेमकं काय करायचं, असं प्रश्न पोलीस आणि प्रशासनाला पडलेला असतो. आपल्या जीवाभावाच्या व्यक्तीवर योग्य पद्धतीने अंत्यसंस्कार व्हावेत, असं प्रत्येकालाच वाटत असतं. मात्र प्रत्येकाच्या नशीबी सुखाचं मरण नसतं. खलिद अहमद आणि त्याचे सहकारी अशाच मृतदेहांना मुक्ती देण्याचं काम करत आहेत. खलिद मित्रासोबत चेन्नईतल्या गजबजलेल्या रस्त्यावरून जात असताना त्यांना एका व्यक्तीचं कण्हणं ऐकू आलं. खलिदच्या मित्राने त्या व्यक्तीला पाणी दिलं. पाण्याचा घोट घेत त्या माणसाने प्राण सोडले. या माणसाच्या कुटुंबात कोणीही नव्हतं. त्यामुळे मृतदेहावर अंत्यसंस्कार कोण करणार, हा प्रश्न निर्माण झाला. खलिद आणि त्याच्या मित्राने पळापळ करून व्यवस्था केली. पण या घटनेमुळे तो मुळापासून हादरला. मृत्यूनंतर माणसाच्या देहावर साधे अंत्यसंस्कारही होऊनयेत, या प्रश्नाने तो व्यथित झाला. पोलीस, रुग्णालयं तसंच स्मशानातल्या कर्मचाऱ्यांशी बोलल्यानंतर परिस्थितीचं गांभीर्य त्याच्या लक्षात आलं. प्रत्येकावर योग्य पद्धतीने अंत्यसंस्कार करता येत नसल्याचं कळल्यानंतर त्याने यासाठी काही तरी करण्याचं ठरवलं.



२७ जुलै २०१७ रोजी खलिदने आपल्या सहा मित्रांच्या साथीने 'युरावुगल' संस्था सुरू केली. 'युरावुगल' या तमिळ शब्दाचा अर्थ आहे नातेसंबंध. चेन्नईतल्या बेवारस मृतदेहांवर मृत्यूनंतर योग्य पद्धतीने अंत्यसंस्कार व्हावेत, संबंधितांचा पुढचा प्रवास सुकर व्हावा एवढाच आपला उद्देश असल्याचं तो सांगतो. 'आम्ही त्यांचे कुटुंबिय होतो. त्यांच्या शेवटच्या प्रवासात सहभागी होतो. अगदी काही मिनिटांसाठी का होईना, आम्ही अशा मृतदेहांच्या अंत्ययात्रेत सहभागी होतो,' असं तो सांगतो. सात लोकांनी सुरू केलेल्या या संस्थेचा आता वटवृक्ष झाला आहे. जवळपास ७०० स्वयंसेवक याच्याशी जोडले गेले आहेत. त्यांच्या संस्थेने १५० हून अधिक मृतदेहांवर अंत्यसंस्कार केले आहेत. यात लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत अनेकांचा समावेश होता.

१८ ते २८ वयोगटातल्या मुली, कॉलेजवयीन तरुण आणि विद्यार्थी त्यांचे स्वयंसेवक आहेत. चेन्नईतले पोलीस आणि रुग्णालयातले कर्मचारी यांच्या मदतीने या संस्थेचं कार्य चालतं. त्यांच्याकडे या स्वयंसेवकांचे पत्ते, फोन नंबर्स आहेत. त्यामुळे बेवारशी मृतदेह सापडल्यावर त्यांना संपर्क केला जातो. त्यांचे व्हॉट्सअॅप ग्रुपही आहेत. खलिद अहमद मॅकेनिकल इंजिनिअर आहे. पण हे समाजकार्य तो प्रेमाने करतो. खलिदचं हे कार्य कौतुकास्पद आहे.

# सवयी बदला, श्रीमंत व्हा

**सेव्हिंग मंत्रा**

प्रत्येकाला श्रीमंत व्हायचं असतं. भरपूर पैसा कमवायचा असतो. पण काही सवयींमुळे आपली अडवणूक होते. पैसा असूनही आपण श्रीमंत होऊ शकत नाही. मात्र, काही सवयी बदलल्या तर श्रीमंतीच्या मार्गावर चालण्यापासून तुम्हाला कोणीही रोखू शकत नाही.

* गरजेपेक्षा जास्त खरेदी करणारे कधीही श्रीमंत होऊ शकत नाहीत. व्यवसाय किंवा गुंतवणुकीतून कमाई होईपर्यंत मी महागडी गाडी किंवा घड्याळ खरेदी केलं नाही. करोडपती झाल्यानंतरही मी टोयोटा कॅमरीतून फिरतो, असं ग्रँट कारडोन लिहितात. म्हणूनच आवश्यकता नसेल तर महागड्या किंवा जास्तीच्या वस्तू खरेदी करू नका.



* आर्थिक सुरक्षेसाठी बचत करायला हवी. पण फक्त बचतीवर लक्ष केंद्रित केल्याने तुम्ही श्रीमंत होणार नाही. उत्पन्न वाढीचा विचार करायला हवा. बँकेत पडून राहिलेल्या पैशांना काहीच अर्थ नसतो. श्रीमंत लोक पैसा कसा वाढेल याचा विचार करतात.

* गुंतवणूक हा कमाई वाढवण्याचा चांगला मार्ग आहे. तरुण वयातच गुंतवणुकीला सुरूवात करायला हवी. श्रीमंत लोक प्रत्येक वर्षी आपल्या उत्पन्नापैकी २० टक्के रक्कम गुंतवतात. यामुळे त्यांची गुंतवणूक आणि बचत दोन्ही वाढते.

* आपण श्रीमंत होऊ शकत नाही, हा विचार मनातून काढून टाका. नशीबवान लोक श्रीमंत होतात, असा अनेकांचा समज असतो. पण प्रत्यक्षात जगातल्या प्रत्येकाला ही संधी मिळते. ती साधायला हवी. निराशावादी होण्यापेक्षा आशावादी होऊन प्रयत्न करायला हवेत.

# जादू लाल रंगाची

**फॅशन पॅशन**

दोस्तांनो, ख्रिसमस, न्यू ईयर सेलिब्रेशनच्या दिवसांमध्ये लाल रंगाला खूप मागणी असते. मुलींवर लाल रंग खुलून दिसतो. पण मुलांचं काय? लाल रंगाचे कपडे घालून सांताक्लॉज दिसायचं नसेल तर स्टायलिंगचे फंडे तुम्हाला जमायला हवे. ते जमले की लाल रंगात तुम्ही शोभून दिसलाच म्हणून समजा. यावेळी ख्रिसमस आणि न्यू ईयर सेलिब्रेशनसाठी लाल कपडे घालण्याचा विचार करत असाल तर या टिप्स नक्की फॉलो करा.

* लाल रंग स्मार्ट पद्धतीने कॅरी करायचा असेल तर 'पुलिंग ऑफ जंपर्स' हा अगदी साधा आणि सोपा पर्याय आहे. यात गडद आणि भडक लाल रंगांची निवड करा. त्यासोबत घातल्या जाणाऱ्या जॅकेट किंवा पँटमुळे हा भडकपणा कमी होतो.

* नीटेड पुलओव्हर्सना तुमची पसंती नसेल तर लाल रंगाचा प्लेन किंवा ग्राफिक्सवाला स्वेट शर्ट घालता येईल.



* लाल फ्लॅनेल्स हा सुद्धा हटके पर्याय आहे. रेड थीम असलेल्या पार्ट्यांना तुम्ही फ्लॅनेल्स घालू शकता. ऑल रेड लूक नको असेल तर फ्लॅनेल्स बेस्ट ठरतात.

* लेअरिंगचं तंत्र कधीही आउटडेटेड होत नाही. त्यामुळे या पद्धतीने तुम्ही रेड लूक खुलवू शकता. बॉम्बर जॅकेट्स, स्कार्फ, नीट्स, बम बॅग्ज, स्नीकर्स अशा पर्यायांचा वापर करून लेअरिंग करा आणि हॉट दिसा. मिक्स अॅण्ड मॅच टेक्श्चर्स, प्रिंट्स आणि रंगांचा मेळ साधा.

* प्रयोग करायला आवडत असेल तर लाल ट्राउझर्स कॅरी करता येतील. रेड चिनोज मस्त दिसतील. लाल ट्राउझर्ससाठी वेगळ्या फॅब्रिक्सची निवड करा. त्यावर ओव्हर साईज लाँग कोट घाला.

* बरगंडी किंवा मरून ब्लेझरही छान दिसेल.

# गेमिंगच्या जगात...

**वेगळ्या वाटा**


जगभरात 'पबजी' गेमनं धुमाकूळ घातला आहे. भारतीय तरूणही या गेमनं झपाटून गेले आहेत. 'पबजी' म्हणजे 'प्लेअर अननोन्स बॅटल ग्राउंड'. अर्थात तरूणाईला झपाटून टाकणारा पबजी हा एकमेव मोबाईल गेम नाही. मोबाईल गेमिंगचा हा कारभार जगभरातील २.३४ अब्ज लोकांना आपल्या कवेत घेण्यासाठी सज्ज झाला आहे. नॅसकॉमच्या अहवालानुसार देशात १०० पेक्षा जास्त कंपन्या गेम डेव्हलपमेंटशी संबंधित आहेत. या क्षेत्रात प्रोग्रामर्स, डिझायनर्सपासून ऑडियो इंजिनिअर्सपर्यंत तज्ज्ञांना प्रचंड मागणी आहे. युवा मंडळी गेमिंगच्या क्षेत्रात करीअरच्या वाटा शोधू शकतात. त्या विषयी जाणून घेऊ...

**गेम डिझायनर** – गेमची संकल्पना ही गेम डिझायनरची असते. नियम ठरवण्यापासून गेमचं कथानक गुंफण्यापर्यंतची अनेक कामं ही मंडळी करतात. यासाठी तुमच्यात प्रचंड कल्पकता हवी. गेम डिझायनिंगचं प्रशिक्षण घेतल्यानंतर तुम्ही या क्षेत्रात उडी घेऊ शकता. कॉम्प्युटर इंजिनिअर्स किंवा कॉम्प्युटर सायन्समध्ये बी टेक करूनही गेम डिझायनर म्हणून काम करता येतं.

**नरेटिव्ह डिझायनर** – गेमला स्पर्धात्मकता आणण्यासाठी नरेटिव्ह डिझायनर्स काम करतात. गेममधल्या पात्राची कामं ठरवणं, त्यांचं स्थान निश्चित करणं, जिंकल्यानंतर खेळाडूंना मिळणारी बक्षिसं ठरवणं अशी कामं हे लोक करतात. पात्रांच्या तोंडचे संवाद त्यांना लिहावे लागतात. इंग्रजी साहित्य किंवा मास कम्युकेशनमधली पदवी तुमच्यासाठी या पदाची कवाडं खुली करू शकते.

**व्हिज्युअल आर्टिस्ट** – गेमला आकर्षक करण्यासाठी विविध इफेक्ट देण्याचं तसंच यातल्या पात्रांची सजावट करण्याचं काम यांच्याकडे असतं. ग्राफिक्स, अॅनिमेशन केलेले विद्यार्थी याकडे वळू शकतात.

यासोबतच गेम टेस्टर, डेवऑप्स इंजिनिअर, ऑडियो इंजिनिअर, गेम डेव्हलपर, प्रोग्रामर म्हणूनही तुम्हाला काम करता येण्यासारखं आहे.



# चटकदार कुरकुरे चाट

**झटपट रेसिपी**

दोस्तांनो, खायची इच्छा झाल्यानंतर लगेच तोंडात टाकण्यासाठी तुमच्या होस्टेल रूमवर किंवा घरात कुरकुरे, बटाटा चिप्सची पाकिटं असतात. मात्र, या पदार्थांना ट्विस्ट देऊन संध्याकाळच्या पोटपुजेची सोय करता येईल, याचा विचार केलाय कधी? तुमच्या घरात वा होस्टेल रूमवर कुरकुरेचं पाकिट असेल तर चटकदार कुरकुरे चाट बनवू शकता.

**साहित्य** : कुरकुरे, आवश्यकतेनुसार बारीक चिरलेला कांदा, टोमॅटो, किसलेलं गाजर, चाट मसाला, चिंचेची चटणी, चिरलेल्या हिरव्या मिरच्या, हवं असल्यास दही आणि शेव, चवीनुसार मीठ इत्यादी.

**कृती** : एका भांड्यात कांदा, टोमॅटो आणि गाजर घाला. त्याच चाट मसाला, मीठ आणि चिंचेची चटणी घालून नीट हलवून घ्या. हवं असल्यास दही घाला. आता सगळं मिश्रण मिसळून घ्या. त्यात कुरकुरे टाका. वरून हिरव्या मिरच्या आणि शेव टाका. मिक्स करा. मस्तपैकी खा. आवडीनुसार आणि उपलब्ध असतील तर इतर काही भाज्याही यात मिसळू शकता. शिवाय वरून कोथिंबिर भुरभुरता येईल. जास्त झणझणीत हवं असेल तर तिखट चटणी घालू शकता. कुरकुरे चटकदार असल्याने चाट मसाल्यानं काम भागू शकतं. अशाच प्रकारे तुम्ही विविध पदार्थांपासून चाट बनवून स्वस्तात जीभेचे चोचले पुरवू शकता.




# संकल्पपूर्तीसाठी...

**फिटनेस मंत्रा**

नव्या वर्षाच्या संकल्पांच्या यादीत फिटनेसला वरचं स्थान असतं. वजन कमी करण्यापासून नियमित व्यायामापर्यंतचे संकल्प केले जातात. पहिले काही दिवस उत्साह असतो. पण नंतर सगळं मुसळ केरात जातं. फिटनेस प्रकरण काही झेपत नाही आणि पुन्हा सगळं काही जैसे थेच होतं. मात्र, सगळेच संकल्प अर्धवट राहतात असं नाही. ते पूर्णही करता येतात. परंतु त्यासाठी योग्य नियोजन करायला हवं. तुम्हीही नव्या वर्षात फिटनेसचं उद्दिष्ट राखलं असेल तर ते साध्य करण्यासाठीच्या या टिप्स...

* समजा तुम्हाला ३० किलो वजन कमी करायचं आहे. एवढं वजन एका झटक्यात कमी होणार नाही. त्यासाठी बराच वेळ लागेल. तो देण्याची तयारी ठेवा. कंटाळू नका. छोटी उद्दिष्ट ठेवा. एक ते दोन किलो वजन कमी करा. मग पुढे जा. ३० किलो वजन कमी करायचं असं म्हणून सुरूवात करू नका.

* जीमचे मेंबर झालात. आठवड्याचे सातही दिवस राबायचं ठरवलं. परंतु वर्षभरात सात वेळाही जीममध्ये न जाता अचानक आठवड्याचे सात दिवस घाम गाळायला सुरूवात केली की दमणूक होणारच. मग नको ते जीम असं होऊन जातं. त्यासाठी आठवड्यातून चार ते पाच वेळा जीममध्ये जा. दमवणारा व्यायाम करू नका. शरीराला व्यायामाची सवय होऊ द्या.



* फॅड डाएटच्या मागे लागू नका. विशिष्ट घटक आहारातून वर्ज्य करू नका. कॅलरींवर नियंत्रण ठेवा. आवडीचे पदार्थ अधून मधून खा. प्रथिनयुक्त आहारावर भर द्या. फळं, भाज्या, सॅलाड असा पोषक आहार घ्या.

* वजन कमी करण्यासाठी तज्ज्ञांची मदत घ्या. वेलनेस कोचच्या मदतीने डाएट आणि व्यायामाच्या योजना तयार करा. या प्रयत्नांद्वारे तुम्ही अपेक्षित परिणाम प्राप्त करू शकाल.

## नवीन काय

### महिंद्राचा मास्टरस्ट्रोक

महिंद्रा अँड महिंद्राकडून दोन नव्या इलेक्ट्रीक एसयूव्ही XEV 9e आणि BE 6e लाँच करण्यात आली. कंपनीच्या माहितीनुसार या दोन्ही एसयूव्ही कार इलेक्ट्रीक ओरिजिन आर्किटेक्चर INGLO वर आधारित असतील. कारचे हे मॉडेल स्केलेबल आणि मॉड्यूलर असतील. याशिवाय दोन्ही मॉडेल बॅटरी बॅकअपसह लाँच होणार असून त्यामध्ये अनुक्रमे 59kWh आणि 79kWh चा बॅटरी पॅक असणार आहे. कंपनीच्या माहितीनुसार या कार INGLO इंडस्ट्रीच्या वजनानं सर्वात हलक्या फ्लॅट फ्लोअर स्केटबोर्ड स्ट्रक्चर कार असून त्यांना हाय डेन्सिटी बॅटरी तंत्रज्ञानाशी जोडण्यात आलं आहे. कारच्या बाह्य भागाला अधिक उष्णता आणि अवघड क्रॅश टेस्ट सहन करण्याच्या हिशोबानंच तयार करण्यात आलं आहे.



## ॲप वर्ल्ड

### एका नंबरवरुन दोन डिव्हाईसमध्ये व्हॉट्सॲप!

व्हॉट्सॲपच्या लिंक्ड पर्यायाद्वारे तुम्ही एकाच नंबरवरून दोन व्हॉट्सॲप चालवू शकता. यासाठी तुम्हाला एक छोटीशी ट्रिक फॉलो करावी लागेल. तुमच्या फोनमध्ये तुमचं व्हॉट्सॲप अकाऊंट प्रायमरी डिव्हाईसवर सेट आहे की नाही, हे तपासून घ्यावं लागेल. यानंतर फोन नंबर टाकण्यासाठी वरच्या उजव्या कोपऱ्यात दिसणाऱ्या तीन ठिपक्यांवर क्लिक करा. आता लिंक केलेल्या डिव्हाईसचा पर्याय निवडा आणि फोनमधील स्कॅनरचा वापर करून दुसऱ्या डिव्हाईसवरील क्यूआर कोड स्कॅन करा. हे केल्यानंतर तुम्ही प्रायमरी डिव्हाईसमधून लॉग आऊट न करता दोन्ही डिव्हाईसवर एकाच वेळी व्हॉट्सॲप वापरू शकता.

## टेकज्ञान

### मोबाईल यूजर्ससाठी महत्त्वाचा अपडेट

स्मार्टफोनने आपली कामे अनेक कठीण सोपी केली आहेत. पण यासोबतच घोटाळेबाज आणि सायबर गुन्हेगारांना लोकांची फसवणूक करण्याचा एक स्मार्ट मार्गही दिला आहे. पण भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरण (TRAI) याविरोधात कठोरतेने काम करत असते. ट्रायने अलीकडच्या काळात फ्रॉड आणि ऑनलाइन फसवणूकीपासून वाचवण्यासाठी अनेक पावले उचलली आहेत. जिओ, एअरटेल, व्हीआय आणि बीएसएनलने एक डिसेंबरपासून ट्रेसिबिलिटी नियम लागू केल्यास ओटीपी मेसेज येण्यास वेळ लागू शकतो. तुम्ही बँकिंग किंवा रिझर्व्हेशनसचे काम करत असाल तर तुम्हाला ओटीपी मिळण्यास वेळ लागू शकतो.



## स्मार्ट टिप्स

### झटपट डिलिट करा मेल्स

दोस्तांनो, जी मेलवर असंख्य मेल्स येऊन पडत असतात. जाहिरातींच्या किंवा अन्य अनावश्यक मेल्समुळे इनबॉक्स भरून जातो आणि या मेल्स डिलिट करताना नाकी नऊ येतात. या मेल्स ऑटोमॅटिक डिलिट होऊ शकतात. यासाठी जी मेल ओपन करा. मग सर्च बारमधल्या फिल्टर आयकॉनवर क्लिक करा. इथे फिल्टर आयकॉन दिसला नाही तर सेटिंग्जमध्ये फिल्टर अँड ब्लॉक अॅड्रेसमध्ये क्रिएट न न्यू फिल्टरवर क्लिक करा. इथे तुम्हाला फ्रॉम हा पर्याय दिसेल. इथे नकोसे ई मेल अॅड्रेस नोंदवा. यानंतर क्रिएट फिल्टरवर क्लिक करून डिलिट इट वर टॅप करा. यानंतर पुन्हा क्रिएट फिल्टरवर क्लिक करा. यानंतर संबंधित ई मेल अॅड्रेसवरून येणाऱ्या सगळ्या मेल्स आपोआप डिलिट होतील आणि तुमचा त्रास वाचेल.

# अत्याचारी ब्रिटिशांप्रमाणे प्रशासनाची वागणूक...

## नाना पटोले यांचा हल्लाबोल

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :**
विधानसभा निवडणुका पारदर्शक पद्धतीने पार पडल्या नाही, अशी राज्यातील जनतेला शंका असल्यानेच विविध मार्गाने ईव्हीएम व निवडणूक आयोगाच्या कारभाराचा पंचनामा जनता करत आहे. सोलापूर जिल्ह्यातील मारकडवाडी ग्रामस्थांनी मतपत्रिकेद्वारे मतदान घेण्याची तयारी केली होती पण पोलीस प्रशासनाने बळाचा वापर करून गावकऱ्यांना मतदान करु दिले नाही, असे टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली. यासंदभार्तील पोस्ट त्यांनी एक्सवर टाकली आहे.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, मारकडवाडीमध्ये प्रशासन अत्याचारी ब्रिटिशांप्रमाणे वागले, त्यामुळे ईव्हीएम आणि निष्पक्ष निवडणूक प्रक्रियेवर जे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे ते अधिक गडद झाले आहे. ह्यकर नाही तर डर कशाला? याप्रमाणे प्रशासनाने हे मतदान पार पडू द्यायला हवे होते, पण भाजपा सरकारच्या काळात सर्व सरकारी यंत्रणाच दबावाखाली काम करत आहे. त्यामुळे सोलापूर पोलिसांनी त्यांना वरून आलेल्या आदेशाची फक्त अंमलबजावणी केली. मारकडवाडीत प्रशासकीय यंत्रणेच्या माध्यमातून जनतेचा आवाज दाबण्याचाच प्रकार झाला आहे आणि हाच लोकशाही व संविधानाचा खून आहे.



विधानसभा निवडणूक प्रक्रियेदरम्यान गैरप्रकार होत असल्याच्या अनेक तक्रारी निवडणूक आयोगाकडे केलेल्या आहेत. काँग्रेस पक्षानेही सातत्याने निवडणुकीतील गैरप्रकाराच्या तक्रारी केल्या पण निवडणूक आयोग कुंभकर्णी झोपेतून जागे झाले नाही.

निवडणूक आयोग आता फक्त नावालाच स्वायत्त संस्था उरली असून आज ते भाजपाच्या हाताखालचे कठपुतली बाहुले झाले आहे का? असा प्रश्न जनता विचारत आहे. मारकडवाडीच्या ग्रामस्थांनी लोकशाहीच्या रक्षणार्थ एका मोठ्या लढ्याची सुरुवात केली आहे.

काँग्रेस पक्ष या लढाईत मारकडवाडीच्या ग्रामस्थांसोबत आहे. या लढ्याचे आगामी काळात मोठ्या युद्धात रुपांतर होऊन हुकूमशाही हरेल व लोकशाहीचाच विजय होईल, असा विश्वास नाना पटोले यांनी व्यक्त केला आहे.

निवडणूक आयोगाचे बिंग फुट नये म्हणूनच मारकडवाडीत मतपत्रिकेवर मतदान घेण्यास प्रशासनाने मज्जाव केला काय, असा सवाल पटोलेंनी केला असून पोलिसांच्या दडपशाहीने मारकडवाडीच्या ग्रामस्थांचा आवाज दडपण्याचा प्रयत्न हा लोकशाही व संविधानाचा खूनच आहे. लोकशाही व संविधानाच्या रक्षणासाठी मारकडवाडीने सुरु केलेल्या लढाईला काँग्रेसचा पाठिंबा आहे, असेही पटोले म्हणाले.

मतदान प्रक्रियेत काही घोळ नाही तर मारकडवाडीत मतपत्रिकेद्वारे मतदान घ्यायला प्रशासन का घाबरले? असा सवाल करत निवडणूक आयोगाचे बिंग फुटेल म्हणूनच गावकऱ्यांना मतपत्रिकेवर मतदान करु दिले नाही का?, असा हल्लाबोल पटोले यांनी केला आहे.

## भाजपच्या अनुप धोत्रे यांच्या खासदारकीलाच आव्हान

### उच्च न्यायालयाने पाठवली नोटीस

■ **महासागर प्रतिनिधी अकोला, दि. ३ :**
अकोल्याचे भाजप खासदार अनुप धोत्रे यांना मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने नोटीस बजावली आहे.



कोर्टाच्या या नोटीसीमुळे थेट त्यांच्या खासदारकीलाच मोठे आव्हान देण्यात आले आहे. वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते गोपाल चव्हाण यांनी अनुप धोत्रे यांच्या लोकसभेवरील निवडीला आव्हान दिले आहे. तसेच या नोटीसला २ जानेवारीपर्यंत उत्तर देण्याचे निर्देश कोर्टाने दिले आहेत.

खासदार अनुप धोत्रे यांनी लोकसभा निवडणूक जिंकण्यासाठी भ्रष्ट व्यवहार केला असल्याचा आरोप करत त्यांची निवड रद्द करण्यात यावी, अशी याचिका दाखल करण्यात आली आहे. लोकसभा निवडणुकीच्या काळात खर्चाची मर्यादा ९५ लाख इतकी होती. मात्र अनुप धोत्रे यांनी १ कोटी २४ लाख ६० हजार ५९० रुपयांच्या जाहिराती प्रसिद्ध केल्या असल्याचा आरोप वंचितचे कार्यकर्ते गोपाल चव्हाण यांनी केला आहे. इतकेच नव्हे तर धोत्रे यांनी हा खर्च लपवून ठेवला असल्याचा देखील आरोप चव्हाण यांनी केला आहे.

याचिकाकर्ते वंचितचे गोपाळ चव्हाण यांच्या म्हणण्यानुसार, खासदार अनुप धोत्रे यांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना सादर केलेल्या खर्चाच्या माहितीत ८१ लाख १७ हजार १०२ रुपये खर्च केल्याचे नमूद केले आहे. तसेच भाजपने त्यांच्यासाठी ६ लाख ५५ हजार ८३० रुपये खर्च केल्याची माहिती देखील त्यांनी सादर केली होती.

हा खर्च एकूण ८७ लाख ७२ हजार ९३२ एवढा दाखवण्यात आला होता. मात्र, भाजप पक्षाने धोत्रे यांच्या निवडणूक प्रचारासाठी १ कोटी २४ लाख ६० हजार ५९०रुपयांच्या जाहिराती प्रसिद्ध केल्याचे याचिकेत म्हंटले आहे.

अनुप धोत्रे यांनी या खचार्ची माहिती निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना देणे बंधनकारक होते, मात्र त्यांनी हा खर्च लपवून ठेवला व निवडणूक आयोगाची दिशाभूल केली आहे. यामुळे त्यांची लोकसभेतील खासदारकीची निवड रद्द करण्यात यावी, असे याचिकाकर्ते वंचितचे गोपाळ चव्हाण यांनी केली आहे.

## सोलार पंप योजनेत शेतकऱ्यांना व्हेंडर निवडीची सुविधा उपलब्ध

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :**
शेतकऱ्यांची वीज बिल व अवेळी होणाऱ्या वीज पुरवठ्यापासून सुटका करण्यासाठी केंद्र सरकारने पीएम कुसुम सौर कृषी पंप योजना सुरु केली आहे. आता शेतकऱ्यांना पसंतीचा व्हेंडर निवडण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.



बाजारात उपलब्ध सर्व सौर कृषी पंप कंपनीच्या किंमती जवळपास एक सारख्याच आहेत. त्यात 5 वर्षाची वॉरंटी तसेच सर्व धोक्यांपासून कव्हर देणारी विमा पॉलिसी पुरवठादारांकडून शेतकऱ्यांना देण्यात येते. एकूण किमतीच्या 90 ते 95% अनुदान शेतकऱ्यांना मिळते. म्हणजे साधारणतः 2 लाखांचा 3 एचपीचा सोलार पंप शेतकऱ्यांना अवघ्या 20 हजार रुपयांत उपलब्ध होतो.

महाराष्ट्रात सौर कृषी पंप मान्यतेची अंमलबजावणी 2 संस्था करतात. यात महावितरण व महाराष्ट्र ऊर्जा विकास एजंसीचा समावेश आहे. आत्तापर्यंत महाराष्ट्र ऊर्जा विकास संस्थेने एकूण 5 लाख 5 हजार सौर कृषी पंप मंजूर केलेत. त्यापैकी 1,63,906 सोलार पंप स्थापितही केले आहेत. दुसरीकडे, महावितरणने एकूण 700 सौर कृषी पंप मंजूर केले असून त्यापैकी केवळ 7 सौर कृषी पंप स्थापित केले आहेत.

प्रस्तुत योजनेंतर्गत महाराष्ट्रात विविध 22 कंपन्या सौर कृषी पंपांचा पुरवठा करतात. ज्या शेतकऱ्यांनी 'मागेल त्याला सौर कृषी पंप' योजनेचे अर्ज करून शुल्क भरलेली आहे अशा शेतकऱ्यांसाठी प्रथम टप्प्यात जिल्ह्यानुसार 14 पुरवठा विक्रेते निवडता येणार आहेत. यामुळे शेतकऱ्यांना 90% अनुदानाबरोबरच आपल्या आवडीच्या कंपनीचा सौर कृषी पंपही निवडण्याची मुभा मिळणार आहे.

व्हेंडर निवडीच्या प्रक्रियेंतर्गत महावितरणच्या mahadiscom.in/solar_MTSKPY/index.php या संकेतस्थळावर लॉग इन करावे लागते. महावितरणच्या पोर्टलवर जाऊन 'लाभार्थी सुविधा' हा पर्याय निवडावा. लाभार्थी सुविधा पर्यायात अर्जाची सद्यस्थिती तपासावी. आपला अर्ज क्रमांक टाकावा. आपल्या एमटी आयडी/एमएस आयडी/एमके आयडी या क्रमांकाचा वापर करून अर्जाची माहिती शोधावी. त्यानंतर सर्व माहिती दिसेल. आपले पेमेंट पूर्ण झालेले दिसेल. यानंतर व्हेंडर निवड करावी लागते.

## महाराष्ट्रात 'मर्कट लीला' सुरू – राऊत

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३ :**
महाराष्ट्रामध्ये सरकार बनवायचे असताना अनेक नेते हे दिल्लीत फिरताना दिसत आहेत. देशातील विरोधी पक्ष नेता संपवण्याचा भाजपचा प्रयत्न असल्याचा आरोप उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे.

राज्यपालांनी दहा दिवसानंतर देखील सत्ता स्थापनेचे निमंत्रण दिलेले नाही. तरी देखील आझाद मैदानावर शपथविधीची तयारी सुरू आहे. हे सर्व कोण करत आहे? असा प्रश्न राऊत यांनी उपस्थित केला. ही सर्व दिल्लीतून सुरू असलेली 'मर्कट लीला' असल्याचा आरोप राऊत यांनी केला आहे.

एकनाथ शिंदे हे महाराष्ट्राचे काळजीवाहू मुख्यमंत्री या आहेत. असे असताना मुख्यमंत्री कसा नाराज किंवा गायब होऊ शकतो? असा प्रश्न राऊत यांनी उपस्थित केला. दिल्लीमध्ये ईडी, सीबीआय अशी सर्व यंत्रणा आहे.

मात्र तरी देखील हा सर्व खेळ सुरू असल्याचा आरोप राऊत यांनी केला. स्पष्ट बहुमत असताना देखील अद्याप मुख्यमंत्री पदाचे नाव, भाजप विधिमंडळ पक्षाचा नेता घोषित करू शकले नाहीत. स्पष्ट बहुमत असताना अद्याप राजभवनात जाऊन सरकार स्थापन करण्याचा दावा करण्यात आलेला नाही. तरी मोठ्या प्रमाणात तयारी सुरू असल्याचे राऊत यांनी म्हटले आहे.

## बदनामी केली म्हणून महिलेची हत्या

■ **महासागर प्रतिनिधी, वर्धा, दि. ३ :**
बदनामी केली म्हणून एका महिलेची थेट करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. समुद्रपूर तालुक्यातील गिरड परिसरात रहस्य सापडले. खेक शिवारात जंगल परिसरात अज्ञात महिलेची कवटी व हाड, कपडे, दागिने, मेडिकल पट्टा असे साहित्य दिसून आले होते.

गिरड पोलिसांना ८ नोव्हेंबर २०२४ रोजी ही घटना दिसली. प्रथम आकस्मिक मृत्यूची नोंद करीत तपास सूरू झाला. घटना संशयास्पद दिसली. पोलिसांची चक्रे वेगाने फिरली. याच काळात दारोडा येथील गीता नंदकिशोर सावळे ही महिला हरविली असल्याची नोंद वडनेर पोलिसांत असल्याचे पुढे आले.

ही तक्रार २० सप्टेंबर २०२४ रोजी दाखल झाली. ५५ वर्षीय ही महिला चंद्रपूर येथील मूळची असून ती दारोडा येथे सध्या मुक्कामी असल्याचे स्पष्ट झाले. हरविली असतांना तिच्या अंगावर असलेले कपडे व घटनास्थळी सापडलेले कपडे सारखेच असल्याचे उघड झाले. त्यामुळे तो मृतदेह गीता साळवे हिचा असल्यावर शिक्कामोर्तब करण्यात आले.

मृत महिलेचे पती नंदकिशोर साळवे यांनी तक्रार दिली. आरोपी सुरेश बावणे याचे गावातील एका महिलेसोबत अवैध संबंध आहेत अशी बदनामी कां केली, असा संशय घेत खून केल्याची तक्रार पती साळवे यांनी केली होती. नंतर खुनाचा गुन्हा दाखल झाला. तपासात तांत्रिक पुरावे जमा करण्यात आले. तेव्हा झाल्या घटनेच्या दिवशी मृत महिला व आरोपी सुरेश बावणे हे दोघे सोबत असल्याचे स्पष्ट झाले.

बावणे यास ताब्यात घेऊन विचारपूस सूरू झाली. तेव्हा आरोपी सुरेश बावणे याने आपला गुन्हा कबूल केला. तपासात आरोपी बावणे याचे मृत महिलेशी प्रेम संबंध असल्याचे दिसून आले. त्याचे परत एका दुसऱ्या महिलेशी संबंध असल्याचे आरोप मृत महिलेद्वारे पूर्वी होत होते. ते पाहून आरोपीने गीता हिला गोड बोलून खेक शिवारात नेले. तिच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित केले. नंतर तिच्या गळ्यावर चाकूने वार करीत खून केला, असे दिसून आले.

पोलीस अधीक्षक अनुराग जैन, अपर अधीक्षक सागर कवडे, उपविभागीय पोलीस अधिकारी रोशन पंडित, यांचे या तपासात मार्गदर्शन घेत गिरडचे ठाणेदार संदीप गाडे, वडनेर ठाणेदार लक्ष्मण लोकरे, सायबर सेलचे भुजाडे, अनुप कावळे, गोविंद मुंडे, गोमेद पाटील, असीम शेख, अनुप टपाळे, मंगेश हेमके यांच्या चमुने कारवाई केली आहे.

## ढोलकीच्या तालावर..

लोकमानस



ढोलकी वादन ही कला तसं पाहिलं तर पुरुषांची मक्तेदारी असलेली कला, परंतु याच ढोलकी वर कडाडून थाप देणारी महाराष्ट्रातील पहिली महिला ढोलकी वादक म्हणून जेंव्हा देवयानी मोहोळ यांनी नाव लौकिक मिळवला तेंव्हा त्यांचा त्यांनाच प्रचंड अभिमान वाटू लागला.

१९९५ साली शिर्डीमध्ये गुरू पौर्णिमेनिमित्त देवयानी यांचा ढोलकी वादनाचा पहिलाच कार्यक्रम होता. एक स्त्री ढोलकी वाजवते आहे हे पाहून समरोच्या तमाम प्रेक्षकांनी देखील त्यांना उस्फुर्त प्रतिसाद दिला आणि देवयानी ताईंचा आत्मविश्वास दुणावला गेला. देवयानी यांच्या वडिलांना भजनाची खूप आवड होती. भजनाच्या निमित्ताने ते टाळ, मृदुंग, ढोलकी वाजवायचे. ते सुर कानावर पडूनच देवयानी यांना देखील ढोलकी वादन बद्दल आकर्षण निर्माण झालं.आणि याच आकर्षणातून त्या आज एक उत्तम ढोलकी वादक आहेत.

त्या ढोलकी वाजवतात म्हणून सुरवातीला अनेकांनी एक महिला म्हणून त्यांची टर उडवली. पणं, त्यांनी या लोकांची कधीच पर्वा न करता केवळ आपल लक्ष डोळ्यासमोर ठेऊन एक यशस्वी ढोलकी वादक त्या बनल्याच.त्या गेली 20 वर्ष ढोलकी वादनाच्या क्षेत्रात कार्यरत आहेत. संपूर्ण महाराष्ट्रात आणि परदेशात त्यांचे ढोलकी वादनाचे अनेक कार्यक्रम झाले आहेत.

२००८ साली त्यांनी स्वतःचा महिला बँड काढायचा ठरवलं आणि तो काढला देखील. या बँडमधे सगळ्या वाजंत्री या महिलाच होत्या. कोणी कॉलेजची विद्यार्थिनी, तर कोणी गृहिणी, कोणी नोकरदार महिला देखील. या बँडमधे काम करणाऱ्या सर्व महिलांच्या सुरक्षेची जबाबदारी देवयानी स्वतः घेतात.

आजवर देवयानी ताईंच्या या अभिनव अशा ढोलकी वादन कलेचा अनेक सामाजिक संस्थांकडून विविध पुरस्कारांनी सन्मान केला गेला आहे. त्यांना दोन मुलं आहेत. त्यांचा शो संपून घरी जायला कधी कधी मध्यरात्र होते. परंतु त्यांचे पती आणि मुलं यांनी त्यांना आजवर सांभाळून घेतल आहे.

स्त्रीला अलौकिक शक्तीच निसर्गाने बहाल केली आहे म्हणून आपण हे सहज करू शकतो असं त्या मानतात. त्यांच्या बँडमध्ये ढोलकी शिवाय इतर वाद्य देखील त्यांना वाजवावी लागतात. त्याचा सराव देखील त्यांनी ठेवलेला आहे. देवयानी मोहोळ एक स्त्री कलावंत आहेत. यशस्वी पुरुषामागे त्याची पत्नी खंबीरपणे उभी अस्ते अस म्हणतात. परंतु देवयानी ताई सारख्या एका कलाकार मागे त्यांचे संपूर्ण कुटुंबच खंबीरपणे उभे आहे. देवयानी मोहोळ या यशस्वी ढोलकी कलाकाराची ही यशोगाथा समाजातील इतर महिलांना देखील प्रेरणा देईल.

■ ■

## : तंत्र मंत्र : सुझुकी मोटरसायकलचा सुझुकी मात्सुरी उत्सव

सुझुकी मोटरसायकल इंडिया सुझुकी मोटर कॉर्पोरेशन, जपानच्या दुचाकी उपकंपनीने, मोटरसायकल चालवण्याची आवड, मनोरंजन आणि सामुदायिक भावनेचा उत्सव, सुझुकी मात्सुरी या प्रतिष्ठित मोटरसायकल महोत्सवाच्या तिसऱ्या आवृत्तीचा समारोप केला.

रिचर्डसन अँड क्रुडास, मुलुंड, मुंबई येथे आयोजित, या कार्यक्रमाने सर्व स्तरातील रायडर्सना एकत्र आणून मोटरसायकल चालवण्याची त्यांची आवड साजरी केली.

कृतज्ञता व्यक्त करताना सुझुकी मोटरसायकल इंडिया प्रा. लि. चे कार्यकारी उपाध्यक्ष विक्री, विपणन आणि विक्री, देवाशिष हांडा म्हणाले, सुझुकी मात्सुरी ही उत्कटता, नावीन्यपूर्णता आणि मोटारसायकल चालवण्याच्या भावनेची व्याख्या करणारी सौहार्दता आहे. हा उत्सव केवळ एक कार्यक्रम नाही. मोटारसायकल चालवण्याच्या घटनेला सलाम करण्याचा हा आमचा मार्ग आहे, जो आम्हाला प्रेरणा देतो आणि पुढे नेतो.

हे आमच्या ग्राहकांशी जोडले जाण्यासाठी, दीर्घकालीन नातेसंबंध जोपासण्यासाठी आणि आम्ही मोठ्या प्रमाणावर रायडिंग समुदायासोबत सामायिक केलेले चिरस्थायी बंध साजरे करण्याची आमची अटूट बांधिलकी दर्शवते. यामध्ये आमच्यात सामील झालेल्या प्रत्येक सहभागीचे आम्ही मनापासून आभारी आहोत.

■ ■




## पक्षी संवर्धन काळाची गरज आहे का?

माझं मत

**राजीव वर्तक (शिक्षक)**
■ होय. मागील काही वर्षांपासून राज्यातील सर्वच भागात झपाट्याने शहरीकरण सुरु आहे. सिमेंटचे टॉवर उभे राहत आहेत. यामुळेच, वृक्षांची मोठ्या प्रमाणात कत्तल होत असल्याने कावळे, चिमण्या, कबुतर, घारी, बगळे अशा शहरी पक्षांची संख्या आता रोडवताना दिसते आहे. पक्षी हे आपल्या जैव विविधतेचा भाग असल्याने त्यांचे संवर्धन ही काळाची नक्कीच गरज आहे.

**विनोद गमरे (संगणक चालक)**
■ शहरी भागात ग्रामीण भागासारखे मोठाले अंगण नसले तरी शहरातील आसपासच्या परिसरात जी वृक्ष संपदा आहे त्यावर अजूनही सकाळच्या वेळी कोकिळेचे कुहूकुहू सूर ऐकू येतात. अगदी, पोपट, बगळे, डोमकावळे असे सहसा शहरात दुर्मिळ असणारे पक्षी देखील अधूनमधून दिसतात. मात्र आता आधुनिकीकरणामुळे या पक्षांची संख्या कमी होते आहे हे सत्य आहे. पक्षांना वाचवले तरच निसर्गसंपदा टिकेल.

**रिया बनसोडे (गृहिणी)**
■ आमच्या मुलांना आम्ही त्यांच्या लहानपणी अगदी अंगणात बसून चिऊकाऊच्या साक्षीने घास भरवलेले आहेत. आणि मुलांना देखील चिऊकाऊबद्दल आणि एकूणच आपल्या निसर्गाचं समृद्ध वैभव असलेल्या पक्षाबद्दल प्रचंड आकर्षण होता. मात्र, आता आमच्या नातवंडांना खेळवतनाना चिऊकाऊ केवळ गोष्टींमध्ये राहून गेल्या आहेत कि काय? अशी अवस्था दिसते. या पक्षांना दाणे पाणी देऊन त्यांचे संरक्षण करायलाच हवे.

**आयुष पाटणकर (विद्यार्थी)**
■ काळ जसा झपाट्याने बदलतोय तसा पर्यावरणात देखील बदल दिसतो आहे. आपल्याकडे चिमणी, कावळे, कबुतर, कोकिळा हे पक्षी अजून तरी दिसतात हे आपले भाग्यच आहे.

मात्र, विविध प्रकारच्या प्रदूषणमुळे, वाढत्या शहरीकरणामुळे आणि वृक्षतोडीमुळे या पक्षांची घरटीच नष्ट होत आहेत. मग हे पक्षी टिकणार कसे? यावर सर्वांनी गांभीर्याने विचार करून पक्षी वाचवा अभियान सुरु करायला हवे.

■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## तीन वर्षांच्या चिमुरड्यावर बिबट्याचा हल्ला

■ **महासागर प्रतिनिधी, साकोली, दि. ३ :**
गोंदिया जिल्ह्याच्या अर्जुनी मोरगाव तालुक्यातील गोठणगाव येथे घराच्या गच्चीवर खेळणाऱ्या तीन वर्षांच्या चिमुरड्यावर बिबट्याने हल्ला करीत सुमारे ५० मीटरपर्यंत ओढले. गावकरी ओरडल्याने मुलाला सोडून बिबट जंगलाकडे पळून गेला आणि मुलाचा जीव वाचला.

गोठणगाव येथील दयाराम साखरे यांचा तीन वर्षांचा पुतण्या मृदुल नंदेश्वर मंडईच्या निमित्ताने वडिलांसोबत आला होता. सायंकाळी मृदुल मामाच्या घराच्या गच्चीवर खेळत असताना बिबट्या साखरे यांच्या घरात घुसला आणि मृदुलला ओढत नेले.



मृदुलच्या रडण्याचा आवाज ऐकून रणजित साखरे धावत आले आणि ओरडायला सुरुवात केली. रणजितचा आवाज ऐकून शेजारी व गावकरी धावत आले. त्यांनीही आरडाओरडा करत लाठ्या-काठ्यांनी हल्ला करण्यास सुरुवात केली. त्यानंतर बिबट्याने मृदुलला सोडून जंगलाच्या दिशेने पळ काढला.

गोठणगाव हे वनक्षेत्राला लागून असल्याने या परिसरात वन्य प्राण्यांचा नेहमीच वावर असतो. गेल्या अनेक दिवसांपासून या परिसरात बिबट्याचा धुमाकूळ सुरू आहे. यापूर्वीही बिबट्याने अनेकांवर हल्ले केले आहेत. आता बिबट्याने एका बालकाला पळवून नेल्याच्या या घटनेने ग्रामस्थांमध्ये भीती पसरली असून, बिबट्याचा बंदोबस्त करण्याची मागणी ग्रामस्थ करत आहेत.

## तर लाडकी बहीणचे पैसे सरकारला परत करणार

■ **वृत्तसंस्था, सोलापूर, दि. ३ :**
सोलापूर जिल्ह्यातील माळशिरसमधील मारकडवाडी गाव राज्यभरात चर्चेत आले आहे. या ठिकाणी बॅलेट पेपरवर मतदान घेण्याची प्रक्रिया ३ डिसेंबर रोजी होणार होती.

मतदान करण्यासाठी गावातील काही महिला मतदार मतदान केंद्रावर दाखल झाल्या होत्या. परंतु प्रशासनाने ही मतदान प्रक्रिया बेकायदेशीर ठरवल्यानंतर मतदान प्रक्रिया रद्द करण्यात आली. यानंतर येथील महिलांनी लाडकी बहीण योजनेचे मिळालेले पैसे सरकारला परत करणार असल्याचा इशारा दिला आहे .

मारकडवाडीच्या ग्रामस्थ अनिता कोडलकर यांनी सांगितले की, ईव्हीएममध्ये काहीतरी घोळ वाटतोय अन्यथा एवढे कमी मतदान उत्तम जानकर यांना होत नाही. आमचे गाव नेहमी उत्तम जानकर यांना मतदान करते. मात्र यावेळेस त्यांना गावातून कमी मते पडले आहेत. त्यामुळे आम्ही परत मतदान करण्याची मागणी करत आहोत. सरकारने आम्हाला लाडकी बहिणीचे पैसे दिले. मात्र ते पैसे आम्ही खात्यातून काढले नाहीत. सरकारने पैसे परत मागितले तर त्यांना देऊन टाकणार, असे त्यांनी सांगितले.

महायुतीला मिळालेले यश हे लाडक्या बहीण योजनेमुळे मिळाल्याचे सांगितले जात आहे. त्याचवेळी या बहिणींनी पैसे परत करण्याची भूमिका घेतली आहे. सोलापूर मारकडवाडी गावात आज होणारे बॅलेट पेपरवर मतदान रद्द करण्यात आले.

सार्वजनिक आरोग्य विभाग
जिल्हा परिषद, गडचिरोली

राष्ट्रीय जंतनाशक दिन

जंतामुळे मुलांमध्ये ॲनिमिया, पोटदुखी, उलटया, अतिसार, मळमळ, भूक मंदावणे यासह कुपोषण, वाढ खुंटणे आदी आजारांचा मुलांना धोका असतो.

4 डिसेंबर रोजी गोळी घ्या व त्या दिवशी गोळी घेऊ न शकलेल्या मुलां-मुलींना 10 डिसेंबर रोजी गोळी दिली जाईल.




'जंतांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राष्ट्रीय जंतनाशक दिनी 1 ते 19 वर्ष वयोगटातील सर्व मुलां-मुलींना एकाच दिवशी जंतनाशक गोळी दिली जाईल. ही गोळी सर्व शासकीय, खासगी शाळा, महाविद्यालये आणि अंगणवाडी केंद्रांमध्ये सर्व मुला-मुलींना मोफत दिली जाईल'

जंतांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ही काळजी घ्या.
- शौचास जाऊन आल्यावर आणि जेवणा अगोदर साबणाने हात स्वच्छ धुवावेत.
- शौचालयाचा वापर करावा तसेच शौचालयाची स्वच्छता राखावी. चपला / बूट वापरावेत.
- सुरक्षित आणि स्वच्छ पाणी प्यावे.
- अन्न झाकून ठेवावे.
- नखे स्वच्छ ठेवावी व नियमित कापावी.
- भाज्या, फळे आणि सॅलड सुरक्षित आणि स्वच्छ पाण्याने धुवावेत.



आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, गडचिरोली

नागपूर
महासागर
# वृत्तसागर
■ बुधवार, दि. ४ डिसेंबर २०२४ ■

## ब्लिंकर मोडवर राहणार १४ चौकांचे सिग्नल

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :
वाहतूक व्यवस्था सुरळीत रहावी आणि वाहन चालकांच्या पेट्रोलचीही बचत होण्याच्या उद्देशातून वाहतूक विभागाचे डीसीपी अर्चित चांडक यांनी शहरातील 14 चौकांचे सिग्नल ब्लिंकर मोडवर ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

र वाहतूक व्यवस्थापनासाठी शहरातील प्रमुख चौकात सिग्नल बसविण्यात आले आहेत. वाहतुकीच्या प्रवाहानुसार त्यांची वेळही निश्चित करण्यात आली आहे. मात्र काही चौकांत वाहतुकीचा प्रवाह कमी रहात असल्याने सिग्नलमध्ये बदल करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दुपारी 1 ते 4 वाजता दरम्यान शहरातील 14 चौकांतील सिग्नल ब्लिंकर मोडवर राहतील. या चौकांमध्ये नीरी टी-पॉइंट, बजाजनगर चौक, गजानन स्कूल टी-पॉइंट, त्रिशरण चौक, आवारी चौक, विजय टॉकीज टी पॉइंट, कन्नमवार चौक, अहिंसा चौक, राजाराणी चौक, धरमपेठ वाय पॉइंट, अजीत बेकरी टी पॉइंट, जीपीओ चौक, मोहम्मद रफी चौक आणि 10 नंबर पुलाचा समावेश आहे. यामुळे नागरिकांना अधिक वेळपर्यंत थांबावेही लागणार नाही आणि विनाकारण त्यांचे पेट्रोलही जळणार नाही.

मात्र या दरम्यान अधिक जबाबदारीने आणि सतर्क रहावे लागेल. या चौकांत वेग मर्यादा 20 किमी. प्रतितास निश्चित करण्यात आली आहे. चौकातून ये-जा करताना वेग मर्यादेसह वाहतुकीच्या नियमांचे पालन करावे, असे आवाहन चांडक यांनी केले आहे.

## शपथविधी सोहळ्याला चहावाल्याची हजेरी



■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ३ :
महायुती सरकारचा शपथविधी सोहळा ५ डिसेंबर रोजी मुंबईतील आझाद मैदानावर होणार आहे. या सोहळ्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शहा, योगी आदित्यनाथ यांसह देशभरातली अनेक मान्यवर, धर्मगुरू, संत-महंत यांना शपथविधी सोहळ्यासाठी आमंत्रित करण्यात येणार आहे. नागपुरातील एका चहावाल्याला देखील शपथविधी सोहळ्याचे आमंत्रण मिळाले आहे.

देवेंद्र फडणवीस यांनी गोपाळ बावनकुळे या चहावाल्याला हे खास आमंत्रण दिले आहे.

गोपाल बावनकुळे हे नागपूरमधील चहाविक्रेते असून देवेंद्र फडणवीस यांचे मोठे चाहते आहेत. ते रामनगर परिसरात टी स्टॉल चालवतात. त्यांनी आपल्या स्टॉलवर देवेंद्र फडणवीसांचा फोटो देखील लावला आहे. देवेंद्र फडणवीस हे गोपाल बावनकुळे यांच्या टी स्टॉलवर चहा पिण्यासाठी गेले होते. त्यावेळी मुख्यमंत्री झाल्यानंतर पुन्हा चहा प्यायला या, असे फडणवीसांना आमंत्रण दिल्याचे गोपाळ बावनकुळे यांनी सांगितले.

देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री होत असल्याचा आनंद आहे. ५ डिसेंबरला होणाऱ्या शपथविधीसाठी मला पक्षाने आणि देवेंद्र फडणवीसांनी पास पाठवला आहे. मी या सोहळ्याला आवर्जुन उपस्थित राहणार आहे. चहावाला म्हणून मला आमंत्रण दिले आहे. आम्ही त्यांना मेसेज करतो किंवा कोणत्याही माध्यमातून त्यांची भेट घेतो, तेव्हा ते आम्हाला मदत करतात.

मी शपथविधी सोहळ्यासाठी जात असलो, तरी त्यादिवशी माझी चहा कँटिन सुरू राहील आणि आम्ही मोफत चहा वाटणार आहोत. असे गोपाल बावनकुळे म्हणाले.

दरम्यान, महायुतीचे सरकार ५ तारखेला स्थापन होणार असल्याचे सांगण्यात येत असून, नागपुरातून अनेकजण सोहळ्याला उपस्थित राहतील.

## फडणवीसांच्या शपथविधीसाठी खास चार जॅकेट तयार



■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ३ :
देवेंद्र फडणवीस राज्याचे मुख्यमंत्री राहणार असल्याचे जवळपास निश्चित झाले आहे. मुख्यमंत्री म्हणून ५ डिसेंबरला होणाऱ्या शपथविधी सोहळ्यासाठी त्यांच्यासाठी नागपूरच्या गोविंद टेलर म्हणजेच पिंटू मेहाडिया यांनी खास चार जॅकेट तयार केले असून ते मुंबईला रवाना झाले आहेत.

येत्या ५ डिसेंबरला आझाद मैदानावर शपथविधी सोहळा होणार आहे. या शपथविधी सोहळ्याला देवेंद्र फडणवीस कुठला पोशाख परिधान करणार याकडे लक्ष लागले असताना नागपूरच्या गोविंद टेलर म्हणजेच पिंटू मेहाडिया यांनी त्यांच्यासाठी खास चार जॅकेट तयार केले आहे.

यापूर्वी मॉडेलिंग करताना देवेंद्र फडणवीस यांनी वेगवेगळे पोशाख परिधान केले असताना त्याचे शहरात होर्डींग लावले असताना त्याची चांगलीच चर्चा झाली होती. देवेंद्र फडणवीस गेल्या काही दिवसांत वेगवेगळे जॅकेट परिधान करताना आता शपथविधी सोहळ्यासाठी त्यांच्यासाठी पिंटू मेहाडिया यांनी खास जॅकेट तयार केले आहे. देवेंद्र फडणवीस महापौर असताना त्यांचे कपडे शिवण्याचे काम करत आहे. त्यातही खास जॅकेट शिवण्यासाठी ते प्रसिद्ध असल्यामुळे ते त्यांच्याकडून कपडे शिवत असतात.

फडणवीस राज्याचे मुख्यमंत्री होत असल्यामुळे आम्हाला आनंद आहे. त्यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घेताना मी शिवलेले जॅकेट घालावे अशी अपेक्षा आहे. त्याबाबत त्यांच्याशी बोलणे झाल्यावर ते आता मुंबईला आणले आहे. प्रथम आमदार झाल्यानंतर त्यांनी माझ्याकडून बंगाली कुर्ता आणि जॅकेट शिवले होते. त्यानंतर महापौर झाले तेव्हाही त्यांनी माझ्याकडून कपडे शिवले होते. जवळपास ३२ वर्षापासून त्यांचे कपडे शिवत असल्याचे मेहाडिया यांना सांगितले.

ते सुरुवातीला नियमित जॅकेट घालायचे नाही, कुठला कार्यक्रम असेल तरच ते घालत होते. मात्र पण २०१४ मध्ये मुख्यमंत्री झाले तेव्हा त्यांनी मी शिवलेले जॅकेट घातले होते. तेव्हापासून मी त्यांचे जॅकेट बनवीत असल्याचे त्यांनी सांगितले. शपथविधी सोहळाच्यावेळी फडणवीस हे चार पैकी एक जॅकेट घालतील असा विश्वास असल्याचे त्यांनी सांगितले.

## अजित पवार गट मनपाच्या ४० जागा लढणार

**प्रशांत पवार यांची माहिती**

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :
राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांनी विदर्भात एकही प्रचार सभा न घेताही राष्ट्रवादीला (अजित पवार) घवघवीत यश मिळाल्याने राष्ट्रवादी काँग्रेसचाहविश्वास दुणावला आहे. जिल्ह्यात एकही आमदार नसला तरी आम्ही नागपूर महापालिकेच्या निवडणुकीत ४० जागा लढण्याचा विचार करीत आहोत,असे राष्ट्रवादीचे ( अजित पवार) शहर अध्यक्ष प्रशांत पवार यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

राष्ट्रवादीला (अजित पवार) विधानसभेत ४१ जागांवर मिळाल्या आहेत. या पक्षाने नागपूर जिल्ह्यात केवळ काटोल येथे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांचे नाम साध्यर्म असलेल्या शेत मजूराला काटोल येथून उमेदवारी दिली होती. तो पराभूत झाला आहे. मात्र, विदर्भात सहा जागा या पक्षाला मिळाल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर पत्रकार परिषदेत बोलताना शहराध्यक्ष प्रशांत पवार म्हणाले, येत्या दोन महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूका होणार आहेत,. नागपूर महापालिकेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा ४० जागांवर निवडणूक लढवणार आहे. कार्यकारीणीच्या बैठकीत ठराव करण्यात आला.

राष्ट्रवादीने गेल्या दोन वर्षात शहरातील विविध भागांत जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी आंदोलने केली, मोर्चे काढली, रस्ते, गडर लाईन, पाण्याची समस्या सोडवण्यात पक्षाला यश मिळाले. जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी पक्ष नेहमीच कार्य करीत राहला आहे आणि येत्या पालिकेच्या निवडणुकीत जनतेने मोठया प्रमाणात नगरसेवक निवडणूक दिल्यास आणखी कामे करू, असे प्रशांत पवार म्हणाले.

लोकसभा निवडणुकीत गडकरी यांच्या प्रचारासाठी आणि विधानसभा निवडणुकीत प्रचारासाठी राष्ट्रवादीने मेहनत केली. आता महापौर महायुतीचा करण्याचे आमचा निश्चय आहे. राष्ट्रवादी पूर्ण ताकदीने महापालिकेची निवडणूक लढवणार आहे. इच्छुक उमेदवार मागील वर्षभरापासून आपल्या प्रभागात तयारीला लागले आहेत. मोठ्या संख्येने नगरसेवक महापालिकेवर जिंकून आणू, असा विश्वासही प्रशांत पवार यांनी व्यक्त केला. यावेळी शहरातील सर्व सहाही विधानसभा मतदारसंघांचे पदाधिकारी, विविध आघाड्यांचे प्रमुख उपस्थित होते.

## अनधिकृत पीयूसी देणाऱ्या केंद्रावर कारवाई कधी होणार?

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :
विद्यार्थ्यांना सहलीवर घेऊन जाणा ?या नागपूरच्या सरस्वती विद्यालयाच्या सहल बसला हिंगणा जवळ अपघात झाला होता. या प्रकरणाला परिवहन खात्याने गांभीर्याने घेतले आहे. आरटीओने अनधिकृत पीयूसी देणाऱ्या पीयूसी केंद्राला कारणे दाखवा नोटीस बजावत स्पष्टीकरणासाठी दोन दिवसांची मुदत दिली होती. परंतु, मुदतीनंतरही संबंधिताकडून स्पष्टीकरण आले नाही.

नागपुरातील सरस्वती विद्यालयातील विद्यार्थ्यांना सहलीच्या घेऊन निघालेल्या बसला हिंगणा परिसरात अपघात होऊन एक विद्यार्थिनीचा मृत्यू तर अनेक विद्यार्थी जखमी झाले होते. अपघातानंतर या बसच्या मालकाने अनधिकृतरित्या अपघातग्रस्त बसची पीयूसी काढल्याचे उघड झाले.

पीयूसी देणाऱ्या केंद्राला २८ नोव्हेंबरला कारणे दाखवा नोटीस बजावून दोन दिवसांच्या स्पष्टीकरणासाठी मुदत दिली होती. दरम्यान, मुदत संपल्यावरही बस मालकाकडून आरटीओकडे उत्तर आले नाही. त्यामुळे पुढील प्रक्रिया सुरू होणार आहे. त्यात या केंद्राची नोंदणी रद्द होऊन तेथील पीयूसी केल्याचे दर्शवलेले यंत्रही जप्त होण्याची शक्यता आहे. या विषयावर पूर्व नागपूर उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातील उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अविनाश राऊत म्हणाले, या प्रकरणात पीयूसी केंद्रासह सगळ्याच दोषींवर कडक कारवाई केली जाणार असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

## मुस्लीम पर्सनल लॉ बोर्डाची सर्वोच्च न्यायालयात धाव

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :
अखिल भारतीय मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाने (एआयएमपीएलबी) सर्वोच्च न्यायालयाकडे देशभरातील मशिदी आणि दर्ग्यांवरील दाव्यांशी संबंधित याचिका स्वीकारण्यापासून कनिष्ठ न्यायालयांना थांबवावे अशी मागणी केली आहे.

प्रार्थनास्थळ (विशेष तरतुदी) कायदा १९९१ चे कसोशिने पालन करण्यात यावे. असे न केल्यास संपूर्ण देशात स्फोटक परिस्थिती निर्माण होवू शकते. आणि त्यासाठी सर्वोच्च न्यायालय आणि केंद्र सरकार जबाबदार असेल असा इशाराही कार्यालय सचिव डॉ. वकार उद्दीन लतिफ यांनी केलेल्या लेखी आवाहनात म्हटले आहे.

१३ सप्टेंबर १९९१ मध्ये तत्कालीन गृहमंत्री शंकरराव चव्हाण यांनी हा कायदा संसदेत मांडला. या कायद्यानुसार, देशातील कुठल्याही प्रार्थना स्थळाची धार्मिक ओळख ही देशाचा स्वातंत्र्य दिनी म्हणजेच १५ ऑगस्ट १९४७ रोजी जी होती तीच कायम ठेवण्यात यावी. कुठल्याही प्रार्थना स्थळाचं रूपांतर/धर्मांतर करण्यास मनाई आहे.

मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाचे राष्ट्रीय प्रवक्ते डॉ. एस. क्यू. आर. इलियास यांनी दर्गे, मशिदी आणि मुस्लिम प्रार्थनास्थळांवरील हिंदूंच्या वाढत्या दाव्याचा निषेध केला आहे. वाराणशी येथील ग्यानवापी मशिद, अजमेर येथील ख्वाजा मोईनुद्दीन चिश्ती दर्गा, मथुरा येथील शाही इदगाह, मध्य प्रदेशातील भोजशाळा मशिद, टिलेवाली मशिद, लखनऊ आदी अनेक मुस्लिम प्रार्थनास्थळांवर हिंदु संस्था व संघटनांनी हक्क सांगण्याचे प्रमाण वाढले आहे. या प्रकाराचा डॉ. एस. क्यू. आर. इलियास यांनी निषेध केला आहे.

**चोराच्या मनात चांदणे नव्हे चाँद**

विहिंपचे गोवा व महाराष्ट्राचे प्रांत मंत्री गोविंद शेंडे यांनी या प्रकरणी मुस्लीम पक्षावर निशाणा साधला आहे. ते म्हणाले, हिंदु पक्षकार मशिद, दर्गा आदी प्रार्थनास्थळावर दावा करीत आहे. तर त्याची मुस्लिमांना इतकी भीती का वाटत आहे? कर नाही त्याला तर डर नाही. न्यायालयाने सर्व्हेक्षण करण्याचे आदेश दिलेले आहे. ते होवून जावू द्या, असे ते म्हणाले.

सर्व्हेक्षणात काय तथ्य आणि वस्तुस्थिती समोर येते ते येवू द्याना. ?दुध का दुध व पानी का पानी' होवून जाईल. मनात भीती नसेल तर मुस्लिमांनी स्वतःहून समोर यायला पाहिजे. चोराच्या मनात चांदणे नाही. तर चाँद असल्याची टीका त्यांनी केली आहे.

## महाबोधी टुरिझमच्या संचालकांवर गुन्हा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :
उसणवारीने घेतलेली रक्कम परत देत नसल्यावरून पाचपावली पोलिसांनी एका महिलेच्या तक्रारीवरून महाबोधी टुरिझमच्या संचालकांवर गुन्हा नोंदविला आहे.

निशांत चंद्रमणी मानवटकर (30) रा. कपिलनगर आणि भंते शिवनी बोधानंद थेरो (47) रा. बुद्धभूमी महाविहार, खैरी कामठी अशी आरोपींची नावे आहेत. आरोपींनी अनेकांची फसवणूक केली असल्याची माहिती पोलिसांना मिळाली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मानवटकर आणि थेरो महाबोधी टुरिज्मचे संचालक आहेत. दोघेही समाजाच्या लोकांसाठी धार्मिकस्थळांना भेटीची सहल आयोजित करतात. फियार्दी प्रतीभा चंद्रशेखर नितनवरे (56) यांच्याशी त्यांची जुनी ओळख होती.

मार्च महिन्यात दोघांनीही प्रतीभा यांची भेट घेतली. त्यांना सहल आयोजित करण्यासाठी पैशांची आवश्यकता असल्याचे सांगितले. रोकड आणि धनादेशाच्या माध्यमातून प्रतीभा यांनी त्यांना 10 लाख 50 हजार रुपये दिले. आरोपींनी लवकरच त्यांचे सर्व पैसे परत करण्याचे आणि भागीदारी देण्याचे आश्वासन दिले होते. त्यानंतर आरोपींनी सहल आयोजित केली आणि पैसेही कमावले, मात्र प्रतीभा यांची रक्कम परत केली नाही.

प्रतीभा यांनी पैशांसाठी दबाव टाकला असता आरोपींनी देण्यास नकार दिला. प्रतीभा यांनी पाचपावली पोलिसात तक्रार दाखल केली. पोलिसांनी दोघांवरही फसवणुकीचा गुन्हा नोंदविला. मानवटकर आणि थेरो यांना न्यायालयातून अटकपूर्व जामीन मिळाला. तपासादरम्यान पोलिसांना माहिती मिळाली की, दोन्ही आरोपींनी अशाप्रकारे अनेकांना चुना लावला आहे. पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, आरोपींनी आणखी कोणाची फसवणूक केली असेल तर त्यांनी पाचपावली पोलिसांशी संपर्क करावा.

## १५ वर्षीय मुलीचा सर्पदंशाने मृत्यू

**घुटीपांजरी शिवारातील घटना**



■ महासागर प्रतिनिधी हिंगणा, दि. ३ :
शेतात कापूस वेचताना पायाला सर्पदंश होऊन एका १५ वर्षीय मुलीचा मृत्यू झाला. ही घटना सोमवारी (२) दुपारी ४ वाजताच्या सुमारास हिंगणा पोलीस स्टेशन अंतर्गत घुटीपांजरी शिवारात घडली.

सुनिता अंतऋषी देशमुख, वय १५ वर्षे, रा. ठाकरवाडी, तह. हातगाव, जि. नांदेड, ह.मु. घुटीपांजरी, हिंगणा असे मृतकाचे नाव असून ती आपल्या कुटुंबासोबत घुटिपांजरी येथे मोलमजुरी करण्यासाठी आली होती.

घुटीपांजरी येथील बि. रामाराजु राजु यांचे शेतात तिचे कुटुंब काम करायचे. सोमवारी कापूस वेचणीचे काम सुरू असतानाच सुनीताचे उजवे पायाला सर्पदंश झाला. तीला नातेवाईकांनी उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी मयताचा चुलत भाऊ फिर्यादी नामे प्रकाश शंकर देशमुख, वय २६ वर्षे, रा. रा. ठाकरवाडी, तह. हातगाव, जि. नांदेड ह.मु.- घुटीपांजरी, हिंगणा, नागपुर यांनी दिलेल्या सुचनेवरून हिंगणा पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली.

## महावितरणचे कार्यकारी संचालक सुनिल पावडे यांचे निधन



■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ३ :
महावितरणचे कार्यकारी संचालक (प्रकल्प) सुनिल रंगनाथ पावडे (वय ५४ वर्षे) यांचे सोमवारी रात्री जळगाव येथे ह्दयविकाराच्या तीव्र धक्क्याने दुखःद निधन झाले आहे. त्यांच्या पार्थिवावर पारनेर (जि. अहिल्यानगर) तालुक्यातील दरोडी या त्यांच्या मूळ गावी बुधवार ४ डिसेंबर रोजी सकाळी अंत्यसंस्कार केले जाणार आहेत.

तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात सन १९९१ मध्ये कनिष्ठ अभियंता या पदापासून सुनिल पावडे यांनी वीज क्षेत्रातील सेवेला सुरुवात केली. सन २००६ मध्ये सरळसेवा भरतीतून ते कार्यकारी अभियंता झाले. नोव्हेंबर २०१५ पासून अधीक्षक अभियंता म्हणून त्यांनी पुणे ग्रामीण व नाशिक शहर मंडलात काम केले.

तद्नंतर २०१८ मध्ये सरळसेवेतून मुख्य अभियंता पदी बारामती परिमंडलात काम केले. मुख्य अभियंता म्हणून काम करत असताना त्यांनी महाराष्ट्राला एक गाव, एक दिवस सारखा उपक्रम दिला. दैनंदिन कामातही त्यांनी स्वतःची छाप कायम सोडली. बारामती परिमंडल कायम अग्रेसर राहील याची काळजी घेतली. मुख्य अभियंता म्हणून त्यांनी बारामती येथे ६ वर्षे काम केले. या दरम्यानच्या काळात त्यांनी काही काळ प्रादेशिक संचालक पदाचा कार्यभारही सांभाळला. जुलै २०२४ मध्ये त्यांची कार्यकारी संचालक (प्रकल्प) पदी निवड झाली होती.

अत्यंत कर्तव्यनिष्ठ व शिस्तप्रिय अभियंता अशी सुनिल पावडे यांची ओळख होती. त्यांच्या निधनामुळे महावितरणच्या वतुर्ळात शोक व्यक्त केला जात आहे. पावडे यांच्या पश्चात त्यांची पत्नी निशिगंधा, मुलगी मृणाल व मुलगा सोहम असा परिवार आहे. त्यांना महावितरणच्या सांघिक कार्यालयात श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

## बंदीजन महिलांच्या मुलांशी एकरुप झाले न्यायमूर्ती भूषण गवई

■ प्रेमानंद हटवार नागपूर, दि. ३ :
क्षणिक रागाच्या भरात कायदा हाती घेऊन एखादा गुन्हा, वाईट कृत्य केल्यामुळे गुन्हेगारांच्या वर्तनात सुधारणा व्हावी व केलेल्या गुन्ह्याची शिक्षा भोगताना भविष्यातील संयमी जिवनासाठी आकार देता यावा यासाठी कारागृहांवर दुहेरी जबाबदारी असते.

यात ज्यांची लहान मुले आहेत अशा महिला बंदीजनांच्या मुलांच्या वाट्याला अंगणवाडी सुविधेसह उमलण्याचे सारे हक्क मिळावेत यासाठी न्यायालय दक्ष असते. नागपूर मध्यवर्ती कारागृहातील सहा वषार्खालील ७ मुले व त्यांच्या बंदीजन माता आणि इतर एकूण ११४ बंदीजन महिलांशी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई यांनी सुमारे ४५ मिनिटे संवाद साधून भविष्यातील सन्मार्गी जिवनासाठी त्यांचा विश्वास द्विगुणीत केला.



सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती तथा राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाचे कार्यकारी अध्यक्ष भूषण गवई यांनी नागपूर मध्यवर्ती कारागृहास भेट देऊन पाहणी केली. मध्यवर्ती कारागृहातील विविध विभागांचे निरिक्षण करुन तेथील सोई सुविधांचा व कामकाजाचा त्यांनी आढावा घेतला. याप्रसंगी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती व्ही.आर घुगे आणि नागपूर खंडपीठाचे प्रशासकीय न्यायमुर्ती न्यायमूर्ती नितिन सांबरे हे उपस्थित होते.

नागपूर मध्यवर्ती कारागृहात जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नागपूर तर्फे कारागृह विधी सेवा केंद्र स्थापित करण्यात आले आहे. या केंद्राला त्यांनी भेट देऊन विधी सेवा केंद्रामार्फत बंद्यांना देण्यात येणाऱ्या मोफत विधी सेवा, घेण्यात येणारी कायदेविषयक जनजागृती शिबिरे, लोक अभिरक्षक बचाव प्रणाली कार्यालयाच्या कामकाजाचा विस्तृत आढावा घेतला.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण नागपूर मार्फत सन 2024 मध्ये सुमारे 2151 गरीब बंदी यांना न्यायालयात केस चालवण्यासाठी मोफत वकील पुरवण्यात आले आहेत. याचबरोबर त्यांनी कारागृहातील उपहारगृहास भेट देऊन बंद्याना देण्यात येणाऱ्या भोजन सेवेची पाहणी केली. तसेच महिला बंदी विभाग व तेथील कौशल्य विकास विभागास भेट देऊन त्यांना पुरवण्यात येणाऱ्या सोई सुविधांची पाहणी केली.

कारागृहातील बंद्यानी तयार केलेल्या विविध वस्तु प्रदर्शिनीचे अवलोकन करून त्यांचे कौतुक केले. महिला बंदीजनांच्या लहान मुलांसोबत त्यांनी सुसंवाद साधून मुलांच्या शिक्षणाबाबत केलेल्या तरतुदींचा आढावा घेतला.

या प्रसंगी मान्यवरांचे स्वागत आदिवासी गोंडी नृत्याचे सादरीकरण करून करण्यात आले. तसेच मान्यवरांचे शुभ हस्ते जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नागपूर यांचे कारागृह विधी सेवा केंद्रासमोर वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, दिल्ली येथील संचालक समरेंद्र नाईक निंबाळकर, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई येथील सदस्य सचिव समिर अडकर, दिनेश पी.सुराणा, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नागपूर, न्यायाधीश सचिन स. पाटील,सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नागपूर, उपसचिव श्रीपाद देशपांडे, कारागृह अधीक्षक वैभव आगे, उप अधीक्षक दीपा आगे, तुरुंग अधिकारी, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण नागपूरचे सदस्य, लोक अभिरक्षक विधीज्ञ, पॅनल अधिवक्ता आणि कर्मचारी उपस्थित होते.

# नागपूर शहराच्या सुरक्षित शाश्वत विकासाबाबत भागधारकांनी नोंदविल्या सूचना

## 'मल्टी-हॅझर्ड रिस्क व्हल्नरेबिलिटी असेसमेंट' कार्यशाळा

■ महासागर प्रतिनिधी

नागपूर, ३ : महाराष्ट्र राज्याचे मदत व पुनर्वसन विभाग आणि संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम (यूएनडीपी) यांच्याद्वारे राज्यातील नागपूर, नाशिक आणि छत्रपती संभाजी नगर या तीन शहरांचे 'मल्टी-हॅझर्डरिस्क व्हल्नरेबिलिटी असेसमेंट' करण्यात आले. नागपूर शहराचे यशस्वी मूल्यांकन झाल्यानंतर शहरातील विकासाचे भागधारक असलेले मनपातील विविध विभागात कार्यरत अधिकाऱ्यांची कार्यशाळा अतिरिक्त आयुक्त श्रीमती आंचल गोयल यांच्या अध्यक्षतेत सभाकक्षात कार्यशाळा पार पडली. या कार्यशाळेमध्ये सुरक्षेच्या विविध जोखीमांबाबत चर्चा करून त्यावर भागधारकांनी आपल्या सूचना नोंदविल्या.



कार्यशाळेमध्ये यूएनडीपीच्या शहर प्रकल्प समन्वयक अरुषा आनंद, आरएमएसआय चे टीम लिडर डॉ. मुरली कृष्णा एम. यांनी सादरीकरण केले. यावेळी मनपाचे उपायुक्त श्री. विजय देशमुख, अधीक्षक अभियंता श्री. मनोज तालेवार, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, मुख्य अग्निशमन अधिकारी बी.पी. चंदनखेडे, सहायक आयुक्त श्री. अशोक गराटे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, शिक्षणाधिकारी श्रीमती साधना सयाम यांच्यासह सर्व कार्यकारी अभियंता उपस्थित होते.

नागपूर शहराचे 'मल्टी-हॅझर्डरिस्क व्हल्नरेबिलिटी असेसमेंट' संदर्भात यूएनडीपी द्वारे यापूर्वी दोन कार्यशाळा घेण्यात आलेल्या होत्या. यानंतर अंतिम कार्यशाळा मंगळवारी (ता.३) पार पडली. या कार्यशाळेमध्ये शहरातील आपत्ती जोखीमग्रस्त बाबींवर चर्चा करण्यात आली. भूकंप, उष्माघात, पूर, आग, आरोग्य संकट अशा विविध जोखीमांबाबत यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली. आरएमएसआय द्वारे शहरातील प्रभागनिहाय सर्वेक्षण करण्यात आल्याची माहिती यावेळी आरएमएसआय चे टीम लिडर डॉ. मुरली कृष्णा एम. यांनी सादर केली. त्यांच्याद्वारे शहरात करण्यात आलेल्या सर्वेक्षणातील निरीक्षणे यावेळी नोंदविली. नागपूर शहरातील वाढते तापमानाला हवामान बदल या घटकाप्रमाणेच शहराचा विस्तार आणि बांधकाम प्रणाली देखील जबाबदार असल्याचे निरीक्षण यावेळी नोंदविण्यात आले. शहरात यापूर्वी निर्माण झालेल्या पूर परिस्थितीची आकडेवारी देखील यावेळी सादर करण्यात आली. आधी होणारे पावसाचे प्रमाण आणि आताचे पावसाचे प्रमाण आणि उद्भवणारी परिस्थिती यासाठी कारणीभूत बाबींवर यावेळी चर्चा झाली. नागपुरात भूकंपाचा धोका नसला तरी संभाव्य धोक्याबाबत देखील माहिती देण्यात आली. शहरात आगीच्या घडणाऱ्या घटनांबाबत चर्चा करताना २०१२ ते २०२३ या कालावधीमध्ये शॉर्ट सर्कीटमुळे आगीच्या ६० टक्के घटना घडल्याचे सर्वेक्षणामध्ये निदर्शनात आल्याची माहिती सादर करण्यात आली. यासाठी वाढते तापमान देखील जबाबदार असल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले. आगीच्या घटनांवर वेळीच नियंत्रणासाठी आपदा मित्र या संकल्पनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याचा पुरेसा प्रयत्न करण्यात आला. शहरातील सर्वाधिक पाऊस होणारी संभाव्य जोखीमग्रस्त प्रभाग, उन्हाची तीव्रता जास्त भेडसावणारे प्रभाग या सर्वांची रितसर माहिती यावेळी सादर करण्यात आली. आरएमएसआय द्वारे विविध आपत्तींबाबत शहराच्या संभाव्य जोखीमग्रस्त भागांचे नकाशे तयार करण्यात आलेले आहेत. हे नकाशे पुढील सुरक्षेच्या दृष्टीने जनजागृतीस्तव मनपाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करण्याबाबत अतिरिक्त आयुक्त श्रीमती आंचल गोयल यांनी यावेळी निर्देश दिले. कार्यशाळेमध्ये डॉ. प्रणीता उमरेडकर, कार्यकारी अभियंता श्रीमती अल्पना पाटणे, कार्यकारी अभियंता सर्वश्री राजेंद्र राठोड, रवींद्र बुंधाडे, श्रीकांत वाईकर, कमलेश चव्हाण, सुनील उईके, विजय गुरूबक्षाणी, मनोजकुमार सिंग, संजय माटे, अनील गेडाम, सचिन रक्षमवार, आरएमएसआय चे हायड्रोलॉजिस्ट प्रतुल श्रीवास्तव, सतिश राहाटे आ. व्य. अधिकारी आदी उपस्थित होते



# नि:शुल्क टाळकरी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी

वाडी, ३ : विश्व वारकरी सेवा संस्थेच्यावतीने खासदार महोत्सवात १७ डिसेंबर रोजी 'अभंग वारी' कार्यक्रमाच्या माध्यमातून पंढरपूर आषाढीवारीचे दर्शन घडविण्यात येणार आहे. यामध्ये सुमारे एक हजारावर टाकळरी असणार आहे. या टाळकरी कलाकारांना सराव म्हणून संस्थेच्यावतीने श्री स्वामी समर्थ मंदिर बेसा येथील वारकरी विश्वविद्यालय येथे ५ ते १६ डिसेंबरदरम्यान मोफत टाळकरी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. खासदार महोत्सवात 'अभंग वारी' कार्यक्रमात १०० बाय १५० फुट मंचावर दोन हजार वारकरी कलावंत नाट्य, नृत्य व संगीताच्या माध्यमातून पंढरपूर आषाढी वारीचे दर्शन घडविणार आहेत. या कार्यक्रमात सुमारे एका हजार टाकळकरी कलाकार राहणार आहे. टाळ मृदंगाच्या गजरात वारकरी पावल्या, वारकरी खेळ, रिंगण, हमामा, फुगडी, धावाटाकळरी कलावंतांचा सराव विश्व वारकरी सेवा संस्थेच्यावतीने सुरू झाला आहे. या कार्यक्रमात शहरातील वर्षावरील ज्या पुरुष कलावंतांना टाळकरी म्हणून सहभाग नोंदवायचा आहे, त्यांनी मोफत प्रशिक्षणासाठी विश्व वारकरी संस्थेचे अध्यक्ष संदीप कोहळे, भरत नरुले, कुणाल महाराज फुलझेले, अभिषेक घुसे, ऋषिकेश खडसे, मृदंगाचार्य आशिष गायधन यांच्याशी संपर्क करावा.

# सेवा फाऊंडेशचे रक्तदान शिबिर

■ महासागर प्रतिनिधी

वाडी, ३ : मिहान टाटा क्रोमा वेअरहाऊस येथे रक्तदान, श्रेष्ठदान, वाचवी लाख मोलाचे प्राण या उक्तीने प्रेरीत होऊन शासकीय रुग्णालयातील रक्ताचा तुटवडा असलेल्या रुग्णांच्या मदतीसाठी सेवा फाऊंडेशनतर्फे शासकीय रक्तपेढ्यांसाठी नियमित रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी रक्तदात्यांनी रक्तदान महादानची शपथ घेतली. आयोजनासाठी महेश चौधरी, जेरुषा गंधारे, विशाल जोध, योगेश चराडे, निशांत झाडे, मनोज नासरे, शंतनू काळे, वेदांत काळे, प्रतीक ठाकरे, प्रसाद गलांडे, आदित्य मानपुरे, मंगेश हिवरकर, सेवा फाऊंडेशनचे प्रणव कोल्हे, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय ,एम्स नागपूरचे डॉक्टर, आरोग्य सेविका आदींनी सहकार्य केले.

# मध्य रेल्वे नागपूर विभागाने वर्धा रेल्वे स्थानकावर स्टेशन महोत्सव आयोजित

## रेल्वे वारशाचा गौरव केला

■ महासागर प्रतिनिधी

नागपूर, ३ : मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने ०१ डिसेंबर २०२४ रोजी वर्धा रेल्वे स्थानकावर स्टेशन महोत्सव यशस्वीरित्या आयोजित केला. भारतीय रेल्वेच्या वारशाचा गौरव करण्यासाठी आणि त्याच्या समाजातील योगदान तसेच ऐतिहासिक महत्त्वाबद्दल जनजागृती निर्माण करण्यासाठी आयोजित केलेला हा अनोखा कार्यक्रम होता. या कार्यक्रमात गावकरी, रेल्वे कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबांनी उत्साहीपणे सहभाग घेतला, ज्यामुळे हा कार्यक्रम एक रंगीबेरंगी समुदाय मेळावा बनला. कार्यक्रमाची सुरुवात सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे झाली, ज्यात स्थानिक कला रूपांचा दाखला देण्यात आला. यानंतर ऐतिहासिक प्रदर्शन आयोजित केले गेले, ज्यामध्ये जुने रेल्वे छायाचित्रे, कलाकृती आणि आठवणींचा संग्रह ठेवण्यात आला. या प्रदर्शनाने युवा पिढीत रेल्वेच्या इतिहासातील रुची वाढवली.

कार्यक्रमात स्थानक प्रमुख आणि वरिष्ठ स्थानक कर्मचाऱ्यांनी उपस्थितांना संबोधित करताना रेल्वे वारशाच्या जतनाचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमाचा समारोप रेल्वे कर्मचाऱ्यांच्या समुदायासाठी केलेल्या योगदानाचे कौतुक करण्यासाठी एका सन्मान समारंभाने झाला. स्टेशन महोत्सव हा केंद्रीय रेल्वेच्या समुदायाशी संपर्क साधण्याच्या आणि भारताच्या रेल्वे वारशाबद्दल एकता आणि आदराच्या मूल्यांचे प्रोत्साहन देण्याच्या कटिबद्धतेचे प्रतीक आहे.

# अव्हेल कॉन्व्हेन्ट मध्ये रक्तदान व दंतचिकित्सा शिबिर



■ महासागर प्रतिनिधी

वाडी, ३ :दाभा येथील शाश्वत बहुउद्देशीय शिक्षण संस्थेच्या १७ व्या वर्धापन दिनानिमित्त अव्हेल कॉन्व्हेंट आणि हायस्कूल मध्ये रक्तदान व दंत चिकित्सा तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी रक्तदात्यांनी रक्तदान केले.परिसरातील व शाळेतील १३६ विद्यार्थ्यांनी, पालकांनी व नागरिकांनी दंत तपासणीचा लाभ घेतला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाश्वत बहुउद्देशीय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा. अजय करंडे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून रणजित देशमुख दंत चिकित्सा महाविद्यालयाचे डॉ.वेणुगोपाल रेड्डी, डॉ. पूर्वा चौधरी बालदंत चिकित्सा, जीवन ज्योती रक्तपेढीचे डॉ. अभिजीत भानकर संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा. विजय कटरे , सदस्य केतन चंदनखेडे, प्रा.योगेश निकम प्रामुख्याने उपस्थित होते. डॉ.पूर्वा चौधरी यांनी लहान मुलातील दातांचे रोग व निगराणी याविषयी सविस्तर माहिती दिली. डॉ.अभिजीत भानकर यांनी रक्तदानाचे फायदे व समाजातील रक्तदाना विषयी लोकांचे गैरसमज याविषयी माहिती दिली. प्रा. अजय करंडे यांनी शाळेच्या गेल्या वर्षाचा गौरवशाली इतिहास सांगितला. सचिव प्रा. अजय मनकवडे यांनी सोसायटीच्या भविष्यातील योजनांची माहिती दिली. समाजाप्रती असलेली जबाबदारी पार पाडण्यासाठी या उपक्रमात सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन एडवोकेट सतीश रेवतकर यांनी केले. संचालन उपाध्यक्ष, प्रा. अमित कन्नाके यांनी तर आभार सहसचिव प्रा. लक्ष्मण चवडे यांनी मानले. आयोजनासाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

# श्रीहरी नगर मानेवाडा येथे पूर्ण ब्रम्ह अभियान



■ महासागर प्रतिनिधी

नागपूर, ३ : मानेवाडा नागपूर येथे श्रीहरी नगरात रविवारी पूर्ण ब्रम्ह अभियान हा उपक्रम नुकताच राबविण्यात आला. त्याला श्रीहरी नगर वार्ड नं.१ .२.३ येथील नागरीकांनी खूप मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला. या उपक्रमाअंतर्गत लोकांनी स्वखुशीने, जिवनापयोगी वस्तूंचे दान दिले त्यात चावल, गेहू, दाल, मसाले, तेल त्याच प्रमाणे नवीन कपडे, साड्या, शाल इ. वरील प्राप्त धान्य आम्ही जेष्ठ नागरीक प्रतिष्ठान नागपूर यांचे मार्फत गरज वंत वृद्धाश्रम / अनाथालय यांना दान स्वरुपात वाटप करीत असतो. अनाथ लोकांना एकवेळ जेवण मिळावे त्यांचा आत्मा तृप्त व्हावा म्हणून हा छोटासा उपक्रम आम्ही राबविण्यात आलेला आहे. व नेहमीच राबवीत असतो. यातील श्रीहरी नगर जेष्ठ नागरीक मंडळाचे सदस्य सहभागी झाले होते. सुरेश उरकुडे, शिवराम गुरुनुले, डॉ. अशोक मंदे, विठ्ठल घोडे, केशव बोपुलकर, रामदास कोल्हे, गणेश भारद्वाज, घनश्याम ढोले, जानराव बारई, जैरामसिंग ठाकूर, नामदेव खाटके, छोटू जगनाडे, सुरजभान सिंह, रवींद्र नखाते, रुगवेद उरकुडे.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ४3 प्रकरणांची नोंद

## उपद्रव शोध पथकाची धडक कारवाई






नागपूर, ता. ३: नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाने सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, ४३ मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई ची सुरुवात केली आहे. मंगळवार (३) रोजी शोध पथकाने ४३ प्रकरणांची नोंद करून ५३,३००/- रुपयाचा दंड वसूल केला. हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. ४००/- दंड) या अंतर्गत १४ प्रकरणांची नोंद करून ५,६००/- रुपयांची वसुली करण्यात आली. व्यक्तीने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे (रु. १००/दंड) या अंतर्गत १ प्रकरणांची नोंद करून १००/- रुपयांची वसुली करण्यात आली. वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत १८ प्रकरणांची नोंद करून ४४,०००/- रुपयांची वसुली करण्यात आली. वर्कशाप, गॅरेजेस व इतर दुरुस्तीचे व्यवसायीकांने रस्ता, फुटपाथ मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे या अंतर्गत १ प्रकरणांची नोंद करून १,०००/ रुपयांची वसुली करण्यात आली. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास ८ प्रकरणांची नोंद करून १,६००/-दंड वसूल करण्यात आलेला आहे. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास १ प्रकरणांची नोंद करून १,०००/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. ही कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

तसेच उपद्रव शोध पथकाने लक्ष्मीनगर झोन अंतर्गत मे. देवभूमी अपार्टमेंट यांनी सी अँड डी कचरा टाकल्याबद्दल रु. ५,०००/- रुपयाचा दंड वसुल करण्यात आला. तसेच सूर्यकान्त सावजी यांनी हॉटेलचे साहित्य खुल्या जागेवर टाकल्याबद्दल रू. १०,०००/-हजार रुपयांचा दंड वसूल केला. धरमपेठ झोन अंतर्गत मे. कंडियावार प्रायव्हेट लिमिटेड यांनी वैद्यकीय कचरा टाकल्याबद्दल रू. २५,०००/-हजार रुपयांचा दंड वसूल केला. गांधीबाग झोन मे. श्री श्याम किराणा यांनी प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रू. ५,०००/- हजार रुपयांचा दंड वसुल केला. सतरंजीपुरा झोन अंतर्गत मे. बब्लु बिल्डर्स यांनी बांधकामाचे साहित्य रस्त्यावर टाकल्याबद्दल रू. १०,०००/-हजार रुपयांचा दंड वसूल केला. तसेच मे. आध्ये टि ट्रेडर्स यांनी प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रू. ५,०००/-हजार रुपयांचा दंड वसुल केला. उपद्रव शोध पथकाने ६ प्रकरणांची नोंद करून रू. ६०,०००/- दंड वसूल केला.

# ऑपरेशन अमानत: प्रवाशांची सुरक्षा आणि मालमत्ता पुनर्प्राप्तीसाठी आरपीएफची उत्कृष्ट वचनबद्धता

■ महासागर प्रतिनिधी

नागपूर, ३ : मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाच्या रेल्वे संरक्षण दलाने ऑपरेशन अमानत उपक्रमांतर्गत प्रवासी सुरक्षा आणि सुरक्षेसाठी आपल्या समर्पणाची पुष्टी केली आहे आणि गेल्या आठवड्यात अंदाजे छ१.५८ लाख किमतीचे हरवलेले सामान परत मिळवून दिले आहे. हे प्रयत्न सुरक्षित आणि प्रवासी-अनुकूल रेल्वे वातावरण तयार करण्यासाठी आरपीएफच्या सक्रिय दृष्टिकोनावर प्रकाश टाकतात. वर्धा रेल्वे स्थानकावर, ने एका महिलेची पर्स जप्त केली ज्यात मोबाईल फोन आणि छ१५०० रोख आहेत, तसेच ट्रेनमध्ये मागे राहिलेली लॅपटॉप बॅग, ज्यामध्ये छ१,००,००० किमतीचा लॅपटॉप आहे. दोन्ही वस्तू त्वरित ओळखल्या गेल्या आणि कसून पडताळणीनंतर त्यांच्या योग्य मालकांना परत करण्यात आल्या, प्रवाशांकडून त्यांचे मनापासून कौतुक झाले. नागपूर रेल्वे स्थानकावर, दोन महत्त्वपूर्ण पुनर्प्राप्ती करण्यात आल्या: छ३५,००० किमतीचा डेल लॅपटॉप असलेली लाल हँडबॅग आणि सॅमसंग टॅबलेट, रोख रक्कम आणि क्रेडिट कार्डासह एकूण रू १७,५०० किमतीची एक काळी बॅग. या वस्तू त्वरीत सुरक्षित करण्यात आल्या आणि योग्य ओळख प्रक्रियेनंतर प्रवाशांच्या ताब्यात देण्यात आल्या. याव्यतिरिक्त, बैतूल स्टेशनवर, कर्मचाऱ्यांनी ५,००० किमतीच्या वैयक्तिक वस्तू असलेली पर्यटक बॅग जप्त केली, जी गोरखपूर एक्स्प्रेसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशाने चुकीची ठेवली होती. आरपीएफ टीमची दक्षता आणि कार्यक्षमता दाखवून ती बॅग तिच्या सर्व सामग्रीसह परत करण्यात आली. या वसुली केवळ प्रवासी सेवेसाठी ची अटूट बांधिलकी दर्शवत नाहीत तर रेल्वे वापरकर्त्यांमध्ये आत्मविश्वास आणि विश्वास निर्माण करण्यात ऑपरेशन अमानत च्या ऑपरेशनल यशाला देखील अधोरेखित करतात.



# ट्रक ट्रॉन्सपोर्ट असोसिएशन तर्फे समीर मेघे यांचा सत्कार

■ महासागर प्रतिनिधी

वाडी, ३ : ट्रक ट्रॉन्सपोर्ट असोसिएशन तर्फे आमदार समीर मेघे यांचा शाल , श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. आमदार समीर मेघे यांनी आपल्या कार्यकाळात केलेल्या क्षेत्रातील भरीव विकास कामाला क्षेत्रातील जनतेसाठी सुखदुःखात वेळोवेळी असलेल्या उपलब्धतेला पावती मिळाली असे प्रतिपादन भाईचारा महामार्ग परिवहन सेवेचे अध्यक्ष नरेंद्र मिश्रा यांनी केले. यावेळी गोपाल परिवार फाऊंडेशनचे संस्थापक प्रल्हाद अग्रवाल , भाईचारा महामार्ग परिवहन सेवेचे अध्यक्ष नरेंद्र मिश्रा , ट्रॉन्सपोर्ट फ्रेंड्स असोसिएशनचे अध्यक्ष सुनील पांडे ,भाजपा आघाडीचे माजी जिल्हाध्यक्ष मानसिंग ठाकूर ,योगेश चौबे भाजपा परिवहन आघाडीचे जिल्हाध्यक्ष बिमलेश सिंह, किताबसिंग चौधरी उपस्थित होते.


## जाहीर सुचना

कोर्ट विद्यमान २रे दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, रामटेक यांच्या न्यायालयातील सक्सेशन केस नं. २०/२०२४.

पेशी ता. ०६/०१/२०२५ प्रोसेस नं. २८७५ दि. ०३/१२/२४.

अर्जदार - १). स्वरा संदिप कोकोडे वय ०४ वर्षे अज्ञान तर्फे नैसर्गिक पालक- मंथुरा बंशी कोकोडे (आजी) वय ६० दोघे राह-सुमारी, तह रामटेक, जि. नागपूर

- विरुध्द -

प्रतिवादी : कोणीही नाही

मयतदार :- १ संदीप बंशी कोकोडे (मयत दि.२०.०८.२०२२)

२. प्रियंका संदिप कोकोडे (मयत दि.२४.०३.२०२४)

राहणार-खुमारी, तह. रामटेक, जि नागपूर

सदरहू अर्जदाराने इंडियन सक्सेशन ॲक्ट १९२५ चे कलम ३७२ अन्वये या न्यायालयात उत्तराधिकारी सर्टीफिकेट मिळण्याकरिता अर्ज दाखल केला आहे. अर्जदाराने मयतदार १. संदीप बंशी कोकोडे (मयत दि.२०.०८.२०२२) व २. प्रियंका संदिप कोकोडे (मयत दि.२४.०३.२०२४) वारस स्वरा संदिप फोकोडे वय ०४ वर्षे अज्ञान तर्फे नैसर्गिक पालक- मंथुरा बंशी कोकोडे (आजी) वय ६० दोघे राह-खुमारी, तह. रामटेक, जि. नागपूर तह. रामटेक, जि. नागपूर यांनी मयतदार २. प्रियंका संदिप कोकोडे यांनी आधीच काढलेल्या बँक ऑफ इंडिया, शाखा कांद्री, ता. रामटेक, जि. नागपुर येथील खाते क्रमांक ८७३८१०११०००११२५ या बचत खात्यामधील जमा रूपये ४८,५००/- काढण्याकरिता मयतदाराचे उत्तराधिकारी (सक्सेशन) सर्टीफिकेट मिळण्याकरिता या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. त्या अर्जाच्या सुनावणीची तारीख ०६/०१/२०२५ रोजी सकाळी ११-०० वाजता ठरविली आहे. या जाहीर नोटीसद्वारे सर्व संबंधितांना, नातेवाईकांना व आम जनतेस कळविण्यात येते की, जर मयतदाराच्या नावे असलेल्या बँक ऑफ इंडिया, शाखा- कांद्री, ता. रामटेक, जि. नागपुर येथील खाते क्रमांक ८७३८१०११०००११२५ या बचत खात्यामधील जमा रूपये ४८,५००/- काढण्या बाबत जर कोणाचा उजर असल्यास किंवा हरकत असल्यास त्याने आपला उजर पेशी तारखेचे आत अथवा तारखेवर या न्यायालयात पेश करावा, जर अशी कोणतीही हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदाराला उत्तराधिकारी (सक्सेशन) सर्टीफिकेट मंजूर करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

आज दि. ०२/१२/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला.

सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर,
रामटेक

## जाहीर पेपर नोटिस

कोर्ट विद्यमान डी.एस. सैंदाणे २ रे, सह दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) व न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, रामटेक, तह. रामटेक, जि. नागपूर यांच्या न्यायालयातील किरकोळ न्यायीक केस नं. ४४/२०२४

RTK-2765/24 (Dt. 27/11/24) पेशी ता. २०.१२.२०२४

अर्जदार : तिलोत्तमा गुलाबचंद मेश्राम वय ५० वर्षे, धंदा: गृहीणी रा. राधाकुष्ण वार्ड रामटेक त. रामटेक, जिल्हा नागपूर

-विरुध्द-

गैरअर्जदार : निरंक

मयतदार : गुलाबचंद रामचंद्र मेश्राम पती मृत्यू दिनांक २१/०३/२०२१

सद्रहू अर्जदाराने या न्यायालयात कायदेशीर वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज दाखल केला आहे. वरील नमूद अर्जदाराने १. गुलाब रामचंद्र मेश्राम पती मृत्यू दिनांक २१/०३/२०२१ राह. राधाकृष्ण वार्ड रामटेक त. रामटेक जि. नागपूर येथे मरण पावले यांचे कायदेशीर वारस असल्याचे वारसान सटीफिकेट मिळण्याकरीता या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. त्या अर्जाच्या सुनावणीची तारीख २०.१२.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता ठरविली आहे. या जाहीर नोटीसव्दारे सर्व संबंधितांना, नातेवाईकांना व आम जनतेस कळविण्यात येते की, जर कोणाचा उजर किंवा हरकत असल्यास त्याने आपला उजर पेशी तारखेचे आत अथवा तारखेवर या न्यायालयात पेश करावा, जर अशी कोणतीही हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदाराला वारसान सर्टीफिकेट मंजूर करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

आज दि. १९/११/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला.

आदेशान्वये,
सहा. अधिक्षक,
सह दिवाणी व फौजदारी न्यायालय,
रामटेक, तह. रामटेक, जि. नागपूर

## -: जाहिरनामा :-

कोर्ट विद्यमान संदीप तडसे, नायब तहसीलदार तथा दंडाधिकारी कार्यकारी अधिकारी, कळमेश्वर यांचे न्यायालय

रा.मा.क्र. : २०२४/५८ मौजा : खैरी (लखमा) तालुका : कळमेश्वर

वाचा:- १) जन्म - मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम-१३ २) जन्म-मृत्यूनोंदणी (सुधारणा) कायदा २०२३चा २० ३) भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचे कडील दि.११/०८/२०२३ रोजी चे राजपत्र ४) मा. जिल्हादंडाधिकारी, नागपूर यांचे कडील आदेश क्र. अका/डी-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि-५३५/२०२३, दि.१५/१०/२०२३ ५) श्री रोशन सुरेश राउत रा. खैरी (लखमा) ता. कळमेश्वर जि. नागपूर यांचाअर्ज दि.२९/१०/२०२४

ज्याअर्थी अर्जदार श्री रोशन सुरेश राउत रा. खैरी (लखमा) ता. कळमेश्वर जि. नागपूर यांनी त्यांचे आईची मृत्यु ची नोंद ग्रामपंचायत सोनपुर (आदासा), ता. कळमेश्वर दप्तरी घेणे करिता निर्देशित करणे कामी अर्ज दाखल केला आहे. सदरहू आईचे नामे मंदा सुरेश राउत यांचा मृत्यु दि. २८/०४/२०१५ रोजी राहत्यागावी झाला असा अर्जदारांचा दावा आहे. त्याचप्रमाणे अर्जदार यांना त्यांचे मृत्यु प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणे कामी आदेश होणे असल्याबाबत आवश्यक त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी नायब तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अधिकारी, कळमेश्वर उपरोक्त वाचा क्र.१ आणि २ नुसार व ३ मध्ये नमूद केल्या प्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यवतीचा मृत्यु बाबत नोंद घेणे कामीचा आदेश देणे करिता य गृह चौकशी करणे कामी कार्यवाही प्रस्तावित आहे. या बाबत कोणास काही सांगा व याचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य तो पुरावा किंवा साक्षीदारांसह नायब तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अधिकारी, कळमेश्वर यांचे न्यायालयात स्वःत जातीने/वकीला मार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीर नामा प्रसिद्ध दिनांका पासून एक महिन्याचे आत सादर करावे. उक्त कालावधीत कुठलाही आक्षेप/उजर/विपरित पुरावा प्राप्त न झाल्यास मृत्यु बाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणे बाबत कोणालाही काही सांगा व याचे नाही गृहीत धरून प्रस्तावित जन्म नोंदी बाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

दिनांक : - ०२/१२/२०२४
कळमेश्वर

संदीप तडसे
नायब तहसीलदार तह तथा कार्यकारी
दंडाधिकारी अधिकारी, कळमेश्वर

## -: जाहीरनामा :-

कोर्ट विद्यमान कार्यकारी दंडाधिकारी, पारशिवनी यांचे न्यायालय पारशिवनी

रा.मा.क्रं. / जन्म-मृत्यु.नोंद/२०२४-२५
मौजा बच्छेरा, सा.क्रं. २अ
ता. पारशिवनी, जि. नागपूर

मौजा-बच्छेरा, तह.पारशिवनी, जि. नागपूर येथील सर्व नागरीकांना सुचित करण्यात येते की, बेबी उंकडराय खंडाते, (पतिकडील नावे बेबी विठ्ठल वरठी) राह. बच्छेरा, तह. पारशिवनी, जि. नागपूर, यांनी या कार्यालयास अर्ज सादर केलेला असून यांनी त्यांचे नावे बेबी उंकडराव खंडाते नावे हिचा जन्म दिनांक १७/१२/१९७८ रोजी मौजा-बच्छेरा, गट ग्रामपंचायत, चारगाव येथे जन्माची नोंद घेण्यात आलेली नाही. गट ग्रामपंचायत, चारगाव ता. पारशिवनी, जि. नागपूर येथे जन्माची नोद होण्याकरीता आदेश मिळण्याबाबत अर्ज सादर केलेला आहे. सदर अर्जदार यांना जन्माची नोंद आदेश देण्याबाबत कोणाला आक्षेप अथवा उेर दयावयाचे असतील त्यांनी पंधरा दिवसा पर्यत आपले आक्षेप अथवा उजर तहसिल कार्यालय, पारशिवनी येथे कार्यालयीन वेळेत तक्रार लेखी स्वरुपात स्वतः उपस्थित राहून या कार्यालयात समक्ष सादर करावे. नियोजीत तारखेनंतर मिळालेल्या आक्षेपावर विचार करण्यात येणार नाही. याबाबत संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदर जाहीरनामा आज दिनांक १९/०८/२०२४ रोजी माझे सही व शिक्यानिशी प्रसिध्द करण्यात येत आहे.

कार्यकारी दंडाधिकारी,
पारशिवनी

# विधान सभा निवडणुकी नंतर लाडकी बहीण योजनेत फेरविचार ?



महासागर तालुका प्रतिनिधी कामठी २०२४ महाराष्ट्र विधानसभेत विजय मिळवल्यानंतर भाजपच्या नेतृत्वाखालील महायुती सरकार आता लाडकी बहीण योजनेचा पुनर्विचार करावा लागत असल्याचे जाणकारांचे मत आहे. माहितीनुसार, या योजनेंतर्गत महाराष्ट्र सरकारला जुलै २०२४ ते मार्च २०२५ पर्यंत ३३,३०० कोटी रुपये खर्च करायचे आहेत, जे ते करण्याच्या स्थितीत नाहीत, त्यामुळे आता निवडणुका संपल्यानंतर भाजप सरकारने आश्वासन दिले आहे प्रत्येक महिन्याला २१०० रुपये देणे हे अव्यावहारिक वाटतंय त्यानंतर लगेचच या योजनेत मोठे बदल करणे म्हणजे जनतेचा विश्वासघात केल्यासारखे वाटू शकते, महाराष्ट्रातील महायुती सरकारने निवडणुकीपूर्वी केवळ निवडणुका जिंकण्यासाठीच केल्याचा आरोप विरोधकांकडून केला जातो . आणि या योजनेसाठी महाराष्ट्र सरकारच्या तिजोरीत पुरेसा पैसा नाही हे भाजपसह सर्वच पक्षांना माहीत होते. या वृत्तावर भाजप नेत्यांचे मत जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता, त्यांनी सांगितले की, या वृत्ताचा निवडणुकीशी काहीही संबंध नाही , आगामी काळात या योजनेमुळे महाराष्ट्राचेच नव्हे तर देशाचे राजकारण अधिक तीव्र होणार असल्याची आशंका स्पष्टपणे दिसत आहे.आज बँकेत फेरफटका मारला असता लाडक्या वहिनींची उपस्थिती फारच कमी

सावनेर तालुक्यातील खेकरानाला जलाशया जवळील घटना

# वाघाच्या हल्लयात बिबटयाचा मृत्यू



तालुका प्रतिनिधी सावनेर पट्टेदार वाघाच्या हल्लयात दोन वर्षीय बिबट्याच्या पिलाचा मृत्यू झाला. ही घटना आज पहाटे ४ च्या सुमारास खेक. रानाला जलाशया जवळील डॉरमेंट्री रिसॉर्ट सामोर घडली. मिळालेल्या माहिती नुसार खेकरानाला जलाशय परिसरात वाघ व बिबटयाचा वावर आहे. रोज सकाळी ७ च्या सुमारास व सायंकाळी ५ ते ६ च्या सुमारास

पट्टेदार वाघ व बिबट व यांचे या परीसरातून जाणे येणे आहे. सकाळी ७ च्या सुमारास खेकरानाला डॉरमेंट्री रिसॉर्ट सामोर आज वस्ती कडून येणाऱ्या लोकांना बिबट मृतावस्थेत आढळला त्याच्या डोक्याच्या भागावर दात रूतल्याचे दिसून अ ाले

असून रक्ताच्या थारोळयात असून रक्ताच्या थारोळयात पडलेल्या बिबटयाच्या रक्ताने वाघाचे पंजे माखल्याने वाघाच्या पायाचे ठसे स्पस्ट उमटून आल्याचे बोलले जात आहे. परिसरातील नागरिक वाघाच्या भितीने घाबरलेले दिसत आहे. शेती करण्यावर प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे. रायवाडी चे पोलिस पाटील बावणे यांच्या सुचने वरुन खापा वनपरिक्षेत्राधिकारी सचीन आठवले यांनी घटना स्थळाला भेट दिली व पंचनामा करून पिलाला वनपरिक्षेत्र खापा कार्यालय येथे नेण्यात आले मृतदेहाचा शवविच्छेदन केल्यानंतर अंत्येष्टी करण्यात आल्याचे वनरक्षक जयश्री राठोड यांनी सांगितले

**रायवाडी परीसरातील शेतकऱ्यांत कमालीची दहशत**

वाघाचा बंदोबस्त करण्याची भाजप नेते रामराव मोवाडे यांची मागणी

अनेक दिवसांपासून खेकरानाला जलाशय व लहान मोठ्या रायवाडी परीसरात बिबट्या व वाघाचा वावर् आहे सकाळी ० सायंकाळी रस्त्याने व शिवारात दिसत असतो यामुळे शाळेकरी् व महिला पुरुष शेतकऱ्यांत कमालीची दहशत पसरली आहे

# नायलॉन मांजाची विक्री, वापर, साठवणूक केल्यास होणार कारवाई



## मनपाचे कठोर पाऊल : तक्रारीसाठी व्हॉट्सप क्रमांक जारी

■ **महासागर प्रतिनिधी**

**नागपूर, ३ :** पर्यावरण तसेच मनुष्य प्राण्यांकरिता घातक प्रतिबंधित नायलॉन मांजाबाबत नागपूर महानगरपालिकेने कठोर पाऊल उचलले आहे. नायलॉन मांजाची विक्री, हाताळणी, वापर, साठवणूक केल्यास मनपाद्वारे नियमान्वये कठोर कारवाई करण्यात येणार आहे. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त श्रीमती आंचल गोयल यांच्या मार्गदर्शनामध्ये उपायुक्त श्री. विजय देशमुख यांनी यासंदर्भात आदेश जारी केले आहेत.

मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे दाखल जनहित याचिका धील प्राप्त आदेशान्वये तसेच महाराष्ट्र शासनाचे पर्यावरण विभागाद्वारे पर्यावरण (संरक्षण) कायद्यान्वये पतंग उडविण्यासाठी मकरसंक्रात सणाच्या वेळी कृत्रिमरीत्या/प्लास्टीकपासून बनवलेल्या नायलॉन मांजा अर्थात पक्क्या धाग्यांचा करण्यात येणारा वापर, विक्री, हाताळणी व साठवणुकीवर बंदी घालण्यात आलेली आहे. या माजांच्या वापरामुळे पक्षांना व मानवी जीवितांना तीव्र इजा होण्याचा धोका असतो. तसेच या मांजामुळे जीवित हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यासाठी मनपाद्वारे नागपूर शहर क्षेत्रातील सर्व मांजा विक्रेत्यांना नायलॉन मांजाची विक्री, हाताळणी आणि साठवणूक न करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. असे करताना आढळून आल्यास त्यांच्यावर नियमान्वये कडक कारवाई करण्याचा इशाराही देण्यात आलेला आहे. नागपूर शहरामध्ये कुणीही व्यक्ती नायलॉन मांजा विक्री करताना आढळल्यास मनपाच्या ८६०००४७४६ या व्हॉट्सप क्रमांकावर तसेच नागपूर महानगरपालिकेच्या या फेसबुक आणि इंस्टाग्राम तसेच या ट्विटर अधिकृत अकाउंट वर माहिती द्यावी असे आवाहन उपायुक्त श्री. विजय देशमुख यांनी केले आहे.

# १० वाहने एकमेकांवर आदळली

## गोवारी उड्डाणपुलावर विचित्र अपघात, २ जण किरकोळ जखमी

**नागपूर, क्राईम रिपोर्टर.** भरधाव जात असलेल्या कारच्या चालकाने अचानक ब्रेक लावल्याने मागून येणारी ८ ते १० वाहने एकमेकांवर धडकली. या विचित्र अपघात कोणतीही जीवित हानी झाली नसली तरी वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. ही घटना मंगळवारी सकाळी १०.३० वाजताच्या सुमारास सीताबर्डीच्या गोवारी उड्डाणपुलावर घडली. पुलावर बघ्यांची प्रचंड गर्दी झाली होती. त्यामुळे जवळपास तासभर वाहतूक ठप्प झाली होती. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत काही वेळेतच मार्ग मोकळा केला.

मिळालेल्या माहितीनुसार, उमरेडच्या मटकाझरी येथील रहिवासी वामन बापुराव नेवारे (४५) हे मंगळवारी सकाळी कारने उमरेडला जात होते. गोवारी उड्डाणपुलावरून जात असताना त्यांच्यासमोरील कारचालकाने अचानक ब्रेक लावला. समोरील कार थांबल्याने नेवारे यांनीदेखील ब्रेक लावला. नियंत्रण सुटल्याने अचानक त्यांची कार तिरपी झाली. मागून येणारी दुसरी कार नेवारेंच्या कारवर धडकली. त्यानंतर उड्डाणपुलावरून सुसाट जाणारी वाहने एकमेकांवर आदळली. काही क्षणात उड्डाणपुलावरील जवळपास ८ ते १० वाहने एकमेकांवर धडकली. यामध्ये ऑटो, कार, आयशर आणि एका स्कूल व्हॅनचा समावेश आहे. या घटनेत वाहनांचे प्रचंड नुकसान झाले असून, काही वाहनांचे पेट्रोल रस्त्यावर सांडले होते. यावरून काही वाहनचालकांमध्ये बाचाबाचीही झाली.

या अपघातात नेवारे यांच्यासह राजेश शेंडे रा. हुडकेश्वर हेसुद्धा किरकोळ जखमी झाले. काही मिनिटातच उड्डाणपुलावर वाहनांच्या मोठ्या रांगा लागल्या. माहिती मिळताच सीताबर्डी पोलिसांसह वाहतूक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. टोईंग व्हॅनच्या मदतीने अपघातग्रस्त वाहनांना बाजूला करण्यात आले. पोलिसांच्या मदतीने काही वेळातच मार्ग मोकळा करण्यात आला. किरकोळ जखमींना रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले.

### १० मिनिटांत मार्ग मोकळा

अचानक ब्रेक दाबल्याने गोवारी उड्डाणपुलावर अपघात झाला. काही वाहने एकमेकांवर आदळली. माहिती मिळताच वाहतूक पोलिस आणि सीताबर्डी ठाण्याच्या पोलिस पथकाने घटनास्थळी धाव घेतली. फिरत्या टोईंग व्हॅनच्या मदतीने वाहनांना बाजूला करून रस्ता मोकळा करण्यात आला.

-अर्चित चांडक, पोलिस उपायुक्त, शहर वाहतूक

### मोबाईलने व्हिडीओ काढण्यात व्यस्त

उड्डाणपुलावर विचित्र अपघातानंतर काहींनी मोबाईलने व्हिडीओ काढले. या अपघाताचे अनेक व्हिडीओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाले. या अपघातातील वाहनांची स्थिती बघता गंभीर स्वरूपाचा अपघात असल्याचे दिसत आहे. मात्र, या अपघातात दोन कारचालक किरकोळ जखमी झाल्याचे पोलिसांनी सांगितले.

# मोबाईल चोरीत सापडले अभियांत्रिकीचे विद्यार्थी

## व्यसन भागविण्यासाठी सुरू केली मोबाईल स्नॅचिंग


**नागपूर, क्राईम रिपोर्टर.** दारूचे व्यसन भागविण्यासाठी पैशांची व्यवस्था करण्याकरिता अभियांत्रिकीच्या दोन विद्यार्थ्यांनी मोबाईल स्नॅचिंग सुरू केली. सोमवारी सायंकाळी त्यांनी एका व्यक्तीचा मोबाईल हिसकावून पळ काढला. मात्र बेलतरोडी पोलिसांनी केवळ तासाभरात लाईव्ह लोकेशनच्या माध्यमातून त्यांना शोधून काढत अटक केली. अभिनव हर्ष रंगारी (२०) रा. शेषनगर, खरबी आणि सहजन वाईस खान (२०) रा. चंद्रपूर अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

अभिनव आणि सहजन हे दोघेही अभियांत्रिकीचे विद्यार्थी आहेत. ते मोटारसायलकने सावजाच्या शोधात फिरतात. संधी मिळताच मागे बसलेला युवक रस्त्याने जाणाऱ्या इसमाच्या हातचा मोबाईल हिसकतो. पळविलेल्या मोबाईलची कवडीमोल भावाने विक्री करून मिळालेल्या पैशांनी ते त्यांचे व्यसन पूर्ण करतात. फिर्यादी सुरेश मारोती आसरकर (५६) रा. खापरी हे कोळसा खदानीत कार्यरत आहेत. सोमवारी सायंकाळी ६.३० वाजताच्या सुमारास ते घरून फेरफटका मारण्यासाठी निघाले. मोबाईल फोनवर बोलत जात असताना दुचाकीवर आलेल्या आरोपींनी त्यांच्या हातातील मोबाईल हिसकावून पळ काढला. आरोपींनी वाहनाची नंबर प्लेट कापडाने झाकलेली होती. सुरेश यांनी तत्काळ घरी जाऊन मुलीच्या मोबाईलने पोलिसांना फोन केला आणि घटनेची माहिती दिली. बेलतरोडी पोलिस घटनास्थळी पोहोचले. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता वरिष्ठ पोलिस निरीक्षन मुकुंद कवाडे यांनी डीबी पथकाला तत्काळ तपास करण्याचे निर्देश दिले. पोलिसांनी सुरेशच्या मोबाईलचे लाईव्ह लोकेशन शोधून काढले. जवळपास १५ किमी फिरल्यानंतर आरोपी एका उद्यानात जाऊन थांबले. आरोपींचे लोकेशन मिळताच आणि पोलिस तेथे पोहोचले. सुरेश यांनी केलेल्या वर्णनानुसार दोघांनाही ताब्यात घेतले. चौकशीत आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली. पोलिसांनी त्यांना अटक करून चोरीचा मोबाईल आणि गुन्ह्यात वापरलेली दुचाकी जप्त केली.

### आणखी एक गुन्हा उघडकीस

अशाच प्रकारची एक घटना खापरी नाक्याजवळ घडली होती. फिर्यादी प्रणय गायकवाड रा. मानोरा, जिल्हा वाशिम ह.मु. खापरी हे गावाहून खापरीत आले आणि मुलांच्या शासकीय वसतिगृहात पायदळ जात असताना दुचाकीवर आलेल्या आरोपींनी त्यांच्या हातातील मोबाईल हिसकावून पळ काढला होता. सखोल चौकशीत त्या गुन्ह्याची कबुलीही आरोपींनी दिली. ही कारवाई वरिष्ठ पोलिस निरीक्षक मुकुंद कवाडे यांच्या नेतृत्वात हवालदार शैलेश बडोदेकर, जयंता शंभरकर, हेमंत उईके यांनी केली.

# नीरी'चे अतुल वैद्य यांची एलआयटी विद्यापीठाच्या कुलगुरुपदी नियुक्ती



नागपूर:-

सीएसआयआर 'नीरी'चे संचालक डॉ अतुल नारायण वैद्य यांची नागपूर येथील लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरुपदी नियुक्ती करण्यात आली आहे. राज्यपाल तथा कुलपती सी पी राधाकृष्णन यांनी डॉ अतुल वैद्य यांची नियुक्ती जाहीर केली आहे. त्यांची नियुक्ती पाच वर्षांच्या कार्यकाळासाठी किंवा ते वयाची ६५ वर्षे पुर्ण करीपर्यंत (यापैकी जे अगोदर असेल त्या तारखेपर्यंत) करण्यात आली आहे.

डॉ.अतुल वैद्य (जन्म ४ डिसेंबर १९६४) यांनी रसायन अभियांत्रिकी विषयात एलआयटी नागपूर येथून एम एस्सी तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातून पीएच डी प्राप्त केली आहे. सन १९९० पासून त्यांनी 'नीरी' येथे कनिष्ठ वैज्ञानिक पदापासून संचालक पदापर्यंत कार्य केले आहे. डॉ वैद्य यांना संशोधन, अध्यापन व प्रशासनाचा व्यापक अनुभव आहे. एलआयटी विद्यापीठाच्या कुलगुरु पदावर नियुक्ती करण्यासाठी राज्यपालांनी ज्येष्ठ वैज्ञानिक डॉ रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली निवड समिती गठीत केली होती. राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे संचालक डॉ आशिष लेले, 'द इंग्लिश अँड फॉरिन लँग्वेजेस युनिव्हर्सिटी हैद्राबादचे माजी कुलगुरु प्रा ई. सुरेश कुमार तसेच उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकास चंद्र रस्तोगी हे समितीचे सदस्य होते.




# विराज पार्कच्या २ घरांत चोरी

## रोकड आणि दागिन्यांवर हातसाफ

**नागपूर, क्राईम रिपोर्टर.** बेलतरोडी ठाण्यांतर्गत खापरीच्या विराज पार्क सोसायटीत चोरांनी दोन घरांचे कुलूप तोडून रोकड आणि दागिन्यांवर हातसाफ केला. या प्रकरणी पोलिसांनी विवेक अनंता थुटे (३४) आणि गोपाल रघुनाथ पेटले (२३) च्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. विवेक टीसीएस कंपनीत अभियंता आहेत. पत्नीच्या आजीचे निधन झाल्याने ते १ डिसेंबरच्या रात्री १० वाजताच्या सुमारास घराला कुलूप लावून कुटुंबासह सुरेंद्रगड येथे गेले होते. या दरम्यान चोरांनी त्यांच्या घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. कपटातील साडेचार तोळे सोन्याचे दागिने आणि रोख ६ हजार रुपयांवर हातसाफ करून पसार झाले. विवेक घरी परतले असता चोरी झाल्याचे समजले. घटनेची तक्रार पोलिसात करण्यात आली. त्याच दरम्यान गोपाल पेटले यांच्याही घरी चोरी झाल्याचे समोर आले. गोपाल मिहानच्या एचसीएल कंपनीत एक्झिक्यूटिव्ह आहेत. ३० नोव्हेंबरला सकाळी घराला कुलूप लावून आईसोबत काही कामाने बडनेरा येथे गेले होते. या दरम्यान चोरांनी त्यांच्या घराचे कुलूप तोडून लोखंडी पेटीत ठेवलेल्या स्टीलच्या डब्यातून रोख ८० हजार आणि ६.५० तोळ्यांची सोन्याची माळ चोरून नेली. सोमवारी गोपाल घरी परतले असता चोरी झाल्याचे समजले. पोलिसांनी दोन्ही घटनांमध्ये अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

### प्राध्यापकाचेही घरफोडले

घरफोडीची तिसरी घटना कळमना ठाण्यांतर्गत घडली. चोरांनी एका प्राध्यापकाचे घरफोडून रोकड आणि दागिन्यांवर डल्ला मारला. पोलिसांनी मनीष गोपालस्वामी बाहेती (४४) रा. गुजराती कॉलनी, भरतनगरच्या तक्रारीवरून अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदविला आहे. बाहेती मध्यप्रदेशच्या बोरगाव येथील रायसोनी महाविद्यालयात प्राध्यापक आहेत. गत रविवारी ते घराला कुलूप लावून आईसोबत लग्न समारंभासाठी अमरावती येथे गेले होते. या दरम्यान चोरांनी त्यांच्या घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. कपाटातील रोख १०,५०० रुपये आणि १२ ग्रॅम सोन्याचे दागिने चोरून नेले. घरी परतल्यावर चोरी झाल्याचे बाहेती यांच्या लक्षात आले. त्यांनी पोलिसात तक्रार केली. पुढील तपास सुरू आहे.

# नागपुरात नारायणा कोचिंग सेंटरच्या नवीन इमारतीचे भव्य उद्घाटन




■ **महासागर प्रतिनिधी**

**नागपूर, ३ :**

नारायणा कोचिंग सेंटरने धरमपेठ, नागपूर येथे २ डिसेंबर २०२४रोजी नवीन अत्याधुनिक इमारतीचे भव्य उद्घाटन करण्यात आले. हा महत्त्वपूर्ण विकास नामवंत नारायण शैक्षणिक समूहाच्या वारशात आणखी एक मैलाचा दगड आहे, जो शैक्षणिक उत्कृष्टतेसाठी त्यांच्या अतुलनीय समर्पणासाठी ओळखला जातो.

नारायण एज्युकेशनल ग्रुप बद्दल१९७९ मध्ये दूरदर्शी डॉ. पी. नारायण यांनी अवघ्या सात विद्यार्थ्यांसह स्थापन केलेल्या नारायणा शैक्षणिक समूहाची गेल्या ४५ वर्षांत झपाट्याने वाढ झाली आहे.आज, भारतातील २३ राज्यांमध्ये पसरलेल्या ८०० हून अधिक शाळा, महाविद्यालये, कोचिंग सेंटर्स आणि व्यावसायिक संस्थांच्या विशाल नेटवर्कसह ती आशियातील सर्वात मोठी आणि प्रतिष्ठित शैक्षणिक संस्थांपैकी एक आहे. दरवर्षी ६००,००० हून अधिक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आकांक्षांना समर्थन देत, समूहाला ५०,०००+ शिक्षक आणि कर्मचारी सदस्यांच्या समर्पित संघाचे पाठबळ आहे.

त्यावेळी उपस्थित मान्यवर डॉ. प्रा.प्रशांत पी.जोशी, कार्यकारी संचालक,एम्स नागपूर ,अरविंदर सिंग भामरा, वरिष्ठ उपाध्यक्ष,नवभारत ,रंजित रेड्डी, राष्ट्रीय शैक्षणिक प्रमुख, फाउंडेशन विभाग, हैदराबाद ,केंद्र संचालक श्रीराम पांडे आणि क्लस्टर बिझनेस हेड मुकेश शर्मा यांनी पाहुण्यांचे स्वागत करून कार्यक्रमाची सुरुवात केली. त्यावेळी उपस्थित डॉ. प्रा. प्रशांत पी. जोशी, कार्यकारी संचालक नागपूर यांनी कार्यक्रमाच्या प्रसंगी शुभेच्छा दिल्या आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या आकांक्षांसाठी कठोर परिश्रम करण्यास प्रोत्साहित केले .

# रामटेकच्या कन्या शिल्पा आचार्य पदवी ने सम्मानित

रामटेक :-(प्रतिनिधी )



रामटेक येथिल प्रसिध्द समर्थ माध्यमिक व कला विज्ञान महाविद्यालयाचे माजी प्राचार्य लाला गायधनी यांची कन्या शिल्पा प्रविण चांदेकर हिने श्री बालाजी विद्यापीठामध्ये व्यवस्थापन (मानव संसाधन) या विषयावर संशोधन करीता तीला आचार्य पदवीने ७ डिंसेबर ला सम्मानित करण्यात करण्यात येणार असुन सध्या शिल्पा बालाजी एम बी.ए. कॉलेज पूणे येथे असिस्टंट प्रोफेसर असुन शिल्पाची मुलगी समन्वी हीने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय रेकॉर्ड प्राप्त केलेली असुन याचा आम्हाला सार्थ अभिमान वाटतो अशा गुणवंत, यशवंत मुलीचं डॉ. शिल्पा हिचे अभिनंदन व शुभेच्छा वर्षाव रामटेक शहर व ग्रामिण भागातून करित आहेत.

# नागपूर विद्यापीठाच्या वेळापत्रकात बद्ल

## १४ फरवरी चा पेपर २३ फरवरीला ला एम एस सी तिसरा सेमीस्टर

■ **महासागर प्रतिनिधी**

**नागपूर, ३ :**

केंद्रीय शिक्षक पात्रता एम एस सी तिसरा सेमीस्टर दिनांक १४ डिसेंबर २०२४ ला असल्यामुळे व त्याच दिवशी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ परीक्षा असल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना सिटीईटी परीक्षेला मुकावे लागले असते व्यापक विद्यार्थी हित लक्षात घेता परीक्षा पुढे ढकलण्याची विनंती विद्यार्थ्यांनी सिनेट सदस्य दिनेश शेराम यांना केली त्यावर मा.कुलगुरू व मा.संचालक,परीक्षा व मूल्यमापन मंडळ, रा. तू. म.नागपूर विद्यापीठ यांचे सोबत पाठपुरावा केल्यामुळे दिनांक १४ डिसेंबर २०२४ ची ..३ .परीक्षा रद्द करून दि . २३ डिसेंबर २०२४ ला घेण्यात येत आहे,यामुळे अनेक विद्यार्थ्यांना फायदा झाला.

उपरोक्त प्रश्नाबाबत समय बनसोड,व्यवस्थापन परिषद सदस्य राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# निधन



### शंकरराव सोनेकर

यांचे दुःखद निधन वय (६४ )वर्ष

अखिल भारतीय सर्वधर्म समाज पार्टीचे संस्थापक व अध्यक्ष एक निस्वार्थ समाजसेवक शंकरराव सोनेकर यांचं आजारपणामुळे दुःखद निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ६४ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, आणि नातवंड व बराच मोठा आप्त परिवार आहे. दि. डिसेंबर रोजी मानेवाडा घाटावर अंतिम संस्कार करण्यात आले.



### सचिन मारोतराव गणोरकर

यांचे दुःखद निधन वय (३५ )वर्ष

नागपूर :-

हुडकेश्वर रोडवरील प्रेरणा नगर, नागपूर येथील सचिन मारोतराव गणोरकर यांच दि.३ डिसेंबर २०२४ रोजी, मुंबई येथे सकाळी आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नागपुर येथे बुधवारी दि. ४ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता. राहत्या घरून मानेवाडा घाटावर अंत्यसंस्कार करण्यात येईल.

# राज्याच्या पोलीस दलात ३३ हजारांवर पदे रिक्त

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :
महाराष्ट्र पोलीस दलात २ लाख २१ हजार २५९ मंजूर पदांपैकी ३३ हजारांवर पदे रिक्त आहेत. त्यात महिला पोलिसांच्या १६.६ टक्के पदांचा समावेश असल्याची माहिती समोर आली आहे.

आंतरराष्ट्रीय प्रमाणानुसार, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी १ लाख लोकसंख्येमागे २२२ पोलीस कर्मचारी असायला हवेत. मात्र, भारतात हे प्रमाण एका लाखामागे सरासरी १५२ पोलीस कर्मचाऱ्यांपेक्षाही ७० ने कमी आहेत. देशात पोलिसांची सर्वाधिक रिक्त पदे बिहारमध्ये आहेत.

येथे मंजूर संख्येपेक्षा जवळपास ४१ टक्के पोलीस कर्मचारी कमी आहेत. त्यामुळेच या राज्यात गुन्हेगारीचे प्रमाण जास्त दिसून येते. तेलगंणात २८ टक्के तर महाराष्ट्रात जवळपास १६.३ टक्क्यांपेक्षा जास्त पदे रिक्त आहेत.

उत्तराखंडमध्ये सर्वात कमी रिक्त पदे असून ९४ टक्के पोलीस कार्यरत आहेत. अनेकदा पोलीस कर्मचारी तपास सोडून अतिमहत्वाच्या व्यक्तींच्या दौऱ्यात आणि बंदोबस्तांमध्ये गुंतून असतात. त्यामुळे राज्यातील गुन्हेगारी वाढताना दिसत आहे.

महाराष्ट्र पोलीस दलात महिलांचा टक्का ३३ टक्के असावा, यासाठी गृहमंत्रालय प्रयत्न करीत आहे. परंतु, सद्यस्थितीत राज्य पोलीस दलात महिला पोलिसांच्या मंजूर संख्येच्या तुलनेत १६ टक्क्यांपेक्षा जास्त जागा रिक्त आहेत. महिलांवरील लैंगिक अत्याचार आणि कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनांमध्ये महाराष्ट्र चौथ्या क्रमांकावर आहे.

नागपूर शहर पोलीस दलात मंजूर संख्येपेक्षा काही जागा रिक्त आहेत. परंतु, शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिसांची संख्या पुरेशी आहे. रिक्त पदे लवकरच भरली जाणार असल्याचे एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने सांगितले.

# शुन्यातून साकारले अग्रगण्य प्रोडक्शन हाऊस

■ सुजाता बंडावार, नागपूर, दि. ३ :
इलेक्ट्रॉनिक मीडियात करिअर करायचं म्हणजे मुंबई, पुणे खेरीज मार्ग नाही हे समीकरणच मुळात बदलवू इच्छिणारे अजय राजकारणे यांनी दूरदर्शनसाठी काम करीत असतानाच मनाशी पक्की खुणगाठ बांधली आणि आपल्या पत्नी अनुराधा राजकारणे यांच्या सोबतीने नागपूर व आसपासच्या गुणी कलावंत व तंत्रज्ञ यांना नागपुरातच उत्तम संधी उपलब्ध करून देणाऱ्या राजकारणे मीडिया वेव्हज् प्रायव्हेट लिमिटेड या प्रोडक्शन हाऊसची शून्यातून निर्मिती केली.

आज ही संस्था ॲड फिल्म, डॉक्युमेंटरीज, कार्पोरेट फिल्म, इलेक्शन फिल्म व इव्हेंट इत्यादीच्या निर्मितीत मध्य भारतातील अग्रगण्य संस्था आहे.

नागपूरच्या व्हॉइस ओव्हर, स्क्रिप्ट रायटर्स, कॅमेरा पर्सन, एडिटर्स, प्रोड्युसर्स यासारख्या कलावंतांना नागपुरातच व्यावसायिक व्यासपीठ मिळावे यासाठी झपाटलेल्या अजय राजकारणे या मराठी माणसाने हे खडतर आव्हान स्वीकारले आणि 28 मार्च 1998 ला मीडिया वेव्हज् या नावाने आपल्या छोट्या स्वरूपातील प्रोडक्शन हाऊसची सुरुवात केली.

लहानसे कार्यालय, मोजकी साधने, बोटावर मोजता येईल एवढेच कॅमेरे, माइक्स, मोजकाच कर्मचारी वर्ग पण दुर्दम्य आत्मविश्वास आणि स्वतःला सिद्ध करण्याची इच्छाशक्ती या जोरावर आज उत्तरोत्तर प्रगती करत राजकारणे मीडिया वेव्हज्ने चार मजली भव्य कार्यालय, अत्याधुनिक सुविधांनी युक्त



स्टुडिओ, एडिटिंग कक्ष, रेकॉर्डिंग कक्ष, कॉन्फरन्स रूम, प्रत्येक विभागाचे स्वतंत्र दालन, ॲडव्हान्स्ड कॅमेरा इत्यादीसह उंच भरारी घेतली.

आज येथे 70 ते 80 कर्मचारी प्रत्यक्षरीत्या जुळले आहेत तर कित्येक कलावंत 200 ते 250 च्या घरात अप्रत्यक्षरीत्या संधीचा लाभ घेत आहेत. हळूहळू एक एक क्षेत्र पादाक्रांत करीत आज शासकीय, राजकीय चित्रफितींसाठी तसेच इव्हेंटसाठी आर. एम. डब्ल्यू.ची निवड हमखास केली जाते.

एकेक व्यावसायिक उंची गाठत आर.

## राजकारणे मीडिया वेव्हज् प्रायव्हेट लिमिटेडचा थक्क करणारा प्रवास





एम.डब्ल्यू. ने आपलं नाव प्रस्थापित केलं आणि 11 एप्रिल 2013 ला मीडिया वेव्हज याचे राजकारणे मीडिया वेव्हज प्रायव्हेट लिमिटेड मध्ये झालेले रूपांतरण म्हणजे यशाच्या वाटचालीतील एक दीपस्तंभ आहे.

रचनात्मक, जाणकार व समर्पित विशेषज्ञ व दूरदृष्टी असलेल्या टीमवर्कच्या जोरावर बँक, हॉस्पिटल, शैक्षणिक व व्यावसायिक संस्था इत्यादींच्या 1500 हून अधिक डॉक्युमेंटरी, दोनशेहून अधिक ॲड फिल्म्स, कार्पोरेट फिल्म, शॉर्ट फिल्म पूर्णत्वास आणल्या. एवढेच नाही तर लोकांच्या मागणीनुसार चारशे पेक्षा अधिक डॉक्युमेंटरीजचे विविध चॅनेलवर प्रसारण करण्यात आले आहे.

आर. एम. डब्ल्यू.पी. एल. च्या यशातील महत्त्वाचे टप्पे म्हणजे कविवर्य राजा बढे यांच्या जीवन चरित्राची चित्रफित व कार्यक्रम, वनविभाग महार रेजिमेंट, यशवंत स्टेडियम वरील संविधान दिवस आयोजन, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, समाज कल्याण विभाग, मिहान, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, पोलीस भवन नागपूर, मुंबई आणि नागपूर मेट्रो महाराष्ट्र टुरिझम, मध्य प्रदेश टुरिझम यांच्या अनेक चित्रफितींची निर्मिती करण्यात आली.

आर. एम.डब्ल्यू.ने संचालित केलेल्या समाज कल्याण विभागाच्या संविधान दिनाच्या कार्यक्रमाचे नाव लिम्का बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंदविण्यात आले आहे. या संस्थेच्या उल्लेखनीय कामांपैकी एक म्हणजे भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या लंडन येथील त्यांच्या घराची चित्रफित करण्याची संधी मिळाली.

इंटरनॅशनल पीस कॉन्फरन्स इव्हेंट करणे म्हणजे यशात एक मानाचा तुरा रोवला गेला. याशिवाय अनेक नामवंत सिने कलावंत, नेतेगण, प्रथीतयश उद्योजक इत्यादींना आर. एम. डब्ल्यू.ने भेटी दिल्या व त्यांच्या कामाला कौतुकाची थाप मिळाली. अनेक संस्था आणि माध्यमांकडून त्यांचा गौरव करण्यात आला आणि कार्याचा परिघ विस्तारित होऊन मध्य प्रदेश, छत्तीसगड, दिल्ली, झारखंड, उत्तर प्रदेश, तेलंगणा, राजस्थान या राज्यात आर. एम. डब्ल्यू.च्या शाखा आहेत.

26 वर्षांचा प्रवास अनेक अडथळ्यांचा व खाचखळग्यांचा होता. पण अथक परिश्रम, चिकाटी, सातत्य व त्यांच्यातील एकजूटिने हा प्रवास साध्य करता आला असे अजय राजकारणे व त्यांना साथ देणाऱ्या त्यांच्या पत्नी अनुराधा राजकारणे सांगतात.

# एकमेकांवर धडकली १५ वाहने

## बर्डी उड्डाण पुलावर विचित्र अपघात

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :
सीताबडीर्तील गोवारी उड्डाणपुलावर भीषण अपघात झाला असून जवळपास १२ ते १५ वाहने एकमेकांवर धडकली. या अपघात दोन जण जखमी झाले असून वाहनांचेसुद्धा मोठे नुकसान झाले आहे.

वाहतूक पोलीस आणि सीताबर्डी पोलिसांनी पुलावर पोहचून अपघातग्रस्तांना मदत केली. वाहतूक बंद करुन रस्ता मोकळा केला. ही घटना मंगळवारी सकाळी ११.३० वाजताच्या सुमारास घडली.

वामन बापूराव नेवारे (४५, मटकाझरी) हे मंगळवारी सकाळी कारने उमरेडला जात होते.बर्डीच्या गोवारी उड्डाणपुलावरुन जात जात असताना समोरील कारने अचानक ब्रेक दाबले. त्यामुळे मागे असलेल्या वामन नेवारे यांची कार पुढील वाहनावर आदळली व आडवी झाल्यामुळे मागून येणारी दुसरी कार नेवारेंच्या कारवर धडकली.

त्यानंतर उड्डाणपुलावरुन सुसाट जाणारी





वाहने एकमेकांवर धडकायला लागली. काही सेकंदातच उड्डाणपुलावरील जवळपास १२ ते १५ वाहने एकमेकांवर धडकल्या. यामध्ये काही ऑटो, कार, आयशर ट्रक आणि एका स्कूलव्हॅनचा समावेश आहे.

या विचित्र अपघातामुळे उड्डाणपुलावरुन जाणारी वाहतूक विस्कळीत झाली. या अपघातात नेवारे यांच्यासह राजेश शेंडे (चिमुरकर लेआऊट, हुडकेश्वर) हेसुद्धा किरकोळ जखमी झाले.

काही मिनिटातच उड्डाणपुलावर वाहनांच्या मोठ्या रांगा लागल्या. सीताबर्डी पोलीस आणि वाहतूक पोलिसांचे पथक काही मिनिटातच उड्डाणपुलावर आले. त्यांनी अपघातग्रस्त वाहनांना एका बाजूला करण्याचा प्रयत्न केला. गाड्या एकमेकांवर धडकल्यामुळे काही वाहनचालकांमध्ये वाद सुरु होते. चालकांशी संवाद साधून त्यांची समजूत घातली. शेवटी या अपघाताची नोंद सीताबर्डी पोलीस ठाण्यात करण्यात आली. या अपघातात दोन कारचालक किरकोळ जखमी झाल्याचे पोलिसांनी सांगितले.

रहाटे कॉलनी चौक ते थेट झिरो माईल चौकात पोहचण्यासाठी गोवारी उड्डाणपूल तयार करण्यात आला आहे. मात्र, कार एकमेकांवर धडकल्याने झालेल्या अपघातामुळे उड्डाणपुलावरील वाहतूक जवळपास दोन तास ठप्प झाली होती. त्यामुळे उड्डाणपुलाखालील मार्गावर वाहनांची मोठी गर्दी होती.

जनता चौक, पंचशील चौक आणि व्हेरायची चौकात वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. त्यामुळे वाहतूक पोलिसांचे दोन पथके उड्डाणपुलाखाली तैनात करण्यात आली होते. या अपघाताचे व्हिडीओ समाज माध्यमांवर व्हायरल झाले.

# पाच अधिवेशनापासून मुकले उपराजधानीचे नागपूर

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :
१९६२, १९६३, १९७९, १९८५ व २०२० अशी पाच हिवाळी अधिवेशने नागपुरात होवू शकली नाही. तर २०२१ ची तीनही अधिवेशने १ मार्च ते १० मार्च २०२१, ५ ते ६ जुलै २०२१ आणि २२ डिसेंबर ते २८ डिसेंबर २०२१ या अल्प कालावधीसाठी मुंबईत घेण्यात आली.

नागपुरात अल्पकालावधीची काही अधिवेशने झाली. यामध्ये १९८४ साली तिसरे अधिवेशन १२ ते १७ नोव्हेंबर असे केवळ सहा दिवसांचे झाले. यात ६ बैठका झाल्या. तर १९८९ मध्ये केवळ १६ ते २० ऑक्टोबर असे ५ दिवसांचे झाले. बहुतांश अधिवेशने दोन आठवड्यांची होतात. त्यात सुट्या धरून प्रत्यक्ष कामकाज ९ दिवसांचे होते. १९६० पासून नोव्हेंबरमध्ये २१ अधिवेशने झाली.

१९६२ मधये भारत चीन युद्ध, १९६३ मध्ये तत्कालिन मुख्यमंत्री मा. सां. कन्नमवार, १९७९ मध्ये लोकसभेच्या मध्यवर्ती निवडणूका जाहीर झाल्यामुळे, १९८५ मध्ये काँग्रेसच्या शताब्दी वर्षाचा पूर्वनियोजित कार्यक्रम मुंबई येथे असल्यामुळे तर २०२० मध्ये वैश्विक महामारी कोरोनामुळे नागपुरात हिवाळी अधिवेशने होवू शकली नाही.

२०२० मध्ये ८ जानेवारी, २४ फेब्रुवारी ते १४ मार्च २०२०, ७ ते ८ सप्टेंबर २०२० आणि १४ ते १५ डिसेंबर २०२० या अल्पकालावधीसाठी मुंबईत घेण्यात आली.

काही अधिवेशने वेगवेगळ्या महिन्यात झाली. यामध्ये १९६१ मध्ये १४ जुलै ते ३० ऑगस्ट, १९६६ मध्ये २९ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर, १९७७ मध्ये १७ ऑक्टोबर ते ४ नोव्हेंबर, १९६१ मध्ये १४ जुलै ते ३० ऑगस्ट, १९६६ मध्ये २९ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर, १९७१ मध्ये ६ सप्टेंबर ते ११ ऑक्टोंबर, १९७७ मध्ये १७ ऑक्टोबर ते ४ नोव्हेंबर, १९८६ मध्ये ६ ते २४ जानेवारी, १९८० मध्ये २१ जानेवारी ते १ फेब्रुवारी या कालावधीत अधिवेशने झाली होती.

१ नोव्हेंबर १९५६ ते ३० एप्रिल १९६० या कालावधीतील १० अधिवेशने खास करून मुंबईत झाली. तर १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्या नंतर १० नोव्हेंबर ते १६ डिसेंबर या कालावधीत नागपूर येथे अधिवेशन झाले. त्यात २७ बैठका झाल्या. १९६१ मध्ये १४ जुलै ते ३० ऑगस्ट कालावधीत झालेल्या अधिवेशनात २५ बैठका झाल्या. त्या नंतर एकदम १९६४ मध्ये १८ नोव्हेंबर ते १८ डिसेंबर या कालावधीत झालेल्या अधिवेशनाच्या २३ बैठका झाल्या. अशा प्रकारे हिवाळी अधिवेशनाचे कामकाज हळुहळु कमी होत गेले.

# प्रार्थना सभेतून अंधश्रद्धा फसरवण्याचा आरोप

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :
मेकोसाबाग शाळेच्या मैदानात आयोजित प्रार्थना सभेतून एक पादरी आणि प्रचारक अंधश्रद्धा पसरवत असल्याचे प्रकरण पुढे आले आहे. पोलिसांनी दोघांविरुद्धही महाराष्ट्र नरबळी व इतर अमानूष, अनिष्ठ, अघोरी प्रथा व जादूटोना अधिनियमांतर्गत गुन्हा नोंदविला आहे. कथित आरोपींमध्ये हार्वेस्ट चर्च नागपूरचे पादरी जोसेफ व्ही. बावर आणि आंतरराष्ट्रीय प्रचारक पास्टर कांचन मित्तल यांचा समावेश आहे.

ऑक्टोबर महिन्यात पादरी जोसेफ यांच्या नेतृत्वात ख्रिस्ती समाजातर्फे 27 ते 29 नोव्हेंबर दरम्यान विश्वशांती प्रार्थना सभेच्या आयोजनाची परवानगी मागण्यात आली होती. या कार्यक्रमाच्या पत्रिकेत अध्यात्मिक प्रबोधन, मोक्षोपचार आणि मुक्ती प्रार्थना सभा आणि आशीवार्दाचा उत्सव याविषयी माहिती देण्यात आली होती. कोणत्याही प्रकारे अंधश्रद्धेला प्रोत्साहन देणारी वक्तव्ये, कृती किंवा विधाने न करण्याच्या अटीवर त्यांना परवानगी देण्यात आली.

कार्यक्रमात पादरी जोसेफ यांनी मंचावरून प्रार्थना आणि प्रबोधन करण्यास सुरूवात केली. त्यानंतर पास्टर कांचन मित्तल यांनी माईकवर लोकांना, तुम्ही पापी आहात, तुमच्यामध्ये शैतानी आत्मा आहे. तुम्ही माझ्याकडे या, मी पापी आत्म्याला बाहेर काढीन आणि सर्व समस्या सोडवीन, असे म्हटले. नंतर प्रार्थना करण्यास सुरुवात केली. तुमचे आजार दूर होत आहेत, असे सांगितले. या संपूर्ण प्रकरणी तपासानंतर आता संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# दोन मुले आणि तीन हेल्मेट...

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :
वाहतूक पोलीस विभागाने दुचाकीस्वारासह मागे बसलेल्या सहप्रवाशाला हेल्मेट घालणे अनिवार्य केले आहे. पोलिसांच्या या निर्णयाला शहरभरातून विरोध होत असून महिला संतप्त झाल्या आहेत.

जर दोन मुलांना शाळेत सोडून द्यायचे असेल तर तीन हेल्मेट हाताळायचे कसे?, लहान मुलांच्या पाठीवर दप्तर आणि डोक्यावर हेल्मेट घालायचे का, असा संतप्त सवाल महिला पालकांनी उपस्थित केला आहे. वाहतूक पोलिसांनी दुचाकीवरील सहप्रवाशाला हेल्मेटसक्ती केली आहे. हा निर्णय महिलांसाठी सर्वाधिक अडचणीचा ठरत आहे.

वाहतूक पोलीस उपायुक्तांच्या या निर्णयाला शहरात विरोध वाढत आहे. दुचाकी चालकांमधून संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. तसेच महिलांनीही वाहतूक पोलिसांवर आपला रोष व्यक्त केला आहे. दोन हेल्मेट सोबत बाळगणे कठीण असल्याची प्रतिक्रिया शहरातील नोकरदार महिला, व्यावसायिक महिलांसह गृहिणींनी व्यक्त केली आहे.

दुचाकीने शाळेत जाताना अनेकदा पायी जाणाऱ्या विद्यार्थिनीलाही शाळेपर्यंत सोडून देते. तसेच रस्त्यावर भेटलेल्या शिक्षिकांनाही सोबत घेते. मात्र, आता दुचाकी घेऊन शाळेत निघताना कुणाची मदत करता येणार नाही. कारण, रोज अतिरिक्त हेल्मेट बाळगणे शक्य नसल्याचे एका महिलेने सांगितले.

शेजारच्या महिलेसोबत दुचाकीने बाजाराची पिशवी आणायची असेल तर दुचाकीच्या समोर तशी व्यवस्था असते. मात्र, वाहतूक पोलिसांच्या नव्या नियमामुळे आता ती जागा दोन हेल्मेटला द्यावी लागेल. मग, बाजाराची पिशवी कुठे ठेवणार? त्यामुळे सहप्रवाशाला हेल्मेटसक्ती नकोच, असे मत एका महिलेने व्यक्त केले.

# सायबर गुन्हेगारांनी घातला ११ लाखांचा गंडा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :
वर्क फ्रॉम होमचे आमिष दाखवून सायबर गुन्हेगारांनी एका तरुणाला 10.88 लाख रुपयांचा गंडा घातला. या प्रकरणी मानकापूर पोलिसांनी शुभम विठ्ठलसिंग बैस (29) रा. उत्थाननगर, गोरेवाडाच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. समता राहुल आणि रवींद्र पाटील अशी आरोपींची नावे आहेत.

शुभम बेरोजगार असून कामधंद्याच्या शोधात आहे. दरम्यान टेलीग्रामवर त्याला वर्क फ्रॉम होमचा मॅसेज आला. त्यात दररोज 2 ते 3 हजार रुपये कमावण्याचे आमिष दाखविण्यात आले होते. शुभमने मॅसेज करून आरोपींशी संपर्क केला. त्याला टेलीग्रामवरच एक लिंक पाठवून यूजर आयडी बनविण्यास सांगण्यात आले.

शुभमने यूजर आयडी बनवल्यानंतर आरोपींनी त्याला ड्रीम हॉटेल ग्रूपच्या होमपेजवर खोली बुक करण्यास सांगितले. त्यासाठी त्याला कमिशन देण्याचे सांगण्यात आले. सुरूवातीला आरोपींनी त्याला कमिशनही दिले. त्यानंतर वेगवेगळ्या बुकिंगसाठी त्याला आधी अडव्हांसमध्ये पैसे जमा करण्यास सांगण्यात आले.

आरोपींनी सांगितल्यानुसार शुभमने त्यांच्या खात्यात पैसे जमा करत गेला. 10.88 लाख घेतल्यानंतरही आरोपींनी ना त्याला काम दिले आणि ना जमा केलेले पैसे परत केले. शेवटी त्रस्त होऊन त्याने पोलिसात तक्रार केली. पोलिसांनी फसवणूक आणि आयटी ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# इतवारी रेल्वेस्थानकाचा चेहरामोहरा बदलला



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३ :
देशातील विविध रेल्वेस्थानकांचा पुनर्विकास केला जात असून त्यात नागपुरातील इतवारी रेल्वेस्थानकाचा समावेश आहे. या रेल्वेस्थानकावर पुनर्विकासाचे काम पूर्ण झाल्याने स्थानकाचे रूपडे पालटले आहे.

केंद्राच्या अमृत भारत स्टेशन योजनेत देशातील १,३३७ स्थानकांचा पुनर्विकास केला जात आहे.त्यात इतवारी रेल्वेस्थानकाचा (नेताजी सुभाषचंद्र बोस इतवारी जंक्शन) समावेश आहे. त्यासाठी सुमारे १२.३९ कोटी मंजूर करण्यात आले.

आता या स्थानकाचे आता काम पूर्ण झाले आहे.त्यामुळे स्थानक परिसरातील वाहतूक कोंडी कमी झाली आहे. तसेच वाहनतळासाठी जागा उपलब्ध झाली आहे.

मध्य रेल्वेच्या वतीने नागपूर विभागात १३५.४४ कोटी रुपयांचे ३६ भुयारी मार्ग तयार करण्यात आले आहेत. तर अमृत भारत स्टेशन योजनेंतर्गत दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्या १५ रेल्वेस्थानकांचा समावेश असून तीन रेल्वेस्थानकांचे काम पूर्ण झाले आहे.

येथे सुरक्षेकरिता सहा सीसीटीव्ही कॅमरे हायमास्ट लाईट लावण्यात आले आहेत. माफक दरात औषध उपलब्ध व्हावे म्हणून जन औषधी केंद्र सुरू करण्यात आले आहे.

रेल्वेस्थानकावर नागपूरची संत्री, आदिवासी गोंड कला आणि नेताजी सुभाष चंद्र बोस यांची प्रतिमा पेंटिंगमधून साकारण्यात आली आहे. रेल्वे डब्यात उपाहारगृह सुरू करण्यात येणार असून याशिवाय, येथे इतरही सुविधा केल्या जाणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

# सायबर गुन्हेगार तयार करताहेत कंपन्यांचे बनावट संकेतस्थळ

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३ :
एखादे खासगी प्रतिष्ठान, शासकीय कार्यालय किंवा कंपनीचा संपर्क क्रमांक ह्यइंटरनेटह्लवरून शोधत असाल तर तुम्ही नक्कीच सायबर गुन्हेगारांच्या जाळ्यात अडकण्याची शक्यता आहे.

सायबर गुन्हेगारांनी आता अनेक कंपन्यांचे बनावट संकेतस्थळ तयार करणे सुरू केले आहे. त्यावरील क्रमांकावर संपर्क करणाऱ्या ग्राहकांना सायबर गुन्हेगार जाळ्यात ओढून फसवणूक करत असल्याच्या अनेक घटना समोर आल्या आहेत.

राज्यात सायबर गुन्हेगारी दिवसेंदिवस वाढत आहे. सायबर गुन्हेगार नवीन क्लृप्त्यांचा वापर खात्यातून पैसे परस्पर उकळण्यासाठी करीत आहे. सध्या सायबर गुन्हेगारांनी



रेल्वेस्थानक, बसस्थानक, विमानतळासह शासकीय कार्यालये तसेच खासगी सेवा देणाऱ्या कंपन्यांची बनावट संकेतस्थळे तयार केली आहे. त्या बनावट संकेतस्थळाची रचना मूळ कंपन्यांसारखी असते. त्यामुळे गुगलचा वापर करून संपर्क क्रमांक शोधणाऱ्या अनेक ग्राहकांना सायबर गुन्हेगार जाळ्यात ओढतात.

> इंटरनेटवरून शोधलेल्या ग्राहक प्रतिनिधींशी संपर्क साधल्यास तो क्रमांक सायबर गुन्हेगाराचा असू शकतो. त्यामुळे ग्राहकांनी बनावट संकेतस्थळापासून सावध रहावे. ऑनलाईन फसवणूक झाल्यास त्वरित सायबर पोलीस ठाण्यात लेखी तक्रार करावी.
>
> **लोहित मतानी (पोलीस उपायुक्त, सायबर गुन्हे शाखा.)**

काही रक्कम ऑनलाईन टाकण्यास सांगितले जाते. तसेच एटीएम कार्ड-क्रेडिट कार्डची माहिती ऑनलाईन टाकण्यास बाध्य केले जाते. ग्राहकाने माहिती दिल्यानंतर त्यांच्या खात्यातून परस्पर पैसे काढून घेतले जातात. ग्राहकांना काही मिनिटातच खात्यातून पैसे काढल्याचा संदेश भ्रमणध्वनीवर प्राप्त होतो.

ग्राहक गोंधळलेल्या अवस्थेत असतो. परंतु, पोलिसांपर्यंत तक्रार देईपर्यंत सायबर गुन्हेगाराने ग्राहकाचे खाते रिकामे केलेले असते. त्यामुळे गुगलवरून ग्राहक प्रतिनिधींचे किंवा इतर संपर्क क्रमांक शोधताना काळजी बाळगणे आवश्यक आहे.

ग्राहक प्रतिनिधी किंवा इतर क्रमांक हवा असल्यास अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी. संपर्क क्रमांक किंवा ग्राहक प्रतिनिधींचा दूरध्वनी क्रमांक पडताळून घ्यावा.

सेवा किंवा वस्तू मिळवण्यासाठी ऑनलाईन पैसे भरू नये. एटीएम कार्ड किंवा क्रेडिट कार्डची माहिती इतर कोणालाही कोणत्याही परिस्थितीत देऊ नये. अन्यथा सायबर गुन्हेगारांच्या जाळ्यात अडकण्याची शक्यता असते.